# कोकणातील अरिष्टावर उपाय
# स्थानिकांच्या नजरेतून

संसाधने व उपजीविका गट

प्रयास

आरोग्य, ऊर्जा, शिक्षण आणि पालकत्व या विषयांतील विशेष प्रयत्न



## कोकण रेल्वेने दाखवली विकासाची वाट !

काजळी नदीच्या किनारी वसलेल्या निवसर गावाजवळच (रत्नागिरी) वसलेली छत्तीस घरांची मुस्लिम वस्ती म्हणजे निवसरबागवाडी. सुमारे १५-१६ वर्षांपूर्वी या वाडीलगत कोकण रेल्वेचे काम सुरु झाले. रेल्वेमार्ग व स्थानकासाठी तब्बल २०० मीटर लांबीचा व ३० मीटर उंचीचा भराव उभा केला गेला. वाडीमागच्या डोंगरातून उगम पावणारे तीन ओढे या भरावामुळे अडवले गेले. एक कालवा काढून या अडवलेल्या पाण्याला वाट देखील करुन दिली गेली. उन्हाळ्यात सौम्य दिसणारे हे ओढे पावसाळ्यात किती रौद्र स्वरुप धारण करतात याचा निवसरबागवाडीकरांना चांगलाच अनुभव होता. त्यामुळे रेल्वे महामंडळाचा विचार कळताच पाणी अडविण्याऐवजी पूल बांधावा असे त्यांनी सुचवले होते. ही विनंती धुडकावून लावणे पुरेसे नव्हते म्हणून की काय, दगड-खडी-डबर या कच्च्या मालासाठी वाडीमागचा डोंगरही फोडला गेला. या खटाटोपाचे फळ म्हणून, रोज किमान २५ रेल्वे-गाड्या ताशी ८० ते १२० कि.मी. वेगाने या भरावावरुन धावू लागल्या. ओढा वळवण्यासाठी बांधलेल्या छोट्या कालव्यातून पाणी कसेबसे वाहू लागले. दर वर्षीच्या पावसाळ्यात पाण्याचे लोंढे रेल्वेमार्गाच्या भरावावर आदळत होतेच. यावर्षीच्या अतिवृष्टीमुळे तर हा भराव पाण्याने ओसंडून वाहू लागला, आणि कालवाही पार दिसेनासा झाला. तुंबलेल्या पाण्यामुळे जमिनीवरचा दाब वाढला. डोंगरावर तसेच वाडीतील जमिनीला भेगा पडल्या आणि रेल्वे स्थानकही खचले. वाडीतील विहीर, मशिदीसह ८०% घरांचे अतोनात नुकसान झाले. या परिस्थितीला रेल्वे महामंडळाची बेपर्वाई जबाबदार असल्याने रेल्वे प्रशासनानेच नुकसान भरपाई द्यावी म्हणून अल्ताफ काझी व इतर जागरुक नागरिकांनी स्थानिक प्रशासन व पुढाऱ्यांपासून थेट मंत्र्यांपर्यंत निवेदने दिली. त्याचबरोबर जिल्हा भूगर्भशास्त्रज्ञांना गावात बोलावून परिस्थितीचा शास्त्रीय अहवाल तयार करून घेतला. यामुळे निवसरबागवाडीकरांच्या अनुभवसिद्ध म्हणण्याला भक्कम शास्त्रीय आधार मिळाला आहे.

कोकण रेल्वे = आधुनिक तंत्रज्ञान व विकास, हे समीकरण तपासले जाण्यासाठी अजून किती निवसरबागवाड्यांना वाट बघावी लागणार आहे, कुणास ठाऊक !

# अनुक्रमणिका


प्रस्तावना

**कोकणातील अरिष्ट आणि शासनाचा प्रतिसाद** **७**
कोकणची ओळख
जुलैमधील अरिष्ट
अरिष्टाला शासनाचा प्रतिसाद : नेहमीची (रड) कथा

**अरिष्टाचा शेतीव्यवस्थेवरील परिणाम** **१५**

**इतर प्रकारचे नुकसान : अरिष्टाचा दुर्लक्षित पैलू** **३१**

**अरिष्टाचा आदिवासी समाजावर झालेला परिणाम** **३९**

**स्त्रियांच्या नजरेतून अरिष्ट आणि त्यावरील उपाययोजना** **४३**

**अरिष्टाचे मूळ: कारणे व उपाय** **५१**

**व्यापक उपाययोजनेच्या दिशेने** **६६**
अभ्यासातून पुढे येणारे प्रमुख निष्कर्ष
आव्हान अरिष्ट निवारणाचे

समारोप ७२

परिशिष्ट १ ७४
परिशिष्ट २ ७६

# मागण्या


- **शासनाने दिलेला तातडीचा प्रतिसाद** १३
- **शेतीव्यवस्थेच्या नुकसानाबाबत**
  - शेतजमीनीचे कायमस्वरूपी नुकसान १८
  - शेतजमिन व बांध बंदिस्ती २३ – २४
  - पावसाळी हंगामातील पिके २७
- **इतर प्रकारच्या नुकसानाबाबत**
  - जीवितहानी ३१
  - सुरक्षित निवारा ३३ – ३४
  - जनावरांचे नुकसान ३५ – ३६
  - पायाभूत सुविधा ३७
- **आदिवासी आपद्ग्रस्तांच्या मागण्या** ४१
- **स्त्रियांच्या मागण्या** ४७ – ४९
- **अरिष्टाच्या प्रतिबंधासाठी मागण्या** ६१ – ६४

# ऋणनिर्देश

### संस्था, संघटना व कार्यकर्ते

**रत्नागिरी:** परिवर्तन संस्था (चिपळूण) जनविकास प्रतिष्ठान (माखजन) जनसहयोग प्रतिष्ठान (कोसुंब) ग्रामीण विकास प्रबोधिनी, कुणबी सेना (देवरुख) **रायगड:** श्रमिक क्रांती संघटना, साकव संस्था, अंकुर ट्रस्ट, खारडोंगर मेहनत आघाडी (पेण) सर्वहारा जन आंदोलन (माणगाव) निर्मिती संस्था (पाली) ग्रामीण विकास संस्था (महाड)

### तालुकानिहाय गावे/वाड्या

**रत्नागिरी:** साखरपा, भडकंबा, देवडे, मठधामापूर, कोळंबे, परचुरी, माभळे, फुणगूस, डिंगणी, कासे, धामापूर–माखजन, कोंड्ये (संगमेश्वर) सोमेश्वर, टेंबेपूल (रत्नागिरी) निवसरबागवाडी (लांजा) पाली, खोडदे (गुहागर) सापिर्ली, कोतवली, सोनगाव (खेड) कालुस्ते, भीले, मांडकी, अनारी (चिपळूण)

**रायगड:** दासगाव, बामणीकोंड, आमशेत, टोळ, कोशिंबळे, नाते, घुरुपकोंड, मांडले (महाड) कुरवडे, गोरेगाव, खांदाड, रिळे, चापडी, उणेगाव, वडगाव कोंड, वडघर, देवळी (माणगाव) निवी, अष्टमी, भातसई, कोकबन, वावेखार, झोळांबे, दिव, निळगुण, कोलाड, पहूर–वाळंजवाडी, खैर–नंबरवाडी (रोहा) हेटवणे, नारळीआंबा, हेदोशी, कणे, आमटेम, निगडे, बेणेघाट, गडब, खारपाले, मसद, शिर्की चाळ (पेण) सावरोली (खोपोली) कालिवली (पनवेल)

### शासकीय अधिकारी

**रत्नागिरी:** श्री. मून अ. रा.(उपसंचालक, सामाजिक वनीकरण) श्री. कुलकर्णी एम. बी. (शाखा अभियंता, खारभूमी विभाग) श्री. मेतकर सुधाकर (प्रभारी मोहिम अधिकारी, जि. प.) श्री. आढाव गो. रा. (कृषी विस्तार अधिकारी जि. प.) श्री. पवनीकर गजेंद्र (कृषी विस्तार अधिकारी, गुहागर) श्री. इनामदार जयंत (कनिष्ठ भूवैज्ञानिक) व श्री. जोशी पी. के. (वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विभाग) श्री. वेल्हाळ सुधीर (कनिष्ठ अभियंता, खारभूमी) श्री. बनसोडे प्रफुल्ल (तालुका कृषी अधिकारी, चिपळूण) **रायगड:** श्री. चव्हाण आर. डी. (विभागीय अभियंता, खारभूमी, माणगाव) श्री. पुजारी आर. व्ही.(पाटबंधारे विभाग, माणगाव) श्री. सावंत आर. आर.(सहाय्यक वन विभाग अधिकारी, पेण) श्री. बनसोडे अनिल, (अधीक्षक जिल्हा कृषी अधिकारी, कृषी विभाग) श्री. मिस्त्री शांताराम (कृषी विकास अधिकारी) डॉ. सावंत प्रमोद (कृषी विज्ञान केंद्र, कर्जत) **पुणे:** डॉ. एन. जयंती (वरिष्ठ अधिकारी, भारतीय हवामान शास्त्र विभाग) डॉ. रावत यू. एस. (भूगर्भशास्त्रज्ञ, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण) श्री. सोनूणे गणेश (आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम अधिकारी) श्री. वरपे (उपसंचालक विस्तार विभाग, कृषी आयुक्तालय) श्री. बुंदे जे. आर. (कृषी उपसंचालक, कृषी आयुक्तालय) श्री. पाटील प्रदीप (स्वीय सहाय्यक, कृषी आयुक्त)

### इतर व्यक्ती व संस्था

**रत्नागिरी:** डॉ. कद्रेकर श्रीरंग (माजी कुलगुरू, कोकण कृषी विद्यापीठ) श्री. खेडेकर विशाल (दै. पुढारी, चिपळूण) श्रीम. जाधव निशा (सामाजिक कार्यकर्त्या) श्री. जोष्टे राजेश (प्रतिनिधी दै. रत्नागिरी टाईम्स, चिपळूण) डॉ. तळाशिलकर सुरेश (प्राध्यापक , कोकण कृषी विद्यापीठ, दापोली) व कोकण कृषी विद्यापीठातील संशोधक व प्राध्यापक, श्री. दिवाडकर भालचंद्र (ज्येष्ठ पत्रकार, दैनिक सागर, चिपळूण) श्री. पवार दीपक (कृषी महाविद्यालय, चिपळूण) श्री. मोडक सलील (प्राध्यापक, गोविंदराव निकम कृषी महाविद्यालय, चिपळूण) वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, वावे, चिपळूण, डॉ. शारंगपाणी संजीव (चिपळूण) **रायगड:** श्री. धारिया किशोर (हिरवाई) डॉ. धुमाळ (आमटेम, विश्वस्त, साकव संस्था, पेण) श्री. शिंदे दीपक (प्रतिनिधी, सह्याद्री वाहिनी, महाड) **पुणे:** प्रा. डॉ. कार्लेकर श्रीकांत (स. प. महाविद्यालय) श्रीम. कोतवाल मेधा (आलोचना) श्रीम. खैरे भाग्यश्री (सेहत) श्री. गोळे प्रकाश, श्रीम. गोळे स्वाती (इकॉलॉजीकल सोसायटी) डॉ. घारे मुकुंद (अफार्म) श्रीम. दधीच साधना (नारी समता मंच) प्रयास ऊर्जा गट, प्रयास आरोग्य गट, श्रीम. विद्या बाळ (मिळून साऱ्याजणी) श्री. रानडे विद्यानंद (निवृत्त सचिव, पाटबंधारे विभाग) श्री. भंडारे संदेश (छायाचित्रकार) **कोल्हापूर:** श्री. गायकवाड उदय (सदस्य, विज्ञान प्रबोधिनी समिती) श्री. भुस्कुटे रा. वि. (माजी तहसीलदार)

**या सर्वांशिवाय इतरही अनेकांची अभ्यास आणि अहवालासाठी वेळोवेळी मोलाची मदत झालेली आहे. त्या सर्वांचा व्यक्तिशः नामोल्लेख करणे शक्य नसले, तरी त्यांचेही आम्ही ऋणी आहोत.**

# प्रस्तावना

जुलै–ऑगस्ट २००५ मधील अतिवृष्टी आणि प्रलंयकारी पूर यांनी महाराष्ट्राच्या जनजीवनाचा गाडा पूर्णपणे विस्कळीत करून टाकला. महाराष्ट्राच्या जवळजवळ सर्व भागांना पुराचा फटका बसला. मुसळधार आणि सतत कोसळणारा पाऊस, धरणातून पाणी सोडल्यामुळे नद्यांना आलेले अक्राळविक्राळ स्वरूप, पुराने दिवसेंदिवस वेढलेली गावेच्या गावे, अनेक माणसांचा मृत्यू, पिके, घरे, गुरे, शेतजमिनी यांचा केवळ काही तासात झालेला विध्वंस, अशा प्रकारचे पुरामुळे घडणारे सर्वंकष नुकसान आणि तीव्र मानसिक धक्का संपूर्ण महाराष्ट्राने प्रथमच अनुभवला. पुराने दिलेल्या जबरदस्त धक्क्याने पूर येण्यामागच्या कारणांची चर्चा सुरु झाली. 'अनेक वर्षांचे उच्चांक मोडणारा विक्रमी पाऊस' हेच या अरिष्टामागचे एकमेव कारण म्हणून शासनाने पुढे केले. याचबरोबर कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणातून वेळेवर आणि पुरेसे पाणी न सोडल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील पुराची तीव्रता अनेक पटींनी वाढली असेही सांगण्यात आले.

विविध माध्यमातून पुराच्या कारणांची जी चर्चा व विश्लेषण करण्यात आले त्याचा मोठा भर मुंबईच्या पुरावर केंद्रित राहिला. केवळ अतिवृष्टीमुळे नव्हे तर मुंबई शहराच्या अविचारी, अनियंत्रित आणि निसर्गविरोधी विकासामुळे मुंबईवर आपत्ती कशी कोसळली याविषयी अभ्यासपूर्ण मांडणी करणारे विविध दृष्टिकोन माध्यमातून पुढे आले. मात्र, मुंबई सोडून महाराष्ट्राच्या विविध भागातील, विशेषत: ग्रामीण महाराष्ट्रातील पुराची सखोल कारणमीमांसा पुढे आली नाही. महाराष्ट्रातील पर्यावरण तज्ज्ञ, विकास विषयक अभ्यासक आणि कार्यकर्ते यांनी त्यांच्या भागातील पर्यावरणाकडे दुर्लक्ष करून घडवलेला विकास प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या पुराचे कारण कसे ठरला याची काही प्रमाणात मांडणी केली. तरीदेखील या प्रश्नाचे गंभीर आणि व्यापक स्वरूप पाहता यावर पुरेशी चर्चादेखील नागरी समाजात छेडली गेली नाही, असे खेदाने म्हणावेसे वाटते. पुरामागील कारणांचा मुद्दा काही दिवसातच मागे पडून सरकारने जाहीर केलेल्या नुकसान भरपाईची योग्यायोग्यता, सरकारने केलेल्या पंचनाम्याची वैधता, खऱ्या पूरग्रस्तांनाच मदत मिळण्याची गरज, मदतीमध्ये शिरलेले राजकारण यावर माध्यमांचे लक्ष केंद्रित झाले. आता तर पुराशी संबंध असणारी सर्वच चर्चा माध्यमांमधून लुप्त झाली आहे. जणू काही पुराचा प्रश्न फक्त पूरग्रस्त लोकांचाच असावा आणि बाकी समाजाला त्याच्याशी काहीच देणेघेणे नसावे असे वातावरण आज सर्वत्र आहे. अशा परिस्थितीत अतिवृष्टी आणि पुराच्या अरिष्टामागील कारणांची सखोल मीमांसा होण्याची गरज लक्षात घेऊन प्रयासने हा अहवाल तयार केला आहे.

हा अहवाल रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील पेण, रोहा, माणगाव, महाड, खेड, चिपळूण, गुहागर, आणि संगमेश्वर या आठ तालुक्यातील ४७ वाड्यांमध्ये केलेल्या क्षेत्र पाहाणीवर आधारीत आहे. 'पूर व अतिवृष्टीने घडविलेले नुकसान आणि त्याचे विविधांगी परिणाम लोकांच्या दृष्टिकोनातून समजून घेणे आणि शासनाच्या तात्कालिक व दीर्घकालीन उपाययोजनांबाबत लोकांचे अनुभव आणि अपेक्षा जाणून घेणे' हा या पाहाणीचा उद्देश होता. पाहाणीसाठी वाड्या निवडताना त्या त्या भागातील संघटना–संस्था यांच्या मदतीने मुख्यतः दुर्गम भागातील नुकसानग्रस्त वाड्या निवडण्यावर भर दिला गेला. नुकसानग्रस्त लोक, त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या संस्था–संघटनांचे कार्यकर्ते यांच्याबरोबर सविस्तर बोलून आणि सरकारी अधिकारी, कृषी विषयातील तज्ज्ञ यांच्या मुलाखती घेऊन हा अभ्यास करण्यात आला. हा अभ्यास गुणात्मक स्वरूपाचा (qualitative) आहे. अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान व त्याचे परिणाम याबाबत संख्यात्मक माहिती या अहवालात नसून स्थानिक लोकांच्या नजरेतून अरिष्ट समजून घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. त्यामुळे नुकसानाचे विविध प्रकार व त्याची कारणे, नुकसानाचा लोकांच्या जगण्यावर झालेला परिणाम, नुकसानाचे मोजमाप करण्याच्या शासकीय प्रक्रियेतील लोकांचे अनुभव, सरकारने दिलेल्या तातडीच्या मदतीबद्दल लोकांचे अनुभव व अपेक्षा आणि नुकसानभरपाई व दीर्घकालीन पुनर्वसनाबाबत लोकांच्या अपेक्षा याबाबत लोकांशी आणि कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. कोणत्याही अरिष्टाचा परिणाम समाजातील तळाच्या गटावर सर्वाधिक होतो या विचाराने शेतमजूर, भूमिहीन दलित, आदिवासी, स्त्रिया या गटातील

लोकांशी संवाद साधून त्यांचे अनुभव आणि अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. या सर्वातून जे चित्र पुढे आले ते या अहवालात मांडले आहे. या अहवालातून पुढे येणारी माहिती आणि विश्लेषण यांच्या आधारे अरिष्टाच्या मुळाशी कोणती कारणे आहेत याबद्दल समाजात व्यापक चर्चा घडावी, अशी अपेक्षा आहे. अशा प्रकारची अरिष्टे पुन्हा उद्‌भवू नयेत यासाठी तातडीने कोणती पावले उचलण्याची गरज आहे याविषयी आपण सर्वांनी स्पष्टता आणणे गरजेचे आहे. तसेच आत्ताच्या अरिष्टाचा ज्या लोकांना फटका बसला त्यांच्यासाठी तात्पुरती, वरवरची उपाययोजना करुन भागणार नाही. अरिष्टाचा लोकांच्या उपजीविकेवरील सर्वंकष आघात लक्षात घेऊन पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी शासनाने दीर्घकालीन कार्यक्रम आखण्याची तीव्र गरज आहे. हा दीर्घकालीन कार्यक्रम आखण्यासाठी शासनाला ठोस सूचना करणे हा या अहवालाचा एक हेतू आहे. हा अहवाल कोकणातील पुराविषयी बोलत असला तरी या विषयाची व्याप्ती लक्षात घेता त्याची उपयुक्तता केवळ कोकणातील अरिष्टापुरती मर्यादित नाही हे उघड आहे. कोकणातील अरिष्टाच्या निमित्ताने शासनाच्या अरिष्टविषयक धोरणांची चिकित्सा करणे आणि त्यामध्ये लोकाभिमुख बदल सुचवणे गरजेचे आहे या भूमिकेतून हा अहवाल लिहिला आहे. (अहवालामध्ये 'डिझॅस्टर' या इंग्रजी शब्दाशी समानार्थी म्हणून अरिष्ट असा शब्दप्रयोग योजिला आहे. अतिवृष्टी हा जरी नैसर्गिक अपघात असला तरी विविध कारणांमुळे त्याचे रूपांतर पूर आणि दरडी कोसळण्याच्या नैसर्गिक अरिष्टात झालेले दिसते. त्यातून उद्‌भवणाऱ्या समस्यांची तीव्रता दर्शविण्यासाठी आपत्तीपेक्षा अरिष्ट हा शब्द जास्त योग्य वाटतो म्हणून अरिष्ट असा उल्लेख केला आहे.)

भारत सरकारचा आतापर्यंतचा अरिष्ट व्यवस्थापनाचा दृष्टिकोन व धोरण हे अरिष्टकालीन मदत व पुनर्वसनापुरते मर्यादित होते. भारताच्या अरिष्ट व्यवस्थापनाच्या या दृष्टिकोनात आता मोठा बदल येऊ घातला आहे असे दिसते. केवळ अरिष्ठकालीन मदत व पुनर्वसनाबरोबरच अरिष्टाचा प्रतिबंध व निवारणाचा समावेश करून अरिष्टव्यवस्थापनाचे नवे विधेयक संसदेत यावर्षी मांडले गेले. याला अनुसरुन, महाराष्ट्रासाठी व्यापक दृष्टिकोन असलेले नवीन अरिष्ट व्यवस्थापनाचे विधेयक यंदाच्या हिवाळी अधिवेशनात आणण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी नुकतेच दिले आहे. 'महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' अशी नवीन यंत्रणा उभी करण्याची प्रक्रियाही सरू होणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक मदतीने पुणे, रत्नागिरी आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये लोक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने 'आपत्तीला' तोंड देण्यासाठी तीन वर्षांचा कार्यक्रम सुरू आहे. गाव पातळीवर 'आपत्ती व्यवस्थापन समित्या' नेमण्याचे व त्या आधारे प्रत्येक गावाचा 'आपत्ती व्यवस्थापन आराखडा' तयार करण्याचे काम या कार्यक्रमांतर्गत चालू आहे. 'आपत्ती व्यवस्थापना'विषयी सुरू असलेल्या या सर्व प्रक्रियांमध्ये योग्य हस्तक्षेप करण्याची तीव्र गरज आज आहे. या अहवालाच्या निमित्ताने या विषयावर चर्चा व विचारविनिमय सुरू व्हावा अशी अपेक्षा आहे.

अहवालाच्या पहिल्या भागात कोकणातील अरिष्टाला सरकारने दिलेल्या प्रतिसादाविषयी मांडणी केली आहे. दुसऱ्या भागात पुरामुळे शेतीव्यवस्थेचे झालेले नुकसान आणि त्याचे परिणाम यांची चर्चा केली आहे. तिसऱ्या भागात घरे, गुरे, पायाभूत सुविधा या प्रकारचे नुकसान आणि त्याचे परिणाम यांची मांडणी केली आहे. स्त्रिया आणि आदिवासी यांच्यासारख्या वंचित गटांवर आताच्या अरिष्टाचा काय परिणाम झाला याची चर्चा चौथ्या आणि पाचव्या भागात केली आहे. परिसंस्थात्मक दृष्टिकोनातून अरिष्टाची समीक्षा करण्याचा प्रयत्न सहाव्या भागात केला आहे. तर सातव्या भागात अरिष्टावर उपाययोजना करताना व्यापक दृष्टिकोन अवलंबण्याची गरज कशी आहे, याची मांडणी केली आहे. हा अहवाल प्रयासने लिहिला असला तरी तो तयार करण्यात अनेक व्यक्तींचे व संस्था-संघटनांचे मोलाचे योगदान आहे. या सर्वांच्या मदतीशिवाय हा अहवाल तयार होऊच शकला नसता. या सर्वांचे ऋण आम्ही कृतज्ञतापूर्वक मान्य करतो. या अहवालात काही न्यून असेल तर त्याची जबाबदारी मात्र पूर्णत: आमची आहे.



# कोकणातील अरिष्ट आणि शासनाचा प्रतिसाद

**ज्या कोकणातील अरिष्टाची चर्चा आपण या अहवालात करणार आहोत, त्या कोकणाची विविधांगी पण थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न या प्रकरणातील भाग एक मध्ये केला आहे. तर भाग दोन मध्ये जुलैमधील अरिष्टामुळे राज्यभरातील जनजीवन विस्कळित कसे झाले आहे, याचा आढावा घेतला आहे. या अरिष्टाला शासनाने दिलेला तातडीचा प्रतिसाद कसा होता याची चर्चा भाग तीनमध्ये केली आहे.**

## १. कोकणची ओळख

### भूगोल व निसर्ग

भारताच्या पश्चिम समुद्र किनाऱ्यावरील, ७२० कि.मी. लांबीचा व ५० ते ६० कि.मी. रुंदीचा महाराष्ट्रातील चिंचोळा पट्टा म्हणजे कोकण. पूर्वेला उंच सह्याद्री पर्वत रांगा (उंची सुमारे १००० ते १५०० मीटर) तर पश्चिमेकडे खोल किनारपट्टी असलेला अरबी समुद्र असा वैविध्यपूर्ण भूभाग या अरुंद कोकण पट्टीत सामावला आहे. पश्चिमेकडचा समुद्र–किनारपट्टी–खाड्यांचा प्रदेश, मधला कमी उंचीच्या डोंगरांचा उंच–सखल प्रदेश व पूर्वेकडचा सह्याद्रीच्या पर्वतरांगांनी व्यापलेला उंच डोंगर उतारांचा प्रदेश अशा तीन प्रमुख भौगोलिक रचना कोकणात आढळतात. थोड्याशा अंतरावरसुद्धा बदलणारी भौगोलिक रचना हे कोकणचे वैशिष्ट्य आहे. अरबी समुद्राचे सान्निध्य व उंच डोंगर रांगा यामुळे कोकणात पावसाळ्यात २००० मि.मि ते ५००० मि.मि. एवढा मुसळधार पाऊस पडतो. पाऊस, तापमान, आर्द्रता, डोंगर उतार, जैवविविधता, भौगोलिक विविधता अशा अनेक नैसर्गिक घटकांची तीव्रता कोकणात जास्त आढळते. या वैशिष्ट्यपूर्ण नैसर्गिक रचनेमुळे कोकणातील परिसंस्था ही नाजूक परिसंस्था (Fragile ecosystem) म्हणून गणली जाते. या नाजूक नैसर्गिक रचनेत कोणताही विपरीत बदल झाला तर त्याचे दूरगामी परिणाम होताना दिसतात.

### संसाधने व अर्थव्यवस्था

ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या चार प्रशासकीय जिल्ह्यांमध्ये कोकण प्रदेश विभागलेला आहे. कोकणात एकूण लोकसंख्येच्या साडेअकरा टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. डहाणू, मुरबाड, वाडा, पेण, कर्जत, सुधागड, रोहा, माणगाव येथे प्रामुख्याने एकवटलेले आदिवासी लोक दुर्गम वाड्यांमध्ये मूलभूत सुविधांअभावी राहतात. तर मुंबईला लागून असलेला कोकणचा भाग अत्यंत शहरी, आधुनिक विकास झालेला असा आहे. या दोन टोकांच्या मध्ये शहरी भागाचा प्रभाव जाणवणारा निमशहरी भाग आणि ग्रामीण कोकण असे भाग आहेत. कोकणातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. मात्र डोंगराळ भाग व खाडी प्रदेश यामुळे कोकणात सपाट व शेतीयोग्य भूभाग कमी आहे. तसेच शेतजमिनीची सुपीकतासुद्धा कमी आहे. त्यामुळे कोकणात शेतीच्या उत्पादकतेवर मर्यादा आहेत. कोकणात डोंगराळ प्रदेशामुळे मोठी धरणे बांधून जास्त प्रमाणात पाणी साठवता येत नाही. त्यामुळे सिंचनावर मुळातच मर्यादा आहेत. पाण्याचा पुरवठा मुख्यतः विहिरींपासून होतो. भात, नाचणी ही कोकणातील मुख्य धान्यपिके, तर तूर, कुळीथ, वाल, पावटा ही कडधान्य पिके आहेत. या व्यतिरिक्त डोंगराळ भागामध्ये प्रामुख्याने आंबा, काजू, फणस, कोकमच्या फळबागा आढळतात. फळबागांव्यतिरिक्त डोंगराळ भागातील जंगलांमधून साग, ऐन, मोह, खैर यासारख्या झाडांची तसेच विविध वनौषधींची तोड व विक्री होते. वन खात्यांच्या जमिनीव्यतिरिक्त कोकणात खाजगी जमिनीवरच्या जंगलांचे प्रमाणही मोठे आहे. किनारपट्टी व खाडीच्या प्रदेशामुळे मासेमारीचा मोठा व्यवसाय कोकणात चालतो.

कोकणात ठिकठिकाणी बॉक्साईट आणि इतर अनेक उपयुक्त खनिजांचे साठे सापडतात. पूर्वीपासून कोकणातील विविध नैसर्गिक संसाधनांचा व्यापार बाहेरील प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसते. सागासारखे मौल्यवान लाकूड, वनौषधी, मासे, खनिजे, फळे अशा विविध नैसर्गिक उत्पादनांचा मोठा व्यापार कोकणातील बंदरांमधून होत असे. यामुळे मध्यभागातील नदीच्या पट्ट्यात मोठ्या बाजारपेठा उभ्या





राहिल्या. खाडीचा प्रदेश या मधल्या भागापासून सुरु होत असल्यामुळे तेथपर्यंत बोटींचा वापर करून जलवाहतूक होत असे. चिपळूण, कल्याण, पनवेल यासारखी शहरे या जलवाहतुकीसाठी महत्त्वाच्या बाजारपेठा म्हणून उभी राहिली.

या विकेंद्रित आर्थिक व्यवस्थेला मोठी खीळ बसली ती मुंबईचे वाढते औद्योगिकरण व त्यातून वेग घेतलेल्या शहरीकरणामुळे. मुंबई शहराच्या विकासाच्या सुरुवातीच्या काळात मुंबईतील कापड–गिरण्यांमध्ये मजूर म्हणून कोकणातील तरूण वर्ग मोठ्या प्रमाणावर रुजू झाला. यातून जवळपास घरटी एक व्यक्ती मुंबईला स्थलांतरित झाली आणि गावात राहणाऱ्या कुटुंबाला मनी ऑर्डरच्याद्वारे पैसे मिळू लागले. यामुळे मुंबईच्या अर्थकारणावर कोकणचे एक प्रकारचे अवलंबित्व तयार झाले. यालाच 'मनी–ऑर्डर इकॉनॉमी' अशी संज्ञा प्रचलित झाली. पुरुष शहरात गेल्यामुळे स्त्रियांना गावात कुटुंबाची जबाबदारी घेणे व शेतीचा आणि अन्य कामाचा बोजा उचलणे भाग पडले. सन २००१ च्या जनगणनेनुसार कोकणात ५२% पुरुष तर ४८% स्त्रिया आढळतात. रोजगारानिमित्त बाहेर जाणाऱ्या पुरुषांची संख्या लक्षणीय असल्यामुळे कुटुंबाच्या उपजीविकेचा भार एकट्याने वाहणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कोकणात अधिक आढळते.


**जमीनमालकीचे प्रश्न**

कोकणातील विविध आर्थिक, सामाजिक प्रश्नांपैकी महत्त्वाचा म्हणजे जमीन मालकीचा प्रश्न. कूळ कायद्यानुसार कसणाऱ्याची जमीन असली तरी कोकणात त्याची यशस्वी अंमलबजावणी झाली नाही. जमीन मालकीच्या बाबतीत कोकणात प्रचंड विषमता आहे. आदिवासी पिढ्यान्‌पिढ्या कसत असणाऱ्या पण त्यांच्या नावावर नसलेल्या दळी जमिनी, जंगल अतिक्रमित जमिनी, एक–साली जमिनी, लँड सिलिंग जमिनी असे जमिनींचे विविध प्रश्न आजही रखडलेल्या अवस्थेत आहेत. इतर समाजातसुद्धा बेदखल कुळांचा प्रश्न मोठा आहे. अशाप्रकारे जमिनीच्या मालकीच्या केंद्रीकरणामुळे मोठी लोकसंख्या जमिनीवरील हक्कापासून वंचित आहे. परिणामी, त्यांचा व त्यांच्या पुढील पिढ्यांचा उपजीविकेचा प्रश्न बिकट बनला आहे.

**बदलते वास्तव**

औद्योगिक विकास घडवण्यासाठी कोकणातील नैसर्गिक संपत्तीचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्याचे दिसते. मुंबई व इतर ठिकाणची कोळशाची गरज भागविण्यासाठी कोकणात मोठ्या प्रमाणावर जंगलतोड झाली. जंगलांच्या नाशामुळे डोंगर ओस पडणे, मातीची धूप होणे त्यामुळे नदी, ओढे गाळाने भरणे असे अनेकविध परिणाम कोकणात जाणवू लागले. मुंबईमध्ये उद्योगांना जागा कमी पडू लागल्यावर कोकणामध्ये उद्योगांचा विस्तार सुरु झाला. नद्या–खाडी–समुद्राला लागून विशेषतः रासायनिक कारखाने उभारले तर प्रदूषणाला समुद्रात वाट करून देणे सहज शक्य होईल या हेतूने एम.आय.डी.सी. अंतर्गत अनेक कारखाने कोकणात उभे राहिले. या कारखान्यांत स्थानिक लोकांना काही वर्षे रोजगार उपलब्ध झाले, पण वेगवेगळ्या कारणांमुळे अनेक कारखाने बंद पडायला सुरवात झाली. अनेक ठिकाणी स्थानिक लोकांच्या जमिनी कारखान्यांनी घेतल्या, पाणी–जमीन प्रदूषित केले आणि कारखाने बंद झाल्यानंतर रोजगारही संपुष्टात आले. गेल्या दोन–अडीच दशकात कोकणातील मोठ्या लोकसंख्येला आसरा देणाऱ्या मुंबईतील कापड गिरण्याही बंद पडल्या. यामुळे अनेक ठिकाणी गिरणी कामगारांना आपल्या गावी परतावे लागलेले दिसते. अशा तऱ्हेने कोकणातील लोकांच्या रोजगाराच्या संधीचा संकोच वेगवेगळ्या मार्गांनी झालेला दिसतो. या पार्श्वभूमीवर आज कोकणातल्या लोकांना रोजगाराचे खूपच मर्यादित पर्याय दिसतात. मुंबईला जाऊन मिळेल ते काम करणे, दलालाला पैसे देऊन आखाती राष्ट्रात जाऊन मिळेल ते काम करणे किंवा गावात राहून मर्यादित स्वरूपाचा स्वयंरोजगार आणि भातशेती करणे यापलीकडे वेगळे पर्याय आज लोकांना दिसत नाहीत.

कोकणासारख्या दुर्गम व नाजूक नैसर्गिक रचना असलेल्या प्रदेशात अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा कोकणरेल्वेची उभारणी १५ वर्षांपूर्वी केली गेली. कोकणच्या विकासाच्या नावाखाली सुरू झालेल्या



कोकण रेल्वेचा स्थानिक लोकांना फारसा फायदा झाला नाही असेच दिसते. पण त्यामुळे कोकणामध्ये बाहेरच्या लोकांचा मात्र मोठ्या प्रमाणात शिरकाव झाला. फार्म हाऊस, कंत्राटी शेती, रिसॉर्ट्स/हॉटेल्स तसेच कारखान्यांच्या नावाखाली शहरातील भांडवलदार आणि श्रीमंत वर्गाकडून ग्रामीण कोकणातील जमिनी हस्तगत करण्याचे प्रमाण मोठे आहे. मच्छिमारीमध्ये बड्या व्यावसायिकांच्या मोठमोठ्या ट्रॉलर्स (बोटी) मुळे स्थानिक छोट्या मच्छिमारांवर संकट येत आहे. आधुनिक विकासाच्या नावाने केले जाणारे बाह्य हस्तक्षेप आणि कोकणातील नैसर्गिक परिस्थितीच्या मर्यादा धुडकावून केले जाणारे प्रकल्प यामुळे शेती, मच्छिमारी, जंगलाधारित उपजीविका या सारख्या पारंपरिक उपजीविका–पद्धतीवर मोठे गंडांतर येत असून उपजीविकेचे इतर पर्याय मात्र कोकणात संपुष्टात येताना दिसतात. यामुळे प्रचंड नैसर्गिक साधनसंपत्ती असूनदेखील कोकणातील बहुसंख्य लोकांपुढील जगण्याचे प्रश्न दिवसेंदिवस अधिकाधिक तीव्र बनत चालले आहेत. यावर्षीच्या अरिष्टाने नैसर्गिक संपत्तीचे मोठे नुकसान झाल्यामुळे कोकणातील अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसला आहे.

## २. जुलैमधील अरिष्ट

### पावसाचे महाराष्ट्रातील तांडव

२४ जुलै ते २ ऑगस्ट या काळात महाराष्ट्रात अभूतपूर्व असा पाऊस झाला. कोकण, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा या भागातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टी आणि पूर यांनी थैमान घातले. पश्चिम महाराष्ट्रात सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांना पुराचा मोठा तडाखा बसला. कृष्णा, कोयना, पंचगंगा, भोगावती या नद्यांना महापूर आला. कोयना धरणातून त्याच्या क्षमतेपेक्षा कितीतरी जास्त पाणी या काळात सोडून द्यावे लागले. त्यामुळे नदीकाठची शेकडो गावे पुराच्या पाण्याने अनेक दिवस वेढली गेली. हजारो लोकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे लागले. विदर्भामध्ये यवतमाळ, अमरावती, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यात प्रचंड पाऊस होऊन वैनगंगा, वेण्णा, धोम या नद्यांना पूर आला. नद्यांना आलेल्या पुराने नदीकाठच्या शेतीला मोठा फटका बसला. येथेही सुमारे एक लाख लोकांचे स्थलांतर करावे लागले. प. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या चक्रीवादळामुळे आंध्रच्या शेजारील मराठवाड्यात विक्रमी पाऊस झाला. अतिवृष्टी आणि पूर यामुळे राज्यभर मोठ्या प्रमाणावर जीवितहानी, जनावरे वाहून जाणे, हजारो हेक्टर क्षेत्रातील पीक नष्ट होणे, जमिनी वाहून जाणे, घरांची वाताहत, असे भयावह परिणाम घडले. (अतिवृष्टीने घडविलेल्या नुकसानाची सरकारने जाहीर केलेली काही आकडेवारी परिशिष्ट १ मध्ये दिली आहे.)


प. महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा याप्रमाणेच मुंबईतही जोरदार अतिवृष्टी झाली. मिठी नदीच्या पुराने मुंबईतील पूर्व आणि पश्चिम उपनगरात पाणी तुंबून मुख्यत: गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांना जबरदस्त तडाखा बसला. प्रचंड वित्तहानीबरोबरच मोठी मनुष्यहानीदेखील मुंबईत घडली. मुंबई पुराने वेढली जाताच बहुतेक प्रसारमाध्यमांनी आपले लक्ष मुंबईवर केंद्रित केले आणि मुंबईवरील संकटाची भीषणता मोठ्या प्रमाणावर पुढे आणली गेली. यामुळे महाराष्ट्राच्या इतर भागातील अरिष्टाचे परिणाम व नुकसानाची तीव्रता नजरेआड झाली.

### कोकणातील अरिष्ट

या काळात कोकणालाही प्रचंड मुसळधार पावसाने झोडपून काढले. कोकणात दरवर्षी सरासरी ३५०० मि.मि. इतका पाऊस पडतो. परंतु यावर्षी केवळ दहा दिवसात कोकणात १५४४ मि.मि. इतका प्रचंड पाऊस पडला. दि. २४ जुलै व २५ जुलै या सलग दोन दिवसात कोकणात ५४३ मि.मि. इतका विक्रमी पाऊस झाला. पावसाच्या या रौद्र स्वरूपामुळे कोकणामध्ये मोठा हाहाकार उडाला. सावित्री, वशिष्ठी, पाताळगंगा, गांधारी, काळ,



**आधुनिक विकासाच्या नावाने केले जाणारे बाह्य हस्तक्षेप आणि कोकणातील नैसर्गिक परिस्थितीच्या मर्यादा धुडकावून केले जाणारे प्रकल्प यामुळे शेती, मच्छिमारी, जंगलाधारित उपजीविका या सारख्या पारंपारिक उपजीविका– पद्धतीवर मोठे गंडांतर येत असून उपजीविकेचे इतर पर्याय मात्र कोकणात संपुष्टात येताना दिसतात.**



**ओढे–नद्या–खाड्यांमधून मिळणाऱ्या जीवनाधार सेवांच्या सातत्याला आणि त्यावर अवलंबून असलेल्या असंख्य लोकांच्या उपजीविकेला मोठाच धक्का बसलेला आहे.**

कुंडलिका या लहानमोठया नद्यांना पूर येऊन त्यांच्या काठच्या शेतीची पुरती वाताहत झाली. प्रचंड पर्जन्यवृष्टी आणि त्याच सुमारास अरबी समुद्राला आलेली भरती यामुळे कोकणातील महापुराची तीव्रता वाढली. पेण, नागोठणे, महाड, खेड, चिपळूण, आदी शहरे पाण्याखाली गेली. अनेक माणसे कोसळलेल्या दरडींखाली गाडली गेली. पुराचे पाणी लोकांच्या घरात, दुकानात, गोठ्यात शिरून तीन–तीन दिवस हटले नाही. डोंगराला तडे जाणे, प्रचंड मोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे, रेल्वे भराव वाहून जाणे, मोठमोठी झाडे कोसळणे असे प्रकार कोकणात सर्वत्र दिसतात. दरडी कोसळण्याची शक्यता आहे अशा अनेक ठिकाणी आजही लोक जीव मुठीत घेऊन राहात आहेत. घरे कोसळणे, वाहून जाणे यामुळे लोकांनी कष्टाने जमवलेला संसार उद्ध्वस्त झाला. अतिवृष्टी आणि पुरानंतर विविध भागात साथीचे रोग पसरले. यामुळे लोकांच्या हलाखीत आणखी भर पडली. पनवेल, गोरेगाव, रोहा, पोलादपूर, येथील शासकीय गोदामात पाणी साठून हजारो क्विंटल धान्याला बुरशी लागली. भराव वाहून जाणे, रेल्वेमार्गावर पाणी साठणे, व दरडी कोसळणे यामुळे कोकण रेल्वेचे प्रचंड नुकसान झाले.

अशा तऱ्हेने जुलै–ऑगस्टमधील महापुराने महाराष्ट्राच्या विविध भागातील लाखो लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. अशा अरिष्टाला तातडीचा प्रतिसाद म्हणून जी मदत लोकांना पुरानंतर लगेच शासनाकडून पोचवली गेली, तिच्याबाबतचा कोकणातील लोकांचा अनुभव आणि त्यांच्या अपेक्षा यांची मांडणी पुढील भागात केली आहे.

## ३. अरिष्टाला शासनाचा प्रतिसाद नेहमीची (रड) कथा

अतिवृष्टीच्या अपघातामुळे कोकणात पूर आणि दरड कोसळण्याचे नैसर्गिक अरिष्ट ओढवले. परिणामी जनजीवन ठप्प झाले. अरिष्टग्रस्तांच्या मदतीसाठी तातडीने धावण्याची निकड निर्माण झाली. कोलमडलेली वाहतूकव्यवस्था आणि बंद पडलेले दळणवळण यामुळे स्वयंसेवी आणि बिगर–सरकारी क्षेत्रातून मदतीचा ओघ सुरू होईपर्यंतही काही काळ जावा लागला. नैसर्गिक अरिष्टाची व्याप्ती आणि तीव्रता लक्षात घेता, या आणीबाणीच्या काळात कानाकोपऱ्यातील अरिष्टग्रस्तांपर्यंत तातडीची मदत पोचवणे हे शासनयंत्रणेसमोरचे मोठेच आव्हान होते. स्थानिकांचे अनुभव आणि म्हणणे समजून घेताना, शासनाने हे आव्हान कसे पेलले आहे याचे प्राथमिक चित्र तयार होत गेले. तातडीची मदत हा भविष्यातील दीर्घकालीन पुनर्वसनाचा पाया असतो. त्यामुळे त्याबाबतचे स्थानिकांचे अनुभव समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

शासनाने तातडीने दिलेला प्रतिसाद मुख्यत: दोन प्रकारचा होता – नुकसानग्रस्त कुटुंबांना शासनाने वाटलेली तातडीची मदत (रिलीफ) आणि शेती व इतर प्रकारच्या नुकसानाचे मोजमाप.

### तातडीच्या मदतीचे वाटप

तातडीच्या मदतीमधे चार बाबींचा समावेश होता: अ) धान्य आणि रॉकेल ब) घरांच्या नुकसानाबद्दल आर्थिक मदत क) दरड कोसळलेल्या ठिकाणच्या कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी तातडीने हलवणे आणि, ड) कुटुंबातील मृत्यूसाठी आर्थिक अनुदान. या चारही बाबींची चर्चा यापुढे केली आहे.

### अ. धान्य आणि रॉकेल

शासनाने जाहीर केल्याप्रमाणे सर्व आपद्ग्रस्तांना १० किलो तांदूळ, १० क़िलो डाळ, आणि १० लिटर रॉकेल मिळणे अपेक्षित होते. मुळातच १० क़िलो तांदूळ व डाळ ही अतिशय अपुरी मदत आहे. घरे वाहून गेल्यावर इतकी तुटपुंजी मदत जाहीर करणे ही तर आपद्ग्रस्तांची चेष्टाच. पण ही तुटपुंजी मदतही सर्वांना आणि जेवढी जाहीर केली तेवढी मिळाली नाही. काही ठिकाणी यापेक्षा कमी मदत मिळाल्याची तक्रार स्थानिकांनी नोंदवली. काही ठिकाणी, विशेषत: आदिवासी वाड्यांमधे ही मदत मिळालीच नसल्याची तक्रार होती. काही ठिकाणी केवळ दलित कुटुंबांना वगळले गेल्याच्या तक्रारी होत्या. ज्या गावाला/समाजगटाला राजकीय पुढाऱ्यांचा पाठिंबा होता त्यांना ही मदत मिळण्यात कसलीच अडचण आली नाही, असेही काही

उदाहरणांमधून दिसून आले. अशा उदाहरणांमधे आदिवासी वा दलितांचा समावेश असल्याचे मात्र कधीही दिसले नाही.

अशा प्रकारच्या भेदभावाबरोबरच ही मदत पोचण्यास अतिशय विलंब झाल्याची तक्रार स्थानिकांनी अनेक ठिकाणी नोंदवली. अरिष्टानंतर लगेचच नुकसानाचा नजरअंदाज बांधण्यात आणि घरांच्या नुकसानाचे सर्वेक्षण करण्यामध्ये सरकारी यंत्रणा बराच काळ गुंतलेली होती. त्यामुळे प्रत्यक्ष अतिवृष्टीच्या व पुराच्या घटनेनंतर तब्बल १५ दिवसांनंतर तातडीची मदत वाटण्याची प्रक्रिया सुरू झाली व त्यानंतर दीड ते दोन महिने ही प्रक्रिया सुरू होती. अर्थातच या विलंबाची झळ वंचित कुटुंबांना अधिक तीव्रतेने पोचली.

**ब. घरांच्या नुकसानाबद्दल आर्थिक मदत**

शासनाने अंशतः नुकसान झालेल्या घरांसाठी रु.२४०० आणि ५०% पेक्षा जास्त नुकसान झालेल्या घरांसाठी रु. ४८०० अशी सरसकट मदत वाटली. याशिवाय नुकसानग्रस्त कुटुंबास माणशी रु. १००० प्रमाणे तातडीची मदत वाटली गेली. सदर रक्कम ठरवण्यामागील निकष काय होते, याची काहीही स्पष्टता कुटुंबांना देण्यात आली नाही. त्याबाबत शासकीय अधिकाऱ्यांमधेही काही ठिकाणी गोंधळ दिसून आला. ही मदतच शासनाने दिलेली नुकसानभरपाई आहे असे मत काही अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. तर काहींनी शासन नुकसानभरपाई देत नसून केवळ मदतीच्या भूमिकेतून सदर रकमा वाटते आहे असे सांगितले. या रकमेचे विषम वाटप झाल्याच्या तक्रारी अरिष्टग्रस्त कुटुंबांनी अनेक ठिकाणी केल्या. एवढेच नव्हे, तर प्रत्येक कुटुंबामागे १०० ते २०० रु. लाच घेतली गेल्याचा अनुभव अनेक अरिष्टग्रस्त कुटुंबांनी सांगितला. शिवाय घरातील आजारपणे, कपडे, भांडी, सणवार यात ही रक्कम केव्हाच संपून गेली आहे. त्यामुळे घरांच्या दुरुस्तीचे काम अरिष्टग्रस्तांसमोर आ वासून उभे आहे.

**क. दरड कोसळलेल्या ठिकाणच्या कुटुंबांना तातडीने हलवणे**

दरड कोसळल्यामुळे जिथे गावे/वस्त्या गाडल्या गेल्या, तिथे स्थानिकांना तातडीने हलवणे नितांत गरजेचे होते. काही ठिकाणी इतर स्थानिकांनी त्यासाठी मदत केली, तर काही ठिकाणी शासनाला ही जबाबदारी घ्यावी लागली. अशा सर्वस्व गमावलेल्या कुटुंबांना सुरक्षित निवाऱ्याबरोबरच दैनंदिन जगण्यासाठी किमान मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणेही आवश्यक होते. प्रत्यक्षात मात्र त्यांचा संपूर्ण अभाव असल्याचे दिसते. ही दुर्दशा प्रामुख्याने डोंगरकपारींमधे राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांच्याच वाट्याला आलेली आहे आणि शासनाच्या लेखी एरवीही दुर्लक्षित असणारे आदिवासी आताही दुर्लक्षित राहिलेले आहेत. अशाप्रकारे आधीच सामाजिक, आर्थिक, राजकीयदृष्टया वंचित असणारे गट अरिष्टामध्ये अधिकच वंचित होतात.

**ड. कुटुंबातील मृत्यूसाठी आर्थिक अनुदान**

जीवितहानीनंतर लगेचच सरकारने आपत्तिग्रस्त कुटुंबास प्रत्येक मृत व्यक्तीमागे रु. २ लाख तर व्यक्ती अधू अथवा अपंग झाली असल्यास रु. १ लाख अशी आर्थिक मदत दिली आहे. परंतु ही रक्कम आजारपण व इतर गरजा पूर्ण करण्यात संपून जाते. मदत मिळण्याच्या प्रक्रियेत कुटुंबियांच्या नाजूक मनोवस्थेचा विचार केलेला नसतो. उदाहरणार्थ, ही मदत मिळण्यासाठी कुटुंबियांना मृताची ओळख पटवावी लागते. अशावेळी ही प्रक्रिया कुटुंबियांसाठी वेदनादायक होऊ शकते. असे प्रत्यक्षात घडल्याचे अनुभवही स्थानिकांनी काही ठिकाणी सांगितले. त्या त्या कुटुंबाच्या गरजांचा व परिस्थितीचा विचार न करता सरसकट आर्थिक मदत देण्याच्या धोरणामुळेदेखील मुळातल्या प्रश्नाची गुंतागुंत वाढते असेही स्थानिकांशी बोलताना लक्षात आले.

**शेती व इतर प्रकारच्या नुकसानाचे मोजमाप**

नुकसानभरपाईबाबतचे धोरण ठरवण्यासाठी नुकसानाचे शासनाने केलेले मोजमाप हा अतिशय महत्त्वाचा आधार असतो. त्यामुळे शेतीच्या तसेच इतर प्रकारच्या नुकसानाचे मोजमाप ठराविक निकषांच्या आधारे, तसेच स्थानिकांच्या सहभागाने व पारदर्शकपणे होणे अतिशय गरजेचे होते. प्रत्यक्षात मात्र या सर्व प्रक्रियेत अनेक गंभीर त्रुटी

## तातडीची मदत दीड महिन्यानंतर !

**माणगावजवळील रिळे या आदिवासी वाडीचे (ता. माणगाव, जि. रायगड) हे उदाहरण. जेमतेम वीस घरांची वाडी. काळ नदीपासून अगदीच जवळ. नदीला आलेल्या पुराचे पाणी आठ दिवस वाडीमध्ये होते असे स्थानिकांनी सांगितले. घरातील होते नव्हते तेवढे सामान त्यामुळे वाहून गेले. रहाण्याची पर्यायी जागा नाही, मदतीसाठी कोणीही नाही अशा अवस्थेत वाडीतच जीव मुठीत धरून राहिलेले कातकरी तहान–भुकेने व्याकूळ झाले. तरीही तातडीची मदत देण्यासाठी शासकीय यंत्रणा या वाडीत पोचलीच नाही. या भागात काम करणाऱ्या सर्वहारा संघटनेच्या कार्यकर्तीने चौकशी केल्यावर कळले की गावठाण नसल्यामुळे वाडीची कागदोपत्री नोंदच नाही. म्हणजेच शासनाच्या लेखी रिळ्याची वाडी अस्तित्वातच नाही. संघटनेच्या हस्तक्षेपामुळे तातडीची मदत या वाडीला मिळाली, पण केव्हा? तर तब्बल दीड महिन्यानंतर!**
**रिळ्याच्या वाडीप्रमाणेच बहुतेक आदिवासी वाडयांना गावठाण नाही. म्हणूनच रिळ्याची वाडी हे अशा अरिष्टग्रस्त पण शासनाच्या लेखी अस्तित्वातच नसलेल्या वाडयांचे प्रतिनिधिक उदाहरण म्हणावे लागेल.**

## शेतीची पाहाणी तलाठी कार्यालयात !

**संगमेश्वर तालुक्यातील जयगडच्या खाडीकाठचे फुणगुस हे गाव. या गावातील तलाठी कार्यालयासमोर कृषी अधिकाऱ्यांनी एक सूचनाफलक लिहिला होता. या सूचनाफलकातील मजकूर असा, ''फुणगुस मंडळातील सर्व शेतकऱ्यांना असे आवाहन करण्यात येते की, ज्या शेतकऱ्यांचे पुरामुळे, अतिवृष्टीमुळे शेतीचे नुकसान झाले असेल अशा शेतकऱ्यांनी तलाठी कार्यालयामध्ये येऊन नुकसान भरपाईसाठी अर्ज भरून द्यावेत. ----- तारखेनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. जे शेतकरी नुकसानाचा अर्ज भरून देणार नाहीत त्यांची कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.''**

आहेत अशी तक्रार प्रत्येक ठिकाणच्या स्थानिकांनी नोंदवली. शेतीचे व इतर प्रकारचे अशा दोन प्रकारच्या नुकसानाची पहाणी शासनाकडून करण्यात आली. या दोन्ही प्रकारच्या मोजमापाच्या प्रक्रियेबाबत उपस्थित झालेल्या ठळक मुद्द्यांची मांडणी खाली केलेली आहे.

**अ. इतर प्रकारच्या नुकसानाचे मोजमाप**

या नुकसानाच्या सर्वेक्षणाची जबाबदारी कृषीविस्तार अधिकारी (कृषी खाते), तलाठी (महसूल खाते) व ग्रामसेवक (ग्रामविकास खाते) अशा आंतरविभागीय तुकडीवर सोपवण्यात आली आहे. या प्रक्रियेत अनेक त्रुटी राहून गेल्याचे विविध ठिकाणच्या स्थानिकांनी नोंदवले.

- रायगड जिल्ह्यातील (रोहा व माणगाव तालुके) आदिवासी भागात अतिवृष्टीमुळे झालेल्या अनेक घरांच्या व गुरांच्या हानीचे सर्वेक्षणच झालेले नाही.
- शासनाने केवळ पुरामुळे आणि दरडींमुळे झालेल्या नुकसानाची दखल घेतली असून अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाकडे जवळजवळ दुर्लक्ष केले आहे.
- रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांमधील सर्व तालुक्यांमध्ये गुरांच्या हानीचे स्वतंत्र मोजमाप केलेले नाही. घरांच्या नुकसानाच्या तक्त्यामध्येच त्याची नोंद केली आहे. गुरांच्या हानीची तीव्रता आकडेवारीमध्ये न नोंदल्याने त्याबाबत सरकारने कोणतीही भूमिका घेतलेली नाही.
- सर्वेक्षण झाले असले तरी सरकारी अधिकाऱ्यांनी लोकांशी नीट बोलून माहिती घेतलेली नाही.

**ब. शेतीच्या नुकसानाचे मोजमाप :** याबाबत स्थानिकांनी खालील तक्रारी नोंदवल्या.

**वगळले जाणे**

बहुतेक तालुक्यांमध्ये तलाठी यादीनुसार १००% शेतजमिनीचे सर्वेक्षण झाले (तक्ते भरले गेले), तरीही अनेक शेतकरी मोजमापाच्या प्रक्रियेतून प्रामुख्याने दोन प्रकारे वगळले गेले.

कोकणातील सर्वच समाजाची भूमिहीन कुटुंबे मोठ्या प्रमाणावर इतरांच्या जमिनी कसतात. जमीन सुधारणा कायद्यास अनेक वर्षे झाली तरीही विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यात कुळांचे प्रमाण लक्षणीय आहे. शिवाय अर्धेली, शासन अतिक्रमित, आदिवासी समाजाच्या सामुदायिक दळी जमिनी इ. प्रकारच्या जमिनींवर शेती करण्याचे प्रमाण मोठे आहे. सर्वेक्षण सुरू असताना कुळांची नावे शासकीय प्रश्नावल्यांमध्ये जाऊ नयेत म्हणून जमीनदारांनी (खोतांनी) तलाठ्यांवर दबाव आणून तक्त्यांमधील नावे बदलण्यास भाग पाडले. तर आदिवासी समाजाच्या (कूळ, अतिक्रमक, दळीधारक) लागवडी सरसकट वगळल्या गेल्या. म्हणजेच जमीन कसणारी पण सरकारी कागदपत्रावर नाव नसणारी कुटुंबे वगळल्या गेलेल्या शेतकऱ्यांच्या पहिल्या प्रकारात मोडतात.

या मोजमापाच्या प्रक्रियेतून वगळली गेलेली दुसऱ्या प्रकारची बहुतेक कुटुंबे ही अनागोंदी शासकीय कारभाराची बळी आहेत. जमिनीच्या अपूर्ण नोंदी हे त्याचे प्रमुख कारण आहे. वारसांमध्ये खातेफोड न होणे, सातबाराचा उताराच नसणे, रेशनकार्डे व तत्सम कागदपत्रे नसणे अशा कारणांमुळे वगळल्या गेलेल्या कुटुंबांची संख्या लक्षणीय आहे.

**असमाधानकारक प्रक्रिया**

सर्वेक्षण झाले तेथेदेखील शासकीय तुकडीने प्रत्यक्ष शेतावर जाऊन नुकसानाची तपासणी केली नाही अशी तक्रार अनेक ठिकाणी नोंदवली गेली.

असे घडण्यामागे अनेक कारणे असू शकतात. महसूल व कृषीविस्तार यंत्रणांकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसेलही. परंतु, तेवढ्या कारणाने सखोल पाहणी करण्याचे काम टाळता येणार नाही. मोजमाप करण्याच्या कामात स्थानिकांचा, स्वयंसेवी संस्था–संघटनांचा सहभाग घेतला तर या अडचणींवर उपाय शोधता येतो. कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा ही देखील लोकांनी सांगितलेली एक प्रमुख अडचण आहे. निधीची कमतरता, राजकीय हितसंबंध व यामुळे निर्माण होणारा प्रशासकीय वरिष्ठांचा दबाव यामुळे अनेक वेळा

हेतुपुरस्सर काही कुटुंबांना सर्वेक्षणातून वगळावे लागते किंवा नुकसानाची तीव्रता कमी नोंदवावी लागते अशीही माहिती स्थानिकांनी सांगितली.

**अपुरे सर्वेक्षण**

पिकाच्या आणि जमिनीच्या या दोन्ही प्रकारच्या नुकसानामध्ये बरेच वैविध्य असून स्थानिक परिस्थितीनुसार त्यामागील कारणेही भिन्न आहेत. वास्तविक पहाता या नुकसानाचे विविध बारीकसारीक प्रकार, त्यांचे तपशील व त्यामागील कारणे यांची माहिती मिळवणे कृषी विभागास अशक्य नव्हते. कृषी विभागाच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष शेताची पहाणी केली नसल्याने सदर माहिती समोर येऊ शकली नाही. सदर माहिती शेतनुकसानाच्या मोजमापासाठीच नव्हे तर दुरुस्तीसाठी देखील अत्यंत उपयुक्त ठरली असती. कृषी विद्यापीठ, विविध कृषिसंशोधन संस्था आणि कृषी खाते यांच्यामधेदेखील या संपूर्ण काळात कोणताही समन्वय दिसला नाही. परिणामी, शेतीच्या नुकसानाचे पुरेसे समग्र चित्र पुढे आले नाही. शेतीच्या नुकसानाच्या मोजमापाच्या प्रक्रियेबाबत पुढे आलेल्या या मुद्द्यांमुळे मोजमापाची विश्वासार्हताच शंकास्पद झाली आहे.
शासनाने दिलेल्या प्रतिसादाबाबत प्रकर्षाने पुढे आलेला आणखी एक मुद्दा म्हणजे शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची अपुरी पूर्वतयारी. अरिष्टकाळामध्ये नुकसानग्रस्त कुटुंबांसोबत कोणत्या प्रकारे संवाद साधावा? संवाद साधताना कोणती दक्षता घ्यावी? या काळात तातडीच्या उपाययोजना काय असू शकतात? यंत्रणांचा समन्वय कसा असायला हवा? अशा अनेक मुद्द्यांवर प्रशासकीय पातळीवरील अधिकारी कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारे प्रशिक्षित केले नव्हते. यामुळे या अधिकाऱ्यांकडे आवश्यक तो दृष्टिकोनही नव्हता, संवेदनशीलताही नव्हती. परिणामी त्यांच्या कामात कार्यक्षमता किंवा तत्परता दिसून आली नाही.

शासनाने कोकणातील अरिष्टाला तातडीने दिलेल्या प्रतिसादाचे चित्र हे असे आहे. या पार्श्वभूमीवर शासनाकडे खालील मागण्यांसाठी आग्रह धरणे गरजेचे आहे.

**शासनाकडे करायच्या मागण्या**


१) तातडीची मदत पोचवताना भ्रष्टाचार कुठे व कसा झाला याची ताबडतोब चौकशी व्हावी आणि त्यानुसार संबंधितांवर तातडीने व जाहीरपणे कारवाई व्हावी.

२) अद्यापही तातडीची मदत पोचलेली नाही, अशी ठिकाणे शोधण्याची आणि त्या त्या ठिकाणी मदत पोचवण्याची प्रक्रिया तातडीने सुरू व्हावी.

३) सर्वेक्षणाबाबत तक्रारी नोंदवण्यासाठी तहसीलदार कार्यालयात एक विशेष कक्ष चालू करावा आणि त्यानुसार पुनर्सर्वेक्षणासाठी आदेश जारी केले जावेत.

४) तातडीची मदत सर्व आपद्ग्रस्तांपर्यंत परिणामकारकपणे पोचावी यासाठी स्थानिक पातळीवर दक्षता समित्या नेमण्यासारख्या उपायांचा निदान यापुढे तरी गांभीर्याने विचार व्हावा. यासाठी आवश्यक त्या प्रक्रिया आतापासूनच सुरु व्हाव्यात. त्याचप्रमाणे तातडीच्या मदतीबाबतच्या धोरणाचाही पुनर्विचार होण्यासाठी स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते, तज्ज्ञ आणि अभ्यासकांशी विचारविनिमयाची प्रक्रिया तातडीने सुरू व्हावी.

या सर्व मागण्यांबाबत अपुरा निधी, अपुरे मनुष्यबळ अशा प्रकारच्या नेहमीच सांगितल्या जाणाऱ्या अडचणी आताही सांगितल्या जातील. हे व्यवहार्य नाही असा आक्षेपही या मागण्यांवर घेतला जाऊ शकतो. अर्थात, राजकीय इच्छाशक्ती दाखवल्यास आणि स्थानिकांच्या सहभागातून पारदर्शक कारभार यांची सांगड घातल्यास, या मागण्या प्रत्यक्षात आणणे निश्चितच शक्य आहे. हे करणे हा शासनयंत्रणेच्या बांधिलकीचा अविभाज्य भाग आहे, असे नोंदवावेसे वाटते.



**तातडीची मदत सर्व आपद्ग्रस्तांपर्यंत परिणामकारकपणे पोचावी यासाठी स्थानिक पातळीवर दक्षता समित्या नेमण्यासारख्या उपायांचा निदान यापुढे तरी गांभीर्याने विचार व्हावा.**



# अरिष्टाचा शेतीव्यवस्थेवरील परिणाम

अतिवृष्टी आणि पुराचा तडाखा कोकणातील शेती व्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर बसला आहे. जमीन हे कोकणातील लोकांच्या जगण्याचे महत्त्वाचे साधन असून शेती आणि त्याच्याशी संलग्न इतर गोष्टींवर बहुसंख्य लोकांची उपजीविका अवलंबून आहे. यामुळे शेती व्यवस्थेच्या नुकसानाचे अतिशय दूरगामी परिणाम लोकांवर होतील, असे दिसते. कोकणामध्ये भौगोलिक वैविध्य खूप असल्यामुळे शेतीची रचना आणि शेती करण्याची पद्धत यातही विविधता आढळते. भौगोलिक स्थानानुसार कोकणातील शेतीचे मुख्यत: तीन प्रकार पडतात. १) डोंगर माथा व उतारावरील शेती, २) डोंगरांच्या दरम्यानच्या कमी उंचीच्या व थोडया सपाटीच्या प्रदेशातील शेती, आणि ३) नद्या, खाडी काठांवरच्या खूप सखल भागातील शेती. या तीनही प्रकारांतील शेती व्यवस्थेत शेतांची रचना, शेतांची बांधबंदिस्ती करण्याची पद्धत, बांध बंदिस्तीसाठी वापरले जाणारे साहित्य या सर्वांत भिन्नता आढळते. याचबरोबर डोंगराळ भाग, डोंगर उतार, खाडी किनारीची सपाटी अशा भौगोलिक रचनेतील बदलानुसार विविध भागांतील शेतजमिनींच्या तुकड्यांचे सरासरी क्षेत्रही कमी जास्त असते. या भिन्नतेमुळे शेतजमिनींवर अतिवृष्टीचा झालेला परिणामदेखील भिन्न आहे. नुकसानाचा आणि त्यावरील उपायांचा विचार करताना या भिन्नतेचे भान ठेवणे आवश्यक आहे. कोकणातील या वैविध्यामुळे शेतीव्यवस्थेच्या नुकसानाचे स्वरूप आणि तीव्रता ठिकठिकाणी बदलताना दिसते. सार्वत्रिक पातळीवर प्रचंड नुकसान झाल्याचे दिसत नाही, मात्र वेगवेगळ्या भौगोलिक पट्टयांत, विखुरलेल्या स्वरूपात व वेगवेगळ्या तीव्रतेचे नुकसान झाल्याचे दिसते. कोकणातील शेतीच्या नुकसानावरील उपाययोजनेचा विचार करताना या नुकसानाचे स्वरूप संपूर्णपणे जाणून घेणे महत्त्वाचे आहे, या उद्देशाने या प्रकरणात शेतीवरील परिणामांची चर्चा केली आहे.

नैसर्गिक अरिष्टांचा शेतीव्यवस्थेवर झालेला परिणाम मुख्यत: तीन भागांत विभागता येईल. १) शेतजमिनींचे नुकसान २) पिकांचे नुकसान आणि, ३) शेतीव्यवस्थेशी संलग्न इतर गोष्टींचे नुकसान व त्याचा शेतीव्यवस्थेवरील परिणाम. (आकृती क्र. १ पाहावी.)

**१. शेतजमिनींचे नुकसान**

यावर्षीच्या जुलै–ऑगस्टमधील अतिवृष्टी व त्यामुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे कोकणातील शेतजमिनींचे (विशेषत: भातशेतांचे) मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानाच्या तीव्रतेवरून त्याचे दोन मुख्य प्रकार पाहायला मिळतात. एक, शेतजमिनींचे दुरुस्त होण्यासारखे नुकसान. या नुकसानात मुख्यतः गाळ/माती, रेती साचल्यामुळे किंवा मातीची धूप झाल्यामुळे झालेले शेतजमिनीचे नुकसान आणि शेतांच्या बांधबंदिस्तीचे नुकसान यांचा समावेश होतो. या दोन्हीमध्ये नुकसानाची तीव्रता भौगोलिक स्थानानुसार कमी जास्त आहे.

शेतजमिनींच्या नुकसानाचा दुसरा प्रकार म्हणजे जमिनींचे कधीही न भरून येणारे नुकसान. यामध्ये मुख्यत: शेतजमिनींचा वरचा सुपीक मातीचा थर वाहून जाणे, शेतजमिनीत मोठमोठ्या दगड धोंड्यांचा व मुरुमाचा थर येऊन बसणे आणि शेतजमीन पूर्णपणे वाहून जाणे यांचा समावेश होतो. अशा प्रकारे जेथे संपूर्ण शेतजमीन नष्ट झाली आहे, तेथील नुकसानाचे स्वरूप आणि त्याचे परिणाम पुढील भागात मांडले आहेत.

**१.१ शेतजमिनीचे कायमस्वरूपी नुकसान**


**नुकसानाचे स्वरुप**

शेतीच्या नुकसानाचा हा प्रकार सर्वात तीव्र व शेतीव्यवस्थेला सर्वात मोठा हादरा देणारा आहे. जमीन हे अन्नधान्याच्या उत्पादनाचे मुख्य संसाधन आहे. जेव्हा हे संसाधनच नष्ट होते आणि शक्य कोटीतील कोणतेही उपाय करून पूर्वस्थितीत आणण्याच्या पलीकडे जाते तेव्हा शेतकऱ्याच्या दृष्टीने तो एक मोठा आघात असतो. या प्रकारच्या नुकसानाचे प्रमाण शेतीच्या इतर नुकसानाच्या तुलनेत कमी असले तरी त्याची तीव्रता मात्र अनेक पटींनी जास्त आहे. शेतजमिनीच्या कायमस्वरुपी म्हणजेच कधीही भरून न येणाऱ्या नुकसानाचे दोन मुख्य प्रकार दिसतात.

काही ठिकाणी नदी, नाले, खाड्या यांच्या जोरदार प्रवाहांमुळे शेतजमिनींचा वरचा (सुमारे अर्ध्या

**भूकंपामुळे झालेला विध्वंस आणि त्याची भयावहता बघताक्षणीच मनावर ठसते. अतिवृष्टी–पूर यांच्याबाबत मात्र असे होत नाही. विशेषतः कोकणातील हिरवाई आणि लाल माती सहज बघणाऱ्याच्या नजरेला अरिष्टानंतरदेखील सुखावते. स्थानिकांच्या नजरेतून पाहाताना मात्र लक्षात येते की पूर आणि दरड कोसळण्याच्या नैसर्गिक अरिष्टाचे रूपांतर कोकणातील जनतेसाठी सामाजिक आणि आर्थिक अरिष्टात झालेले आहे, त्याचा मुकाबला करणे कोकणवासीयांच्या आणि त्यातही वंचित गटांच्या आवाक्यापलीकडचे आहे. या तिहेरी अरिष्टांवर तातडीच्या आणि मूलगामी उपाययोजना होणे हा या सगळ्यांसाठी जगण्या–मरण्याचाच प्रश्न झालेला आहे. या तिहेरी अरिष्टाचे स्वरूप, परिणाम आणि त्यावरील उपाययोजना यांची चर्चा यापुढे केलेली आहे.**

## आकृती क्र.१ : अतिवृष्टी व पुराचे शेतीव्यवस्थेवरील परिणाम



फुटापासून ते साडेचार फूट उंचीचा) सुपीक मातीचा कसण्यायोग्य थर वाहून गेला आहे. वर्षानुवर्षांच्या मशागतीनंतर शेतीयोग्य बनलेला मातीचा थर वाहून गेल्यामुळे त्याखालील दगडगोटे व कातळाची जमीन उघडी पडली आहे. अशा जमिनींवर पुढील काही वर्षे खूप मेहनत घेतली आणि आर्थिक गुंतवणूक केली तरी शेती कसणुकीसाठी त्या जमिनींचा उपयोग होईल का, याविषयी साशंकता आहे.



कधीही भरून न येणाऱ्या नुकसानामध्ये दुसऱ्या प्रकारचे नुकसान मुख्यत: डोंगर उतारावर व नदी वा मोठ्या ओढ्यांच्या काठी असणाऱ्या शेतजमिनींचे झाले आहे. अतिवृष्टीच्या काळात नदी–ओढ्यांच्या दुथडी भरून वाहणाऱ्या प्रवाहात दरडींमुळे कोसळलेले दगडधोंडे, माती, मोठमोठी झाडे तसेच पालापाचोळा यांचा समावेश होता. उताराची तीव्रता जेथे कमी होती तेथे पाण्याच्या प्रवाहाचा वेग कमी होऊन वाहून आणलेले दगडधोंडे, झाडे साचून राहिले. यामुळे पाण्याच्या वाहत्या प्रवाहाला अडथळा निर्माण होऊन प्रवाहाने आपली दिशा बदलली. ज्या प्रवाहांच्या काठावर शेती होती तेथे हे प्रवाह शेतजमिनीत घुसले. यामुळे नंतरचा गाळ अशा शेतांमध्ये जमा झाला. काही ठिकाणी सततच्या पावसाने ओढे–नद्यांची पात्रे विस्तारली आणि त्यांचे पाणी काठावरच्या शेतजमिनीत शिरून संपूर्ण शेतजमीन वाहून गेली, असे दिसते.

**नुकसानाचे परिणाम**

१) संपूर्ण शेतजमीन नष्ट झाल्यामुळे लोकांचे उपजीविकेचे प्रमुख साधनच नष्ट झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी हा मोठाच आघात असून अशा कुटुंबांच्या जगण्याचा प्रश्न अतिशय कठीण बनला आहे.

२) नष्ट झालेल्या शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतमजुरांच्या उपजीविकांवर यामुळे मोठा आघात होईल. स्थानिक पातळीवरील रोजगाराच्या संधी संपुष्टात आल्यामुळे त्यांच्यापुढे स्थलांतराशिवाय पर्याय राहणार नाही.

३) या प्रकारांमध्ये शेतजमिनींच्या हद्द–निशाण्या नष्ट झाल्या आहेत. यातून जमीन मालकीविषयीचे प्रश्न तयार होतील. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आपापसांतील वादविवाद व तंट्यात वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच ती जमीन शेतजमीन असल्याचा प्रत्यक्षातील पुरावा नष्ट झाल्यामुळे शासनाबरोबरच्या व्यवहारात अडचणी येण्याची शक्यता आहे.

४) आदिवासी वर्षानुवर्षे कसत असलेल्या दळी जमिनी, अतिक्रमित जमिनी यांच्या हद्द–निशाण्या वाहून गेल्यामुळे ती जमीन कसत असल्याचा महत्त्वाचा पुरावा नष्ट झाला आहे. त्यामुळे त्यांचा जमिनीवरील हक्क शाबीत करणे अत्यंत कठीण बनले आहे.

५) शेती करणे हा आतबट्ट्याचा व्यवसाय असल्याची शेतकऱ्यांची भावना यामुळे अधिकच तीव्र होऊन शेतीकडे आणखीनच दुर्लक्ष केले जाण्याची शक्यता आहे.

६) ओढे, नदी, नाले इत्यादींचे बांध आधीपासूनच दुर्लक्षित होते. त्यांच्या काठावरची शेती जर उद्ध्वस्त झाली असेल तर ओढे–नद्यांच्या बांधबंदिस्तीकडे शेतकरी लक्ष देणार नाही. त्यामुळे यापुढील काळात पुराच्या धोक्याची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे.

**नदी, नाले, खाड्या यांच्या जोरदार प्रवाहांमुळे शेतजमिनींचा सुपीक मातीचा कसण्यायोग्य थर वाहून गेला आहे. वर्षानुवर्षांच्या मशागतीनंतर शेतीयोग्य बनलेला असा हा मातीचा थर वाहून गेल्यामुळे त्याखालील दगडगोटे व कातळाची जमीन उघडी पडली आहे.**



**संपूर्ण शेतजमीन नष्ट झाल्यामुळे लोकांचे उपजीविकेचे प्रमुख साधनच नष्ट झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी हा मोठाच आघात असून अशा कुटुंबांच्या जगण्याचा प्रश्न अतिशय कठीण बनला आहे.**

या सर्व परिस्थितीला तोंड देण्यासाठी व्यापक उपाययोजना करण्याची गरज आहे. तरच या संकटातून शेतकरी तसेच स्थानिक परिसंस्था व स्थानिक अर्थव्यवस्था वाचू शकेल. जर अशी उपाययोजना झाली नाही, तर अनेक कुटुंबांच्या भविष्याचा प्रश्न गंभीर बनवण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेऊन यावर पुढील उपाय सुचवता येतील.

### याबाबतच्या मागण्या, अडचणी, व उपाय

१. शेतजमीन हे शेतीवर उपजीविका असणाऱ्या सर्वसामान्य शेतकऱ्याचे मूलभूत संसाधन असल्याने संपूर्णपणे नष्ट झालेल्या जमिनीएवढीच जमीन त्याला उपलब्ध करून द्यावी. यामुळे शेतकऱ्याची उपजीविका सुरक्षित होऊ शकेल. यासाठी खालील गोष्टी करणे आवश्क आहे.

अ) नुकसान झालेल्या शेतजमिनींचे सर्वेक्षण/पुनर्सर्वेक्षण महसूल विभागाने करावे व हद्द निशाण्या कायम कराव्यात.

ब) हद्दनिशाण्या कायम करतानाच नुकसान झालेल्या शेतीचे मोजमाप करून पर्यायी जमीन उपलब्ध करण्यासाठी आवश्यक ते दस्तावेज तयार करावेत.

क) जमिनींच्या बदललेल्या प्रकार व प्रमाणानुसार त्याची सातबारा सदरी नोंद व्हावी.

ड) बदललेल्या नदीपात्रांची नोंद कागदोपत्री आणावी. ज्या शेतकऱ्यांची शेतजमीन अशाप्रकारे नदीपात्रात गेली असेल अशा शेतकऱ्यांना पर्यायी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने योग्य ती पावले उचलावीत.

२. जेथे पर्यायी जमीन शासकीय प्रयत्नातून देणे शक्य नाही तेथे शेतजमिनी विकत घेण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य (अनुदान, कमी व्याजदराचे कर्ज) उपलब्ध करून द्यावे. या खरेदी व्यवहारातील जमिनी शासकीय दराने उपलब्ध होतील याची शासनाने हमी द्यावी.

३. जेथे पर्यायी जमिनी देण्याच्या कोणत्याच शक्यता नसतील तेथे शेतकऱ्यांच्या उपजीविकेचा प्रश्न लक्षात घेऊन उपजीविकेचे कोणकोणते पर्याय लोकांना उपलब्ध असू शकतील याचा आढावा घेणे आणि लोकांना त्यामध्ये स्थिरावण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे.

४. दळी जमिनींच्या नुकसानाची पाहाणी व त्याबाबतच्या कोणत्याही कारवाईसाठी ग्रामसभा/स्थानिक पंचांची साक्ष ग्राह्य धरावी. 'कागदपत्रे नाहीत' या कारणासाठी कोणत्याही शेतजमिनीबाबतची आपत्कालीन कार्यवाही थांबवू नये.

### गावपातळीवरील संभाव्य अडचणी

१. जमिनींची आवश्यक त्या प्रमाणात उपलब्धता गावात असण्याची शक्यता कमी असेल.

२. जमिनींचे मोजमाप करण्यासाठी व नवीन हद्द–निशाण्या ठरविण्यासाठी लोकांचे सहकार्य आवश्यक असेल. गावातील स्थानिक राजकारण, तंटे, हेवेदावे या गोष्टींमुळे या प्रक्रियेत अडचणी येण्याच्या शक्यता आहेत.

### शासनाकडून घेतले जाणारे संभाव्य आक्षेप

१. व्यक्तिगत जमिनींचे नुकसान भरून देण्यासाठी शासन जबाबदार नाही. कारण अतिवृष्टी हा नैसर्गिक अपघात आहे. नष्ट झालेल्या जमिनींच्या बदल्यात नवीन/वेगळी जमीन देणे शासनाला शक्य नाही. शेतजमीन नष्ट झालेल्या सर्वांना तेवढीच जमीन द्यायची म्हटली तर आवश्यक तेवढी जमीन उपलब्ध असेलच असे नाही.

२. सरकारी यंत्रणेने एकदा सर्वेक्षण केले आहे. पुनर्सर्वेक्षणाची आवश्यकता नाही.

### आक्षेपांचे प्रतिवाद

१. नुकसानाचे व्यापक प्रमाण, व्यापक क्षेत्र व मर्यादित मनुष्यबळ यामुळे शासनाने केलेले सर्वेक्षण व पंचनामा त्रोटक झाला आहे. जनमानसात त्याविषयी शंका आहेत. त्यामुळे नुकसानाच्या प्रत्येक प्रकारानुसार सविस्तरपणे पंचनामा होणे

आवश्यक आहे. गावपातळीवरील शासकीय यंत्रणा कार्यक्षम झाल्यास नुकसानाबाबतच्या अनेक बारकाव्यांची नोंद घेता येईल. अशा प्रकारे केलेल्या सर्वेक्षणातून नुकसानाचे योग्य मूल्यमापन करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे नुकसानाच्या बारकाव्यांआधारे जमीन दुरुस्तीची योजना नेमकेपणाने आखता येईल.

२. शासनाने जाहीर केलेली मदत ज्या जमिनी दुरुस्त होणारच नाहीत तेथे उपयोगी नाहीत. त्यामुळे अशा ठिकाणी रोख रकमेच्या स्वरूपात मदत देण्याचा काही उपयोग होणार नाही. ज्या लोकांचे उपजीविकेचे साधन संपूर्णपणे नष्ट झाले आहे, त्यांचे व्यवस्थित पुनर्वसन करणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे अशा लोकांना पर्यायी जमीन अथवा उपजीविकेचे पर्यायी साधन शासनाने देणे गरजेचे आहे. गावात उपलब्ध असणाऱ्या सामूहिक जमिनी, शासकीय अखत्यारीतील जमिनी यांचा अशा शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी उपयोग करता येईल. जेथे शक्य नाही तेथे आजूबाजूच्या गावात अशा प्रकारे जमिनींची उपलब्धता आहे का हे तपासता येईल.

३. मुळात तालुक्याच्या पातळीवर पाहता अशा नुकसानाचे प्रमाण व्यापक नाही त्यामुळे जमीन उपलब्ध होण्यात फारशा अडचणी येणार नाहीत.

**गाव पातळीवर येणाऱ्या अडचणींवरील उपायांचा विचार करता,**

१. शेतकऱ्यांना त्याच गावात जमीन उपलब्ध करून देणे शक्य नसल्यास शेतकऱ्यांच्या सहभागाने त्यांना सोयीच्या ठिकाणी पर्यायी जमीन उपलब्ध करून देता येते का याच्या शक्यता तपासता येतील.

२. गावातील स्थानिक राजकारण, तंटे–बखेडे हे गावव्यवस्थेच्या अविभाज्य बाबी आहेत असे गृहीत धरावे. गावातील लोकांना विश्वासात घेऊन लोकसहभागातून नवीन हद्द–निशाण्या ठरवण्याची प्रक्रिया सुरु करणे आवश्यक आहे.

## १.२ शेतजमिनींचे दुरुस्त होऊ शकणारे नुकसान

पूर व अतिवृष्टीमुळे कोकणातील शेतजमिनींचे जे विविध प्रकारचे नुकसान झाले, त्यातील काही नुकसान दुरुस्त होण्यासारखे असे आहे. या नुकसानामध्ये दोन प्रकार दिसतात. अ) लागवड करायच्या शेतजमिनींचे–मळयांमधील, चोंड्यांमधील नुकसान, आणि ब) शेतांच्या बांध–बंदिस्तीचे नुकसान.

**पाण्याच्या प्रवाहाने कणीदार मातीचा थर, जाड रेती, पालापाचोळा, काटेकुटे शेतात येऊन साठले आहेत.**



### १.२.१ लागवड करायच्या शेतजमिनींचे नुकसान

**नुकसानाचे स्वरूप**

अतिवृष्टीमुळे शेतात रेती, दगडगोटे, गाळ, माती येऊन बसल्यामुळे शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. डोंगरउतारावरून खाली वाहणाऱ्या ओढे-नद्यांनी शेतजमिनींचे अनेक पद्धतींनी मोठया प्रमाणात नुकसान केले. त्याची विविध उदाहरणे देता येतील.

१. जोरदार पावसामुळे उताराने वेगाने वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाने कणीदार मातीचा थर, जाड रेती, पालापाचोळा, काटेकुटे शेतात येऊन साठले आहेत.
२. ओढे-नद्यांमधील पाण्याचे प्रमाण सततच्या पावसाने वाढून त्यांचे बांध फुटले आणि त्यांच्या काठी असणाऱ्या शेतात पाण्याचे लोट घुसले. यामुळे नदीपात्रातील दगडधोंडे शेतात साठलेले दिसतात.
३. ज्या ठिकाणी दरडी कोसळल्या तेथे ओढे-नदीच्या पात्रातून गाळ, माती, मोठमोठे दगडधोंडे असे सर्व वाहत आले आणि शेतात साठून राहिले.

**सन २००५ मध्ये झालेली अतिवृष्टी व पूर हे एक अरिष्ट असून त्यामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानाची दुरुस्ती हे अरिष्टनिवारणाचे काम आहे अशा दृष्टीने त्याकडे बघितले जावे.**

शेतजमिनींचे नुकसान होण्याचे आणखी एक कारण म्हणजे सखल भागात अतिवृष्टीमुळे आणि त्याचवेळी आलेल्या भरतीमुळे खाडीचे पाणी गाळ आणि बारीक वाळू यांच्यासह शेतजमिनीत शिरले आणि पिकासाठी उपयुक्त नसलेला गाळ तेथे साठून राहिला. काही ठिकाणी या नुकसानाची तीव्रता एवढी आहे की शेतातील 'निरुपयोगी कचरा' बाहेर काढण्याचे काम यापुढे काही हंगाम चालू राहील असे दिसते.

नुकसानाच्या या प्रकारात दुरुस्तीच्या शक्यता दिसत असल्याने हे नुकसान पहिल्या प्रकारच्या नुकसानाच्या तुलनेत कमी तीव्रतेचे आहे. मात्र यातील दुरुस्तीच्या कामांचा व्याप, त्यासाठी करावे लागणारे श्रम व त्यावर होणारा खर्च खूप जास्त आहे. हे नुकसान भरून काढण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामाचे स्वरूप आणि प्रमाण यानुसार त्याचे तीन उपप्रकार करता येतील.

**अ) येत्या हंगामाअगोदर शेतकरी स्वबळावर दुरुस्त करू शकेल अशी शेतजमीन:**
ज्या जमिनीत साधारणपणे एक ते दीड फूट उंचीपर्यंत कणीदार माती अथवा नदीकाठची वाळू आणि गाळ घुसला आहे तेथे शेतकरी स्वतःच्या मेहनतीने आणि गुंतवणुकीतून शेत साफ करण्याचे काम करू शकेल. त्यासाठी त्याला कोणावर अवलंबून राहण्याची वेळ येणार नाही. स्वत: त्या शेतात काम करून पुढील हिवाळी हंगामासाठी अथवा पावसाळी हंगामासाठी शेतजमीन तयार करणे शक्य होऊ शकेल. यामध्ये शेतातील कामांचे प्रमाण, श्रम-भांडवल गुंतवण्याची शेतकऱ्याची कुवत आणि शेती दुरुस्त करण्याची त्याची निकड या गोष्टी महत्त्वाच्या ठरतील.

**ब) शेतकरी स्वबळावर दुरुस्त करू शकणार नाही अशी जमीन:** ज्या शेतांमध्ये अर्धा ते एक फूट उंचीचा जाड रेती, दगडगोटे आणि वाळूचा थर येऊन बसला आहे तेथे असे नुकसान भरुन काढणे शेतकऱ्याला केवळ स्वतःच्या मेहनतीने वा गुंतवणुकीतून करता येणे अशक्य आहे. शेतातील असा कचरा दूर करण्यासाठी मशीनची आवश्यकता लागेल असे वाटते. तसेच त्याकरता मोठ्या प्रमाणावर आर्थिक खर्च आणि मजुरांची आवश्यकता भासेल. शेतकऱ्याला बाह्य मदत मिळाल्यास तो येत्या हंगामापर्यंत शेतजमीन दुरुस्त करुन पुढील पीक घेऊ शकतो.

**क) नजीकच्या भविष्यात दुरुस्त होणे अवघड अशी जमीन:** ज्या शेतजमिनीत मोठमोठे दगड-धोंडे आणि गाळ यांचा एक-दीड फुटापेक्षा जास्त उंचीचा थर साठला आहे तेथे नुकसानाचे प्रमाण व तीव्रता खूपच मोठी आहे. या शेतांमध्ये बाहेरून यंत्रसामग्री,आर्थिक मदत मिळाली तरीही पुढील अनेक हंगाम जमिनी पूर्वस्थितीत येणार नाहीत. शेतातील गाळ उपसून बाहेर काढत राहाण्याचे काम काही काळ टप्प्या-टप्प्याने करत राहावे लागणार आहे.

**नुकसानाचे परिणाम**

१. पहिल्या प्रकारचे नुकसान झालेले शेतकरी बाह्य मदतीची वाट न पाहता स्वतःच्या घरातील





## शेतजमिनींची दुरूस्ती लोकसहभागाशिवाय शक्य नाही



महाराष्ट्रातील पूर आणि अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जमिनींच्या दुरुस्तीबाबत शासनाने पुढील धोरण जाहीर केले आहे. जिरायती शेतीसाठी प्रति हेक्टर कमाल रु. १५००० व प्रति लाभार्थी कमाल २ हेक्टरपर्यंत मदत दिली जाईल. नुकसानाची किंमत कितीही असली तरी या धोरणाप्रमाणे एका लाभार्थीला जास्तीत जास्त रु. ३०,००० एवढी रक्कम मिळेल.
ही मदत पुढील पद्धतीने वितरित केली जाईल. पुरानंतर लगेच झालेल्या पंचनाम्याच्या आधारे ५०% पेक्षा जास्त नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची लाभार्थी म्हणून निवड करण्यात येईल. कृषी व महसूल खात्यातर्फे संयुक्तपणे लाभार्थी शेतकऱ्यांच्या जमिनीची पाहाणी करून त्यांच्या दुरुस्तीचे तांत्रिक व वित्तीय आराखडे तयार केले जातील. त्यानंतर रु. १०,००० पर्यंत रकमेच्या कामांचे प्रस्ताव जिल्हाधिकारी व यापेक्षा जास्त (व रु. १५००० पर्यंत) रकमेच्या कामांचे प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठविले जातील. या पध्दतीमुळे जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्तांना पूर्ण जिल्ह्यातून किंवा विभागातून प्रस्ताव मिळाल्याखेरीज तसेच शासनाकडून कोकण विभागाला दिल्या जाणाऱ्या निधीबाबत स्पष्टता मिळाल्याशिवाय शेतकऱ्यांचे प्रस्ताव मंजूर करता येणार नाहीत. त्याचप्रमाणे एकूण नुकसानाचे प्रमाण पाहता व कृषी व महसूल विभागाकडील गावपातळीवरील कर्मचाऱ्यांची संख्या पाहता प्रत्येक नुकसानग्रस्त शेतावर जाऊन, काटेकोर पाहणी करून तपशीलवार प्रस्ताव तयार करण्यास प्रचंड वेळ लागेल. स्थानिक पातळीवर प्रस्ताव तयार करण्यासाठी व वरच्या पातळीवर मंजुरी मिळण्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेतल्यास शेतकऱ्यांना पुढच्या हंगामाआधी जमीन कसण्यायोग्य करणे शक्य होईल, असे दिसत नाही. याशिवाय, सरकारी कारभारामध्ये असणारी ढिलाई, भ्रष्टाचार व उत्तरदायित्वाचा अभाव पाहता या मदतीचा विनियोग योग्य व्यक्तींना आणि वेळेवर होणे दुरापास्त दिसते. हे लक्षात घेता, स्थानिक शेतकरी (स्त्रिया व पुरुष), जनसंघटना आणि स्वयंसेवी संस्था यांना प्रस्ताव तयार करण्याच्या टप्प्यापासूनच सहभागी करून घेणे गरजेचे आहे. स्थानिक लोकांनी/संघटनांनी प्रस्ताव तयार करण्याचे काम सरकारी यंत्रणेच्या मार्गदर्शनाखाली केल्यास ते अधिक वेगाने होईल आणि त्याची परिणामकारकता अनेक पटींनी वाढेल. यामधून स्थानिक स्तरावरील भौगोलिक स्थितीसाठी योग्य असे उपाय पुढे येऊन सरसकट उपाययोजनांमधील त्रुटी टाळता येतील आणि लोकांच्या गरजांसाठी खरोखर उपयुक्त असे उपाय राबविले जाण्याची शक्यता वाढेल. अन्यथा सरकारकडून केवळ मदतीच्या घोषणा होत राहतील आणि लोकांचे प्रश्न तसेच भिजत राहतील.



## १.२.२ शेतांच्या बांध-बंदिस्तीचे नुकसान

**नुकसानाचे स्वरूप**

अतिवृष्टी आणि पुराच्या पाण्याने शेतांचे बांध तुटणे, बांध वाहून जाणे या प्रकारचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. बांधाच्या नुकसानाचे ढोबळपणे तीन प्रकारात वर्गीकरण करता येईल.

**अ) डोंगर माथा ते डोंगर उताराच्या भागातील बांधः**

डोंगरी भागातील साधारणपणे तीन फुटांपेक्षा जास्त उंचीचे, मुख्यतः मोठमोठे दगड वापरून केलेले बांध कोसळणे, तुटणे किंवा कमकुवत होणे असे प्रकार मोठ्या प्रमाणात झालेले दिसतात. या प्रकारचे नुकसान भरून काढायला शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर श्रम, खर्च व वेळ लागेल. अनेक ठिकाणी हे नुकसान मुख्य रस्त्यांपासून खूप आत, लांब अंतरावर असल्याने शासनयंत्रणा तेथपर्यंत पोहोचली असेल का ही शंका आहे. त्यामुळे हे नुकसान कदाचित नोंदवले गेले नसल्याची शक्यता आहे. त्याकरता नुकसानभरपाई मिळण्याची शक्यताही त्यामुळे कमी आहे.

**ब) उंचसखल भागातील बांध:** उंचसखल भागात तीन फुटांपेक्षा कमी उंचीचे व दगड-मातीचे बांध असतात. शेतीच्या या भागात डोंगर उतारावरून जोरदार वाहणारे ओढे, नदी यांच्यामुळे शेतीचे बांध वाहून गेल्याचे दिसते.

**क) सखल भागातील बांध:** कमी उताराच्या नदीकाठच्या जमिनी, खारेपाटातील खाडीकाठच्या जमिनी अशा सखल भागातील शेतांचे बांध फक्त मातीचाच वापर करून बांधलेले आणि रुंदीने जास्त असतात. ज्या भागात पुराचे पाणी जोरदार प्रवाह बनून वाहत होते, तेथे दगडाचा वापर न केलेले हे बांध प्रवाहाबरोबर सहज वाहून गेले. काही ठिकाणी सतत पडणारा पाऊस, तुंबलेले पाणी यामुळे बांध विरघळून गेले.

**नुकसानाचे परिणाम**

१. भातपिकाच्या वाढीसाठी पाणी शेतात साचून राहणे आवश्यक असते. बांधबंदिस्तीच्या



**ज्या भागात पुराचे पाणी जोरदार प्रवाह बनून वाहत होते, तेथे दगडाचा वापर न केलेले बांध प्रवाहाबरोबर सहज वाहून गेले.**

व्यक्तींचे श्रम जास्त प्रमाणात वापरून, अधिक खर्च करून अथवा कर्ज, उसनवारी, गहाण याद्वारे पैसे उभारून शेती दुरुस्तीचे प्रयत्न करतील असे दिसते. परंतु, यामुळे त्यांच्या उपजीविकेवरील ताण अनेक पटींनी वाढेल.

२. दुसऱ्या प्रकारचे नुकसान झालेले शेतकरी शासनाकडून मदत मिळावी यासाठी प्रयत्न करतील. जर त्यांना मदत मिळाली तर पुढच्या हंगामापर्यंत त्यांची जमीन दुरुस्त होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा हंगाम अशा शेतकऱ्यांना अतिशय खडतर जाईल. जर शासनाकडून योग्य वेळी मदत मिळाली नाही तर पुढच्या हंगामाआधी शेतकऱ्यांच्या जमिनी दुरुस्त होणे अवघड आहे. त्यामुळे पुढील हंगामात त्यांचे लागवड क्षेत्र कमी होईल तसेच शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम होईल. शेतकऱ्यांच्या जमिनी पुढील हंगामापर्यंत दुरुस्त होतीलच याची शाश्वती नसल्याने जगण्यासाठी अन्य मार्ग शोधणे त्यांना भाग पडेल.

३. तिसऱ्या प्रकारचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची परिस्थिती सर्वात बिकट असेल. शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनाच्या शक्यता संपलेल्या असतील किंवा खूपच कमी झालेल्या असतील. दुसऱ्या बाजूला स्वत:च्या शेतातील अतिरिक्त कामामुळे बाहेर मजुरी करण्याच्या शक्यतादेखील कमी झालेल्या असतील. या सर्व प्रतिकूल परिस्थितीत शेतीशिवाय उपजीविकेची इतर साधने शोधण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढेल व त्यांची शेतीबद्दलची उदासीनता देखील वाढेल.

नुकसानामुळे शेतात पाणी साचून राहणे शक्य होणार नाही. तसेच बांधांच्या नुकसानामुळे नंतर पडणाऱ्या पावसाने पिके वाहून जाणे, शेतातील उपजत कस व शेताला वापरलेली खते वाहून जाणे असे होण्याची शक्यता वाढेल. यामुळे आत्ताच्या हंगामातील पिकांच्या वाढीवर व उत्पादनावर परिणाम होईल, असे दिसते. बांधबंदिस्तीची दुरुस्ती तातडीने हाती न घेतल्यास हा परिणाम पुढील काही हंगामातही जाणवेल.

२. आवश्यक पाणी शेतात न साठल्याने पिकाच्या वाढीवर परिणाम होईल. त्यामुळे पिकाची प्रतिकारक्षमता कमी होऊन पिकांवर येणारे रोग, कीड यांचे प्रमाण वाढण्याचा धोका संभवतो.

३. बांधबंदिस्ती बिघडल्यामुळे शेताच्या हद्दीवरून शेतकऱ्यांमध्ये आपापसांत तंटे–बखेडे होतील.

४. बांधबंदिस्तीचे नुकसान दुरुस्त करण्यासाठी शेतकऱ्याला करावे लागणारे कष्ट, खर्च करावी लागणारी रक्कम आणि बुडवावी लागणारी मजुरी यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल. यामुळे शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर मोठा परिणाम होऊन दैनंदिन गरजा भागवण्यावरदेखील त्याचा परिणाम होईल.

शेतजमिनींचे व बांधबंदिस्तीचे नुकसान आणि त्यामुळे शेतीवर, शेतकऱ्यावर होणाऱ्या परिणामांचा विचार आपण आतापर्यंत केला. त्यापुढे जाऊन त्यावरील उपाययोजनांचा विचार करणे देखील येथे आवश्यक आहे. अन्यथा, शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांपुढे जगण्याचा मोठा प्रश्न उभा राहील. या उपाययोजनांच्या दृष्टीने पुढे येणाऱ्या मागण्या येथे मांडल्या आहेत. त्यावर शासनाकडून घेतले जाणारे संभाव्य आक्षेप व त्यांचा प्रतिवादही त्यासोबत मांडले आहेत.

### १.३ शेतजमिनीच्या आणि बांधबंदिस्तीच्या नुकसानासंबंधातील मागण्या, अडचणी, व उपाय

१. सन २००५ मध्ये झालेली अतिवृष्टी व पूर हे एक अरिष्ट असून त्यामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानाची दुरुस्ती हे अरिष्टनिवारणाचे काम आहे अशा दृष्टीने त्याकडे बघितले जावे. या अरिष्टामुळे बाधित अथवा नष्ट झालेल्या शेती आणि नैसर्गिक संसाधनांवर ज्या लोकांची उपजीविका अवलंबून होती त्या लोकांच्या पुनर्वसनाची संपूर्ण जबाबदारी शासनाने घेणे आवश्यक आहे. यामुळे केवळ यावर्षी रोख रकमेच्या स्वरूपात नुकसानभरपाई देण्यावर न थांबता ही संसाधने पूर्वस्थितीत आणण्यासाठी इतर पावले उचलण्याची गरज आहे.

२. नुकसानभरपाई व पुनर्वसनाचे हे काम शासनाच्या नेहमीच्या कामाच्या पद्धतीपेक्षा अधिक तातडीने केले जाणे आवश्यक आहे. जर या कामात दिरंगाई झाली तर शासनाच्या मदतीचे औचित्य राहणार नाही आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्या

**ज्या शेतजमिनीत मोठमोठे दगड–धोंडे आणि गाळ यांचा एक–दीड फुटापेक्षा जास्त उंचीचा थर साठला आहे तेथे नुकसानाचे प्रमाण व तीव्रता खूपच मोठी आहे. या शेतांमध्ये बाहेरून यंत्रसामग्री, आर्थिक मदत मिळाली तरीही पुढील अनेक हंगाम जमिनी पूर्वस्थितीत येणार नाहीत.**



**पुरानंतरही शाबूत राहिलेल्या जमिनीत लावणी करायला रोपे आणायची तरी कुठून? हा प्रश्न अनेक शेतकऱ्यांपुढे उभा राहिला. काहींनी नातेवाईक वा ओळखीच्या शेतकऱ्याकडून रोपे आणली. चिपळूणमधील तालुका कृषी विभागाने रोपेदान चळवळ राबवून या प्रयत्नांना मोठे पाठबळ दिले. कृषी विभागाचा पुढाकार आणि स्थानिकांचा सहभाग यामुळे सुमारे ११६ गावातील २२०१ शेतकऱ्यांच्या १३२ हेक्टर जमिनीवर पुन्हा लावणी झाली. शासनाची कल्पकता आणि लोकसहभाग एकत्र आले तर काय होते याचे हे प्रभावी उदाहरण आहे.**

लोकांना त्याचा काही उपयोग होणार नाही. या कामाचा प्रचंड आवाका पाहता, तातडीने व युद्धपातळीवर हे काम पुरे करण्यासाठी शासनाकडील यंत्रणा व मनुष्यबळ कदाचित पुरी पडणार नाही. त्यामुळे शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था व लोकांना सहभागी करून हे काम प्राधान्याने पुरे करायला हवे. या कामासाठी पुढील पध्दत अवलंबणे योग्य ठरेल, असे वाटते:

**अ)** शेतजमिनींचे झालेले नुकसान भौगोलिक परिस्थितीनुसार वेगवेगळ्या प्रकारचे असल्याने त्यासाठी आवश्यक दुरुस्तीची कामे व त्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा अंदाज या सर्वांचा सखोल, तपशीलवार आराखडा तयार करणे आवश्यक आहे. हा आराखडा तयार करताना तालुका अथवा जिल्हा हे पायाभूत क्षेत्र म्हणून न धरता महसूल परिमंडळ (Revenue Circle) हे पायाभूत क्षेत्र म्हणून धरणे आवश्यक आहे. तालुका अथवा जिल्हा हे क्षेत्र खूपच व्यापक असल्यामुळे आणि या क्षेत्रातील वेगवेगळ्या भागात नुकसानाच्या स्वरूपात व तीव्रतेमधे भिन्नता असल्यामुळे तालुका जिल्ह्यासाठी बनवलेला एकच आराखडा विविध ठिकाणच्या व विविध प्रकारच्या नुकसानाचा योग्य व पुरेसा परामर्ष घेऊ शकणार नाही. शासनाच्या अशा ढोबळ आराखड्यामुळे विविध प्रकारच्या नुकसानाच्या तीव्रतेनुसार शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्याऐवजी केवळ विशिष्ट प्रकारच्या नुकसानालाच भरपाई मिळेल. तसेच कमी नुकसान झालेल्यांना जास्त नुकसानभरपाई आणि नुकसानाचे प्रमाण जास्त असणाऱ्या लोकांना कमी नुकसानभरपाई असेही होण्याची शक्यता आहे. याउलट गाव हे पायाभूत क्षेत्र धरल्यास आराखडा तयार करण्याच्या कामाची व्याप्ती, खर्च आणि मनुष्यबळ यांचे प्रमाण खूप वाढेल. तसेच या कामाला वेळही खूप लागेल. ह्या दोन्ही बाबींचा विचार करता महसूल परिमंडळ हे क्षेत्र पायाभूत म्हणून धरणे योग्य होईल. प्रत्येक परिमंडळात शेतीचे झालेले नुकसान, त्यासाठी करायचे काम, आणि त्याकरता अपेक्षित खर्च याचे ठराविक व सोपे मापदंड (Norm) ठरवून ते शासनाने जाहीर करावेत.

**ब)** ठरलेल्या मापदंडांनुसार शेतकऱ्यांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्वतःच्या शेतजमिनीच्या नुकसानाचे मोजमाप करून त्यावरील दुरुस्तीच्या कामाचे आराखडे तयार करावेत. गावपातळीवर असे आराखडे एकत्रित करून ग्रामसभेमध्ये चर्चा करून त्याला ग्रामसभा व ग्रामपंचायतीची मान्यता प्राप्त व्हावी. नंतर हे आराखडे तालुका पंचायत–जिल्हा परिषदेद्वारे शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावे व शासनाने मदतीची रक्कम थेट ग्रामपंचायतीला अदा करावी.

**क)** या रकमेचा शासकीय यंत्रणेमार्फत दुरुपयोग होणार नाही व ती योग्य त्या कामासाठी व ठरलेल्या वेळामध्ये वापरली जाईल याची जबाबदारी शासनाने घ्यावी. या रकमेचे वाटप कामाच्या पूर्ततेनुसार टप्प्याटप्प्याने ग्रामसेवकामार्फत व्हावे. अशा पद्धतीने लोकसहभागाद्वारे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना विश्वासात घेऊन कारभार केल्यास एकूण कामाची कार्यक्षमता वाढेल. गावपातळीवर सर्व कारभार पारदर्शक केल्याने अशा कामांमध्ये नेहमी होणारा गैरकारभार आटोक्यात राहील.

**ड)** झालेल्या नुकसानाचे प्रमाण बघता भरपाईच्या निधीतून शासन देऊ शकणारे साहाय्य मर्यादित असल्याने या कामाला अन्य योजनांतून सुद्धा आर्थिक साहाय्य करावे लागेल. उदा. शासनाने जाहीर केल्याप्रमाणे शेतजमिनींच्या दुरुस्तीची कामे रोहयोमार्फत केली जाऊ शकतात.

### शासनाकडून घेतले जाणारे संभाव्य आक्षेप

१. पुरामुळे झालेल्या नुकसानाचे पंचनामे झाले आहेत. त्यामुळे परत पंचनामा करण्याची आवश्यकता नाही. शिवाय शेतीच्या नुकसानाचे, दुरुस्तीचे, त्यासाठीच्या खर्चाचे शेतनिहाय अंदाज करताना अशा प्रकारचे काम पुन्हा होणारच आहे.

२. परिमंडळ हे पायाभूत क्षेत्र मानणे व त्याप्रमाणे कामाचे प्रस्ताव तयार करणे हे व्यवहार्य आणि आर्थिकदृष्ट्या शक्य नसेल.

३. नुकसानाचे अंदाज, त्यावर करावी लागणारी कामे, त्यासाठीच्या कामाच्या खर्चाचे अंदाज या सर्व काम करण्यासाठीच्या तांत्रिक क्षमता स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नाहीत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांकरवी ही कामे केली तर कामातील भ्रष्टाचार वाढेल.

**गावपातळीवरील संभाव्य अडचणी**

१. साफसफाई करून काढलेला कचरा, गाळ टाकायचा कोठे हा एक मोठा प्रश्न आहे.
२. जेथे यंत्रसामग्री वापरून काम करण्याची आवश्यकता आहे, त्या प्रत्येक ठिकाणी यंत्रसामग्री पोहचणे शक्य होईलच असे नाही.

**आक्षेपांचा प्रतिवाद व अडचणींवर उपाय**

१. सार्वजनिक कामात लोकसहभाग जेवढा जास्त व सक्रिय तेवढी त्यातील पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढत जाते. याउलट व्यवहार जेव्हा दोन व्यक्तींमध्ये (त्यातही विशेषतः सर्वसामान्य नागरिक आणि शासकीय अधिकारी) असा मर्यादित राहतो, तेव्हा त्यातील भ्रष्टाचार, गैरकारभाराच्या शक्यता वाढतात. त्यामुळे गावपातळीवर कारभार सोपविल्यास व त्यामध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व येण्यासाठी योग्य त्या तरतुदी केल्यास गैरकारभार, भ्रष्टाचार होण्याच्या शक्यता खूप कमी होतील.

२.शेतीच्या नुकसानाचे पंचनामे/सर्वेक्षण शेतकऱ्यांनी स्वत: केल्यास शेतकऱ्याला स्थानिक परिस्थितीबद्दल जास्त चांगली माहिती असल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या हे सर्वेक्षण अधिक अचूक होईल. शेतकऱ्यांनी पंचनामे/सर्वेक्षण कसे करायचे व प्रस्ताव कसे तयार करायचे याबाबत माहिती देणारे साहित्य तयार करावे. ज्यायोगे हे काम स्वतः करणे शेतकऱ्यांना सुलभ होईल. गरज जाणवल्यास शेतकऱ्यांना इतर शेतकऱ्यांची, स्थानिक शाळेतील शिक्षकांची, ग्रामपंचायत सदस्यांची, अथवा कर्मचाऱ्यांची मदत घेता येईल.
३. महसूल परिमंडळ हे पायाभूत क्षेत्र ठरवणे कोणत्या दृष्टीने व्यवहार्य नाही हे तपासून पाहायला हवे. कोकणातील भौगोलिक स्तरावरील भिन्नता लक्षात घेता जिल्हा वा तालुका पातळी हे पायाभूत क्षेत्र मानल्यास बहुसंख्य शेतकऱ्यांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. सर्वेक्षणात जर गावातील लोकांची मदत घेतली, त्यांना त्यात सामील करुन घेतले तर ह्या कामाचा आर्थिक भार व वेळ काही प्रमाणात कमी होईल.



**२. पिकांचे नुकसान**
शेतजमिनीच्या नुकसानाचे स्वरूप आणि त्यावर आधारित उपाययोजना यांचे विवेचन आत्तापर्यंतच्या मांडणीत केले आहे. अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतजमिनीबरोबरच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसाळी हंगामातील पिकांबरोबरच पुढील हिवाळी हंगामातील पिकांचे नुकसान होण्याची शक्यतादेखील निर्माण झाली आहे. या नुकसानाचे प्रकार व त्या आधारे करायच्या उपाययोजना यांची मांडणी यापुढे करत आहोत.

**२.१ पावसाळी हंगामातील पिकांचे नुकसान:**

**नुकसानाचे स्वरुप**

**पिके वाहून जाणे:** यावर्षी मुळातच लावण्यांना उशीर झालेला असल्याने अतिवृष्टीला सुरुवात झाली तेव्हा जेमतेम निम्म्या लावण्या आटोपल्या होत्या. निम्म्या लावण्यांचे काम सुरू होते. जेथे लावण्या नुकत्याच झाल्या होत्या तेथे उगवलेली रोपे स्थिर झालेली नसल्याने ती वाहून गेली. तसेच जेथे रोपांची लावणी झाली नव्हती व जी रोपे रोपवाटिकांमधून काढणे शिल्लक होती ती देखील वाहून गेली. यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा लावणी





**शेतात पावसाचे व पुराचे पाणी साचून राहिल्यामुळे भातशेती कुजली**

करण्यास रोपे शिल्लक राहिली नाहीत. शेतकऱ्यांचा लावणीसाठी व रोपे तयार करण्यासाठी केलेला खर्च वाया गेला.

**पिके कुजणे:** अखंड पडलेल्या पावसाने व त्यामुळे आलेल्या पुरामुळे शेतात सतत पाणी साठून राहिले यामुळे शेतातील पिके कुजली. शेतात पावसाचे व पुराचे पाणी साचून राहिल्यामुळे भातशेती कुजली,



तर मातीतील पाण्याचे प्रमाण वाढल्यामुळे आणि मुसळधार पावसाच्या जोरदार माऱ्यामुळे भाजीपाला कुजला.

**पिकांच्या वाढीवर व पुढील उत्पादनावर परिणाम होणे:** उशीरा झालेल्या लावण्यांमुळे रोपे स्थिर झाली नव्हती. त्यातच सतत सात ते आठ दिवस संततधार पाऊस पडला आणि शेतात पाणी पिकांच्या उंचीएवढे किंवा त्याच्यावर साठून राहिले. यामुळे स्थिर न झालेली भातशेती कुजून गेली. त्यातही जी रोपे जगली त्यांची वाढ खुंटली. पिकाच्या वाढीच्या महत्त्वाच्या कालावधीत पिकाला बसलेला हा दणका पिकाच्या वाढीवर व साहजिकच उत्पादनावर परिणाम करणारा आहे. पाऊस कमी झाल्यानंतर देखील जमिनीतील पाण्याच्या अतिरिक्त प्रमाणामुळे पिकांच्या मुळांना हवेचा पुरवठा कमी होण्याची शक्यता असते. यामुळे पिकाच्या वाढीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पिकांच्या उत्पादनात मोठी घट होईल, असे दिसते. याउपर जे पीक तग धरुन आहे, अशा पिकावर प्रतिकूल वातावरणामुळे रोग/कीड पडणे, फुलोऱ्याच्या वेळी पाऊस पडून परागीकरणाच्या प्रक्रियेवर परिणाम होणे, भात कापणीच्या वेळी अवेळी पाऊस पडून उत्पादन कुजणे अशा गोष्टींमुळे पिकांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

**पिकावर प्रतिकूल वातावरणामुळे रोग/कीड पडणे, फुलोऱ्याच्या वेळी पाऊस पडून परागीकरणाच्या प्रक्रियेवर परिणाम होणे, भात कापणीच्या वेळी अवेळी पाऊस पडून उत्पादन कुजणे अशा गोष्टींमुळे पिकांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे.**

**नुकसानाचे परिणाम**

१. जेथे पिकांचे नुकसान खूप मोठ्या प्रमाणावर झाले आहे तेथे पावसाळी हंगामातील पीक उत्पादन मिळणार नाही. तर इतर ठिकाणीदेखील उत्पादन थोड्याफार प्रमाणात घटेल. याच्या परिणामी पुढील वर्षी कोकणामध्ये धान्य टंचाईचा मोठा प्रश्न निर्माण होईल. शिवाय पीक लागवडीसाठी आत्तापर्यंत केलेला खर्च, उत्पादन न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांच्या अंगावर पडेल. यामुळे केवळ शेतीवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबांच्या अन्नसुरक्षेचा प्रश्न तीव्र बनेल.
२. जे शेतकरी धान्याची विक्री करीत होते त्यांना या वर्षीच्या रोख उत्पन्नाला मुकावे लागेल.
३. कोकणात भातापासून मिळणारा पेंढा हा गुरांसाठी चारा म्हणून महत्त्वाचा आहे. मुख्यतः, उन्हाळ्यात जेव्हा इतरत्र चारा उपलब्ध नसतो तेव्हा हा चारा वापरला जातो. भातशेती नष्ट झाल्यामुळे गुरांच्या चाऱ्याची टंचाई निर्माण होईल.
४. शेतीवर अवलंबून असणाऱ्या मजुरांच्या रोजगाराच्या संधीमध्ये मोठ्या प्रमाणात घट होऊन त्यांच्या उपजीविकेवर त्याचा मोठा आघात होईल. जमिनीवर मालकी हक्क नसल्यामुळे कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई मजुरांना मिळणार नाही. परिणामी, रोजगाराकरता स्थलांतर करण्याची वेळ मजुरांवर येण्याची शक्यता आहे.
५. या सर्वांच्या परिणामी शेतीवर अवलंबून लोकांच्या उपजीविकांवर मोठा आघात होईल, असे दिसते. विशेषतः वंचित घटकांच्या अन्नसुरक्षेचा मोठा प्रश्न यामधून उभा राहील.



### शासनाकडे मागण्या

१. अतिवृष्टीने घडवलेल्या नुकसानाच्या तुलनेत जाहीर केलेली नुकसानभरपाई लोकांना अत्यंत तुटपुंजी वाटते. त्यामुळे शेतीमधील गुंतवणूक, श्रम यांचा विचार करून आणि नुकसानाचा व्यवस्थित आढावा घेऊन पीक नुकसानासाठी मदत जाहीर करावी.

२. शेतीतील पिकाच्या नुकसानभरपाईची रक्कम नामधारी शेतमालकाला न मिळता त्यात प्रत्यक्ष कसणाऱ्या शेतकऱ्याला मिळावी. शेतीसाठी नुकसानभरपाई देताना केवळ कागदी पुराव्यांचाच आधार ग्राह्य धरू नये. नुकसानभरपाई देताना शेत प्रत्यक्षात कोण कसत होते याची पंचासमक्ष शहानिशा करून त्याप्रमाणे नुकसान भरपाई योग्य व्यक्तीला मिळेल याची काळजी घ्यावी.

३. पीक नुकसानामुळे पुढे उद्भवणाऱ्या चाराटंचाईसाठी शासनाने वेळीच उपाययोजना करणे व त्यासाठी आधीपासून तयारी करणे गरजेचे आहे.

### शासनाकडून घेतले जाणारे संभाव्य आक्षेप

१. शेतीनुकसान संपूर्ण राज्यभर झाले असल्याने उपलब्ध निधीचा विचार करता पीक नुकसानाची संपूर्ण भरपाई देणे शासनाला शक्य नाही. शासनाकडून जाहीर केली गेलेली रक्कम नुकसानभरपाईची नसून मदत म्हणून देण्यात आली आहे. त्यामुळे लोकांना ती पुरेशी न वाटणे साहजिक आहे.

२. प्रत्यक्ष कसणाऱ्या व्यक्तींची वैधता तपासून घेऊन त्यानुसार नुकसानभरपाईचे वाटप करण्याचे काम खूपच वेळखाऊ आहे.

### आक्षेपांचा प्रतिवाद

पूरपरिस्थितीत तातडीच्या मदतीच्या वेळी शहरी भागाकडे मदतीचा जो ओघ वळला त्या तुलनेत ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष झाले. इतर क्षेत्रातील निधीचा व्यय व अपव्यय पाहता निधीचा तुटवडा हा मुख्य प्रश्न नसून शासनाचे प्राधान्यक्रम कोणते, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. व्यावसायिक शेती आणि भातशेती (किंवा नाचणी–वरीची शेती) यांच्यामध्ये खूप फरक आहे. कोकणातील शेती ही येथील सामान्य शेतकऱ्याच्या जगण्याला आधार देणारी शेती आहे. येथील बहुसंख्य शेतकरी फायद्याचा व्यवसाय म्हणून शेती करीत नसून मुख्यतः त्यांच्या कुटुंबांच्या अन्नसुरक्षेचा तो मोठा स्त्रोत आहे. हे लक्षात घेऊन कोकणामध्ये शासनाने पिकाची पूर्ण नुकसानभरपाई देणे आवश्यक आहे.

## २.२ पुढील हंगामातील शेती पिकांचे नुकसान

हिवाळी हंगामातील कडधान्य पिके, उन्हाळी भात, हंगामी भाजीपाला पिके (लागवड केली जाणारी व जंगली), हंगामी चारा पिके, हंगामी फळपिके तसेच ज्या ठिकाणी व्यावसायिकदृष्टया शेती केली जाते

**सखल भागात अतिवृष्टीमुळे आणि त्याचवेळी आलेल्या भरतीमुळे खाडीचे पाणी गाळ आणि बारीक वाळू यांच्यासह शेतजमिनीत शिरले आणि पिकासाठी उपयुक्त नसलेला गाळ तेथे साठून राहिला.**



**गुरांच्या गोठ्यांचे, कोंबड्यांच्या खुराड्यांचे, शेती मशागतीसाठी आवश्यक नांगर आणि इतर हत्यारांचे नुकसान झाल्याचे दिसते.**

(उदा. फुलशेती) अशा सर्व प्रकारच्या शेतीवर या अरिष्टाचे कमी अधिक परिणाम होणार आहेत.

कोकणातील खाड्यांच्या काठी असलेल्या शेतीभागाला दरवर्षी पुराचा तडाखा बसतो. परंतु या पुराची तीव्रता कमी असते. यावर्षी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाचे परिणाम मात्र पुढील हंगामातील पिकांवरदेखील जाणवतील. विशेषत: खाडी किनारी असलेल्या भात खाचरातून हिवाळी हंगामात दवावर व जमिनीमधील ओलाव्यावर पावटा, कडवा वाल, कुळीथ, मूग इत्यादी पिके घेतली जातात. परंतु, जमिनीवर बारीक वाळूयुक्त गाळाचा थर बसल्यामुळे जमिनीतील ओलावा पिकाला मिळणार नाही. उलट वाळू तापल्यामुळे ही पिके करपून जाण्याची शक्यता आहे. अशाप्रकारे ह्या वर्षीच्या अरिष्टाचा हिवाळी पिकांवर परिणाम होइल असा धोका दिसतो.

## २.३ दीर्घकालीन पिकांचे नुकसान

कोकणातील भातशेती, नाचणीच्या शेतीबरोबर येथील शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या हातभार लागतो तो त्याच्याकडे असलेल्या चारदोन आंबा–फणसाच्या, नारळी–पोफळीतून मिळणाऱ्या उत्पादनातून. यंदाच्या अतिवृष्टीने या उत्पादनाच्या स्त्रोतांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांकडे असणारी झाडे तसेच रोजगार हमी योजनेंतर्गत लागवड झालेली फळझाड लागवड यांना अतिवृष्टीचा मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. फळझाडांचे हे नुकसान पुराच्या पाण्याखाली झाडे गेल्याने, दरडी कोसळल्याने, वादळात झाडे मोडून–उन्मळून पडल्याने, वीज पडल्याने अशा वेगवेगळ्या प्रकारे झाले आहे.

पावसाळ्यात फळपिकांचा हंगाम नसल्याने पीक उत्पादनावर अतिवृष्टीचा परिणाम झाला नाही. परंतु पीक उत्पादनाच्या स्त्रोतांचेच नुकसान झाले असल्याने त्यासाठी शासनाने मदत देणे आवश्यक आहे. ही मदत केवळ आर्थिक स्वरूपाची न देता या नुकसानावर दीर्घकालीन उपायांचा विचार करणे आवश्यक आहे. उदा. रोजगार हमी योजनेतील लागवडीतील फळपिकांचे जेथे नुकसान झाले असेल तेथे त्यावर उपाय म्हणून त्याच योजनेतून शेतकऱ्याला त्याची झाडे परत उभी करण्यास मदत करणे आवश्यक आहे.

## ३. शेतीव्यवस्थेशी संलग्न इतर गोष्टींचे नुकसान व त्याचा शेतीव्यवस्थेवरील परिणाम

शेतीव्यवस्था ही इतर अनेक छोट्या–मोठ्या व्यवस्थांवर अवलंबून असल्याने त्या व्यवस्थांच्या नुकसानाचा परिणाम एकूण शेतीव्यवस्थेच्या नुकसानात प्रतिबिंबित होतो.

### ३.१ प्राणी जीविताचे नुकसान
### (गुरे, कोंबड्या, बकऱ्या, मासे इ.)

शेतीला पूरक व्यवस्थांमध्ये शेतीच्या मूलभूत कामांसाठी आवश्यक असणारी गुरे–जनावरे महत्त्वाची आहेत. या गुरांचे त्यातही विशेषतः बैलांचे शेतीसाठी असणारे महत्त्व शेतकऱ्याच्या दृष्टीने खूपच जास्त आहे. याखेरीज म्हशी, गाई, बकऱ्या, कोंबड्या यांच्याकडून शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या जैविक खतांपासून ते दूध, मटण इत्यादी अनेक गोष्टींचा पुरवठा होत असतो. अशा या शेतीव्यवस्थेच्या महत्त्वाच्या अंगाचे अतिवृष्टी व पुरामुळे खूप मोठे नुकसान झाले आहे.

### ३.२ शेतीसाठी आवश्यक मूलभूत साधन–सुविधांचे नुकसान

या नुकसान प्रकारात गुरांच्या गोठ्यांचे, कोंबड्यांच्या खुराड्यांचे नुकसान, शेती मशागतीसाठी आवश्यक नांगर, इतर हत्यारांचे नुकसान अशांचा समावेश आहे. (पंप, फवारणीपंप, मोटर, माशांची जाळी, होड्या, वल्हे इ.) अतिवृष्टीमुळे या गोष्टी वाहून जाणे, मोडणे, कुजणे, वाळवी लागणे, गाडणे अशा प्रकारे नुकसान झाल्याचे दिसते.

### ३.३ शेतीसाठी आवश्यक स्थानिक नैसर्गिक संसाधनांचे नुकसान

शेती व्यवस्था इतर अनेक नैसर्गिक व्यवस्थांवर अवलंबून आहे. शेतीव्यवस्थेला पायाभूत सुविधा पुरविणारी व्यवस्था म्हणजे शेतीबाह्य स्थानिक नैसर्गिक संसाधने होय. या स्थानिक नैसर्गिक संसाधनांमध्ये जंगले, कुरणे, नदी, ओढे यांचा समावेश होतो. जंगले शेती मशागतीसाठी पालापाचोळा, कुंपणासाठी काटेकुटे, रोपे, फांद्या पुरवतात. शेतीसाठी आवश्यक नैसर्गिक स्त्रोतांच्या वाढीसाठी, त्यांना टिकवून ठेवण्यासाठी जंगले अप्रत्यक्षपणे मदत करतात. कुरणे शेतजमिनीच्या मशागतीसाठी गवत पुरवतात. गुरांना चारा पुरवतात. शेती चांगली होण्यासाठी जी जैवविविधता लागते ती जंगले, कुरणे, नदी, ओढे यातून तयार होत असते.

यावर्षीच्या अतिवृष्टीमुळे शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या या स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा मोठ्या प्रमाणात व विविध प्रकारचा ऱ्हास झाला आहे. या ऱ्हासाचा विपरित परिणाम कोकणातील विविध भागातील शेतीव्यवस्थेवर थोड्याफार फरकाने जाणवत राहील असे दिसते.

### निष्कर्ष

पूर व अतिवृष्टीचा कोकणातील शेतीव्यवस्थेवर अतिशय दूरगामी परिणाम झालेला दिसतो. कोकणातील भौगोलिक भिन्नतेमुळे शेतजमिनींमध्ये खूप वैविध्य आढळते. त्यामुळे नुकसानाचे प्रकार, त्याची तीव्रता यातही खूप भिन्नता आहे. त्यामुळे त्यावरील उपाययोजनेतही वैविध्य असणे गरजेचे आहे. शेती हा कोकणातील केवळ शेतकरीच नव्हे तर बहुसंख्येने असणाऱ्या शेतमजुरांच्याही उपजीविकेचा प्रमुख स्त्रोत आहे हे लक्षात घेऊन शेतजमिनीचे नुकसान भरून काढणे, शेती पूर्वस्थितीत आणणे हे काम तातडीने करणे गरजेचे आहे. या उपायांचा शेतकऱ्यांना खरोखर फायदा व्हायचा असेल तर नेहमीच्या सरकारी पद्धतीपेक्षा वेगळी व नावीन्यपूर्ण अशी उपाययोजना करणे आवश्यक आहे. या उपायात मोठ्या प्रमाणात लोकांचा सहभाग असावा लागेल. लोकांचा संशय घेणारी मनोवृत्ती आणि त्यावर आधारित कामकाज पद्धती बाजूला ठेवायला लागतील. या कामात भ्रष्टाचार, गैरकारभार होऊ नये म्हणून संपूर्ण पारदर्शकता आणणाऱ्या, लोकांवर विश्वास व जबाबदारी टाकून त्यांना सामील करून घेणाऱ्या कामकाज पद्धती स्वीकारणे गरजेचे आहे. याबाबतीत, तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा गांभीर्याने पाठपुरावा केला नाही तर नैसर्गिक अरिष्टाचे सामाजिक–आर्थिक अरिष्टाचे रूपांतर होण्याच्या प्रक्रियेत सरकारचा हातभार लागेल.

**कोकणातील भौगोलिक भिन्नतेमुळे शेतजमिनींमध्ये खूप वैविध्य आढळते. त्यामुळे नुकसानाचे प्रकार, त्याची तीव्रता यातही खूप भिन्नता आहे. त्यामुळे त्यावरील उपाययोजनेतही वैविध्य असणे गरजेचे आहे.**


SURYA

# इतर प्रकारचे नुकसान
# अरिष्टाचा दुर्लक्षित पैलू

**अतिवृष्टीच्या आघातामुळे इतर प्रकारचे सार्वजनिक आणि वैयक्तिक नुकसानही मोठ्या प्रमाणावर झालेले दिसते. यात मुख्यत्वाने चार प्रकारांचा समावेश आहे: जीवितहानी, घरांचे नुकसान, गुरे-जनावरांची हानी आणि पायाभूत सुविधांचे नुकसान. हे नुकसान शासनाच्या भक्कम मदतीशिवाय भरून काढणे जनतेच्या, त्यातही वंचित घटकांच्या आवाक्याबाहेरचे आहे. शिवाय या नुकसानाचे जनजीवनावरील परिणामही दूरगामी आहेत. या परिणामांची आणि त्यांच्याशी निगडित असलेल्या स्थानिक प्रश्नांची गांभीर्याने दखल घेतल्याशिवाय पुनर्वसनाचा कार्यक्रम परिणामकारकपणे राबवता येणार नाही. या पार्श्वभूमीवर स्थानिकांच्या नजरेतून इतर प्रकारच्या नुकसानाचे स्वरूप, त्याचे परिणाम आणि शासनाने करायच्या उपाययोजना यांची मांडणी केलेली आहे.**

**१. जीवितहानी**
**कधीही भरून न येणारे नुकसान**

मुंबई व्यतिरिक्त सर्वाधिक मनुष्यहानी रायगड जिल्ह्यामध्ये झाली असून त्यापैकी बहुतांश (जवळजवळ ८० ते ८५%) मृत्यू दरडींखाली गाडले गेल्यामुळे झाले आहेत. उर्वरित मनुष्यहानी पुराच्या पाण्यामध्ये वाहून गेल्यामुळे झाली असल्याचे आढळले आहे. शासनाने सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यामध्ये प्रसिद्ध केलेल्या महाराष्ट्रातील जीवितहानीच्या अहवालामध्ये रायगड जिल्ह्यातील मृतांचा आकडा २२१ इतका दिला आहे. स्थानिक परिसरातील विविध जनसंघटना आणि लोकांच्या मते मात्र अतिवृष्टीनंतर आलेल्या विविध आजारांच्या साथीमुळे झालेल्या तसेच सरकारी सर्वेक्षणामध्ये नोंद न झालेल्या मृत्यूंची एकत्रित आकडेवारी त्यापेक्षा बरीच पुढे जाते.

**जीवितहानीचे परिणाम**

जीवितहानी ही कधीही भरून न येणारी आणि म्हणूनच अमूल्य अशी हानी आहे. जवळजवळ सर्व आपद्ग्रस्त कुटुंबांमध्ये जीवितहानीच्या जोडीनेच इतर प्रकारचेही नुकसान झालेले आहे. एका बाजूला जीवितहानीमुळे बसलेला मानसिक धक्का तर दुसऱ्या बाजूला इतर नुकसानातून घर व उपजीविका सुरळीत करण्याच्या जबाबदारीमुळे निर्माण झालेले ताणतणाव अशी दुहेरी झळ या कुटुंबांना सोसावी लागत आहे. अनेक कुटुंबांना घरातील प्रौढ किंवा तरुण म्हणजेच कमावत्या व्यक्तींना गमवावे लागले आहे. साहजिकच अशा कुटुंबांसाठी उपजीविकेचा प्रश्न गंभीर झाला आहे.

ही परिस्थिती लक्षात घेऊन नुकसानग्रस्त कुटुंबांच्या दीर्घकालीन पुनर्वसनाच्या दृष्टीने उपयुक्त आणि व्यवहार्य अशी योजना आखणे ही शासनाची जबाबदारी ठरते. प्रत्यक्षात, शासनाने जीवितहानीनंतर लगेचच संबधित कुटुंबांना प्रत्येक मृत व्यक्तीमागे रु.दोन लाख तर व्यक्ती अधू अथवा अपंग झाली असल्यास रु. १ लाख अशी आर्थिक मदत दिली आहे, परंतु ही रक्कम आजारपणातील खर्च, पूर्वीच्या कर्जांची परतफेड, घरातील इतर नुकसान भरून काढण्यातील खर्च, मानसिक आधारासाठी नातेवाईकांकडे केलेले प्रवास व दैनंदिन घरखर्च यातच संपून जाते, अशी माहिती स्थानिकांशी बोलताना पुढे आली. दीर्घकालीन पुनर्वसनाची मागणी केल्यास शासन 'निधी उपलब्ध नाही' किंवा 'सानुग्रह मदत रु. २ लाख ही पुरेशी मदत आहे' अशी कारणे पुढे करण्याची शक्यता आहे. किंवा उदरनिर्वाहासाठी टेलिफोन बूथ, दुकान असे ग्रामीण अर्थव्यवस्थेशी विसंगत असलेले उपाय सुचवण्याचीही शक्यता आहे.

**■ शासनाकडे मागण्या**

कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झालेल्या कुटुंबांच्या दीर्घकालीन पुनर्वसनासाठी शासनाने पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे:

**अ)** ज्या कुटुंबांमध्ये एक वा अधिक प्रौढ तरुण/कमावत्या व्यक्तींचा मृत्यू झाला असेल आणि विशेषतः स्त्रियांवर उपजीविकेची जबाबदारी येऊन पडली असेल अशा कुटुंबांच्या दीर्घकालीन पुनर्वसनाची विशेष योजना सरकारने आखायला हवी. त्यासाठी ग्रामीण अर्थव्यवस्थेशी व त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीशी अजिबात न जुळणारे असे उपाय करण्याचा आग्रह धरला जाऊ नये. त्याऐवजी अशा कुटुंबांची पूर्वीची उपजीविकेची पद्धती, स्थानिक परिसरात उपलब्ध असलेली संसाधने आणि कुटुंबांच्या क्षमता यांचा विचार करून उपजीविकेचे नवीन पर्याय सुचविले जावेत. त्यातून उपजीविकेच्या कामाची निवड करण्याचे स्वातंत्र्य मात्र आपद्ग्रस्त कुटुंबाला द्यावे.

**ब)** कुटुंबात एकाहून जास्त व्यक्तींचा मृत्यू झाल्यामुळे शासनातर्फे मिळालेली मदत पुरेशी असेल तर अशा रकमेचा काही भाग पुनर्वसनासाठी वापरता येऊ शकेल. परंतु यासाठी कुटुंबाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

**क)** अशा योजनेच्या अंमलबजावणीमध्ये स्थानिक पातळीवरील कर्मचाऱ्यांवर राजकीय अथवा प्रशासकीय वरिष्ठांचा दबाव येण्याची तक्रार कर्मचाऱ्यांकडून नेहमीच केली जाते. हे टाळण्यासाठी अंमलबजावणीच्या प्रक्रियेत स्थानिक


मंडळे (बचत गट, तरुण/युवक मंडळ इ.) आणि स्वयंसेवी संस्था-संघटनांच्या कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग असावा.

**२. घरांचे नुकसान :**
**आता राहाणार कुठे? कसे?**

जीवितहानीनंतर सर्वात महत्त्वाचे नुकसान म्हणजे घरांचे नुकसान. हे नुकसान तीन मुख्य कारणांमुळे झालेले दिसते. (अ) पुरामुळे (ब) अतिवृष्टीमुळे आणि, (क) दरडी कोसळल्यामुळे. याशिवाय डोंगरांना पडलेल्या भेगांमुळे व ओढे वा नाल्यांचे काठ खचल्यामुळे देखील अनेक घरांना मोठा धोका निर्माण झालेला आहे.

**घरांचे नुकसान व त्यांचे परिणाम**
**अ) पुरामुळे झालेले नुकसान**
अतिवृष्टीमुळे तसेच धरणांचे पाणी सोडल्यामुळे नद्यांना मोठ्या प्रमाणावर पूर येऊन नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरले. यामुळे घरांची पडझड झाली आहे; घरातील महत्त्वाच्या चीजवस्तू, महत्त्वाची कागदपत्रे (उदा. दाखले), वह्यापुस्तके, किमती वस्तू, अवजारे इ. गोष्टी वाहून गेल्या आहेत. अशा वस्त्यांचे सर्वेक्षण करून शासनाने बहुतेक घरांच्या नुकसानासाठी भरपाई म्हणून आर्थिक मदतीचे वाटप केले आहे. परंतु नुकसानाचे प्रमाण व तीव्रता लक्षात घेता ही मदत अत्यंत तुटपुंजी ठरली. बहुतेक ठिकाणच्या लोकांनी सांगितल्याप्रमाणे वाटपानंतर दोन आठवड्यांमध्येच ही रक्कम आजारपण व इतर गरजा पूर्ण करण्यात संपून गेली आहे. प्रत्यक्ष घरांच्या दुरुस्तीचा प्रश्न मात्र अजूनही तसाच आहे. यातील काही घरे ही पूररेषेच्या आत असण्याची शक्यता आहे, त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी पुराचे पाणी पूररेषेच्याही वर गेल्याची नोंद आहे. त्यामुळे, या कुटुंबांचे पुनर्वसन करताना पुराची संभाव्य पातळी लक्षात घेऊन, रहाण्यासाठी

## आकृती क्र.२ : बिगरशेती नुकसान



संपूर्ण सुरक्षित ठिकाणे निश्चित करणे गरजेचे आहे. अन्यथा पुढच्या पावसाळ्यातही या घरांची वाताहत होण्याचा धोका आहे. ही ठिकाणे शक्यतो त्याच परिसरातील असल्यास अशा विस्थापितांसाठी पुनर्वसनाची प्रक्रियाही सुकर होईल.

**ब) अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान**
केवळ अतिवृष्टीमुळे घरांचे नुकसान झाल्याची उदाहरणे कोकणात जागोजाग दिसतात. विशेषतः गरीब, वंचित कुटुंबांच्या बाबतीत असे नुकसान फार मोठया प्रमाणात झालेले दिसते. यामधे, घरातील जमिनीस ओल येणे, कौलांचे नुकसान, भिंत/पाया खचणे, पेंढारू (पेंढ्याने शाकारलेल्या) घरांमधून गळणे इ. प्रकारच्या नुकसानाचा समावेश आहे.

अशा वस्त्यांकडे, घरांकडे शासनाने संपूर्ण दुर्लक्ष केले आहे. काही अपवाद वगळता या प्रकारातील बहुतेक घरे सर्वेक्षणातून वगळली गेलेली आहेत, त्यामुळे त्यांना गरज असूनही तातडीची मदत मिळालेली नाही. या कुटुंबांसमोर पुढील काळामध्ये घरांच्या बांधणीचा व दुरुस्तीचा प्रश्न उभा आहे. या कुटुंबांकडे आता घरदुरुस्तीसाठी पैसेही शिल्लक नाहीत आणि इतर प्रकारच्या नुकसानामुळे (उदा. गुरे, शेती, रोजगार न मिळणे) पैसे उभे करणेही त्यांच्या आवाक्यात राहिलेले नाही. अशा कुटुंबांना दुरुस्त्या न झालेल्या घरांमध्येच नाईलाजाने राहावे लागणे ही अक्षरश: मनःस्वास्थ्य बिघडवून टाकणारी बाब असते असे विशेषत: गरीब आदिवासी आणि दलित कुटुंबांशी बोलताना प्रकर्षाने जाणवले.

**क) दरडी कोसळून झालेले नुकसान**
दरडी कोसळल्यामुळे बहुतांश ठिकाणी वस्तीचा ५०% हून जास्त भाग गाडला गेला आहे. अनेक ठिकाणी घरांना तडे जाणे, भेगा पडणे, घरांची पडझड होणे अशा प्रकारचे नुकसानही झालेले दिसते. वरकरणी हे नुकसानही अतिवृष्टी वा पुरामुळे झालेल्या नुकसानासारखेच दिसले, तरी त्याच्या मुळाशी असलेले प्रश्न मात्र वेगळे आहेत. दरड कोसळलेल्या भागातील इतर डोंगरही कोसळण्याचा धोका आहे. त्यामुळे या कुटुंबांचे अन्यत्र, सुरक्षित ठिकाणी कायमस्वरूपी पुनर्वसन करणे जसे गरजेचे आहे, तसेच दरडी कोसळू नयेत यासाठी दीर्घकालीन प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेही गरजेचे आहे.


काही ठिकाणी अशा वस्त्यांमधील कुटुंबांना सरकारने हलवले असून त्यांची तात्पुरत्या निवाऱ्यांमध्ये व्यवस्था केली आहे. मात्र या तात्पुरत्या निवाऱ्यामधील सोयीसुविधा व सांडपाण्याच्या व्यवस्था अतिशय अपुऱ्या असल्याने अरिष्टग्रस्तांची विशेषतः स्त्रिया व मुलांची अतिशय आबाळ होते आहे. त्याचप्रमाणे जागेची उपलब्धता नसणे, निधीचा अभाव इ. कारणांमुळे काही ठिकाणी पुनर्वसनाचे काम अपेक्षित वेगाने पुढे सरकत नसल्याचे चित्र आहे.

**पुर, अतिवृष्टी, दरडी कोसळल्यामुळे आणि डोंगरांना पडलेल्या भेगांमुळे अनेक घरांना मोठा धोका निर्माण झालेला आहे.**

**ड) अतिवृष्टीनंतर घरांना निर्माण झालेला धोका**
दरड कोसळली नसली तरी डोंगरांना भेगा पडल्यामुळे घरांना/संपूर्ण वस्तीलाच धोका निर्माण झाला आहे, अशी ठिकाणे दोन्ही जिल्ह्यांमध्ये जागोजाग आढळतात. याबरोबरच, अतिवृष्टीमुळे नदीनाल्यांचे काठ खचले आहेत, त्यामुळे नाल्याकाठच्या घरांना धोका निर्माण झाला आहे. याशिवाय, एका बाजूने दरड कोसळण्याचा धोका, तर दुसऱ्या बाजूने पुराचे पाणी शिरण्याचा धोका असा दुहेरी धोका असणाऱ्या घरांची संख्याही बरीच आहे. स्वाभाविकपणेच ही सर्व कुटुंबे कमालीच्या ताणाखाली, भीतीच्या छायेतच जगत आहेत. अशा वस्त्यांचे पुनर्वसन कधी करणार हेही अनिश्चित असल्यामुळे या ताणात व असुरक्षिततेत भर पडली आहे.

**■ शासनाकडे मागण्या**
आपद्ग्रस्तांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने खालील उपाययोजना तातडीने करणे नितांत गरजेचे आहे:

**अ)** पूर, भेगा/तडे, नाल्याकाठावरील घरे इ. मुळे असुरक्षित ठिकाणी असलेल्या घरांबाबत अशा सर्व ठिकाणांसाठी विविध क्षेत्रांतील (नियोजन, भूगर्भशास्त्र इ.) तज्ज्ञांची एकत्रित मदत घेऊन गाव/वस्तीनियोजनाच्या दृष्टीने नियम आणि निकष तयार करावेत. स्थानिक परिसराच्या अभ्यासाची ही संपूर्ण प्रक्रिया लोकसहभागाने होणे मात्र अतिशय



**दुरुस्त्या न झालेल्या घरांमध्येच नाईलाजाने रहावे लागणे ही अक्षरश: मनस्वास्थ्य बिघडवून टाकणारी बाब असते असे विशेषत: गरीब आदिवासी आणि दलित कुटुंबांशी बोलताना प्रकर्षाने जाणवले.**

आवश्यक आहे. ही प्रक्रिया पुढील पावसाळ्याच्या आत करून अशा सर्व घरांचे पुनर्वसन त्याच गावांमध्ये अन्यत्र केले जावे.

**ब) अतिवृष्टिग्रस्त घरांबाबत**

अशा कुटुंबांसाठी घरदुरुस्तीचा प्रश्न अतिशय गंभीर आहे हे लक्षात घेऊन इंदिरा आवास योजना किंवा आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत राबवल्या जाणाऱ्या घरदुरुस्ती योजनेच्या धर्तीवर घरांच्या दुरुस्तीसाठी आर्थिक पाठबळ द्यावे.

**क) दरड कोसळलेल्या घरांबाबत**

१) पुनर्वसनासाठी शासनमालकीची जागा उपलब्ध नसल्यास खाजगी पड जमिनी संपादित कराव्यात अथवा बाजारभावाने खरेदी करण्यात याव्यात. अशा जमिनी लोकांच्या शेतजमिनींपासून २ कि.मी.च्या परिघामध्ये असाव्यात. खाजगी पड जमिनी खरेदी करण्यामध्ये शासनास नुकसानग्रस्त कुटुंबे मदत करू शकतील.

२) घरांचे बांधकाम 'इंदिरा आवास योजनेच्या' धर्तीवर न करता पुनर्वसित घरांसाठी घरठाण म्हणून किमान दोन ते अडीच गुंठे जागा पुनर्वसित गावठाणामध्ये मिळावी. यामध्ये घराच्या बांधकामाच्या क्षेत्रफळाशिवाय इतर जागा, गुरांचा वाडा (गोठा), परसबाग, पडवी, लाकूडफाटा साठवायची जागा इ. गरजांसाठी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ शकेल.

३) नुकसानग्रस्त कुटुंबांच्या मूळ घरांचा घरठाणाचा दर्जा पुनर्वसित झाल्यामुळे काढून घेण्यात येणार असला तरीही त्यातील अनेक घरे भातशेतीलगत आहेत. हे लक्षात घेऊन अशा घरांना 'शेतघरे' असा दर्जा देऊन तेथील चांगल्या अवस्थेतील घरांचा गरजेपुरता वापर करण्याची संधी देण्यात यावी.

**३. जनावरांचे नुकसान**

जीवितहानीच्या जोडीनेच सर्व बाधित क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेले आणि तरीही दुर्लक्षित राहिलेले नुकसान म्हणजे जनावरांचे नुकसान. गुरांचे नुकसान मुख्यत्वेकरुन पुढील तीन प्रकारचे आहे:

**जनावरांच्या हानीचे विविध प्रकार**

**गुरांचा वा जनावरांचा मृत्यू**

पुराच्या पाण्यामध्ये वाहून गेल्यामुळे, अतिवृष्टीमुळे आजारी पडून आणि दरडींखाली वरच्या वस्त्या गाडल्या गेल्यामुळे अशा तीन कारणांमुळे जनावरांचा मृत्यू झाल्याचे आढळते. यामध्ये शेतीसाठी उपयुक्त असणारी गुरे व इतर पाळीव जनावरे अशी दोन्ही प्रकारची जनावरे दगावली आहेत.

**जनावरांचे आजार**

अतिवृष्टीमुळे जनावरांच्या, गुरांच्या आजारांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याची दिसते. या आजारांमुळे मृत्यू होण्याचे प्रमाण जसे लक्षणीय आहे, त्याचप्रमाणे गुरे रोगट, अशक्त होऊन त्यांच्यातील काम करण्याची शक्ती कमी होण्याचे प्रमाणही मोठे आहे. अशा प्रकारे हे नुकसान दीर्घकाळ परिणाम करणारे आहे.

**चाऱ्याचा प्रश्न**

पावसाळ्याच्या शेवटी सर्वच जनावरांच्या विशेषतः गुरांच्या चाऱ्याच्या मोठा प्रश्न उभा रहाणार आहे. आधीच अशक्त व रोगट झालेल्या गुरांवर या टंचाईचा अधिक तीव्र परिणाम होण्याची मोठीच शक्यता आहे. भातशेतीचे पीक वाहून गेल्याने आणि उर्वरित पिकावर कीड व इतर रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने यावर्षी भाताचा पेंढा जनावरांसाठी खायला उपलब्ध होणार नाही.



**जनावरांच्या हानीचे परिणाम**

ग्रामीण भागामध्ये शेतकी व बिगरशेतकी अशा दोन्ही प्रकारच्या गुरा–जनावरांची एक अतिशय उपयुक्त भूमिका आहे. जसे ते शेतीसाठी आवश्यक संसाधन आहे तसेच ते बचतीचे, गुंतवणुकीचे व थेट आर्थिक उत्पन्नाचे साधनही आहे. कौटुंबिक आपत्ती, आजार, शिक्षण इ. कारणांमुळे ग्रामीण कुटुंबाना अनेकदा तीव्र आर्थिक चणचणीला तोंड द्यावे लागते. अशा काळामध्ये किमान परंतु हुकमी अर्थप्राप्तीसाठी बिगर शेतकी जनावरे (जसे की गायी, शेळ्या, कोंबड्या, डुकरे इ.) हा एक महत्त्वाचा आधार असतो. याशिवाय, जनावरे हा पोषक आहाराचा एक सहज उपलब्ध असणारा स्त्रोतही असतो. हे लक्षात घेतल्यास, गुरांचे व इतर जनावरांचे नुकसान आपत्तिग्रस्त कुटुंबांच्या अतिशय महत्त्वाच्या अशा मालमत्तेचे नुकसान मानावे लागेल.

यामध्येही कुटुंबांच्या आर्थिक पार्श्वभूमीनुसार या नुकसानाची तीव्रता सापेक्ष असल्याचे दिसते. उदा. एखाद्या कुटुंबासाठी चार शेळ्या व बारा कोंबड्या मरणे म्हणजे आजच्या बाजारभावानुसार २००० ते ३००० रुपयांचे थेट नुकसान आहे. हे नुकसान गरीब, वंचित कुंटुंबासाठी अतिशय तीव्र, निर्णायक ठरू शकते तर तुलनेने सधन कुटुंबासाठी ते कदाचित दखलपात्रही नसते. कारण गरीब कुटुंबासाठी आर्थिक मूल्यापेक्षाही उपजीविकेच्या सुरक्षिततेचे एकमेव साधन म्हणून जनावरांचे स्थान अतिशय महत्त्वाचे असते.

ही वस्तुस्थिती लक्षात घेता शासनाने जनावरांच्या नुकसानाची गांभीर्याने दखल घेणे अतिशय आवश्यक आहे. प्रत्यक्षात मात्र शासनाने या प्रश्नाबाबत कोणतीही भूमिका घेतलेली नाही. शासनाने घरांच्या नुकसानाचे सर्वेक्षण करताना केवळ पूर व दरडीने प्रभावित झालेल्या क्षेत्रांमधील जनावरांच्या हानीचीच नोंद केली आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या जनावरांच्या हानीची दखल मात्र या सर्वेक्षणात घेतलेली नाही. याशिवाय सरकारची संपूर्ण पशुसंवर्धन व पशुवैद्यकीय खात्याची यंत्रणा निष्क्रिय होती, अशी तक्रारही स्थानिकांनी अनेक ठिकाणी नोंदवली.

जनावरांचे आजार आणि भविष्यातील चाऱ्याचे संकट या दोन्ही प्रश्नांवर लोकांकडे कोणतेही उपाय दिसत नाहीत. जनावरांच्या आजारांवरील उपचारांकरता सरकारी यंत्रणा सोडल्यास पर्यायी पशुवैद्यकीय यंत्रणा ग्रामीण भागामध्ये नाही, आणि चाऱ्यासाठी पर्यायी स्त्रोतही नाही. परिणामी उरलीसुरली जनावरे डोळ्यांदेखत गमवावी लागणार अशीच भीती आपद्ग्रस्त व्यक्त करीत आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने पुढील कार्यवाही तातडीने करणे गरजेचे आहे.

**भविष्यात गुरांच्या चाऱ्याच्या मोठा प्रश्न उभा रहाणार आहे. आधीच अशक्त व रोगट झालेल्या गुरांवर या टंचाईचा अधिक तीव्र परिणाम होण्याची मोठीच शक्यता आहे.**

## ■ शासनाकडे मागण्या

१) जनावरांच्या विविध प्रकारच्या नुकसानाचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करून त्याकरिता वेगळी नुकसानभरपाई द्यायला हवी. नुकसानभरपाई आर्थिक स्वरुपात न देता पशुसंवर्धन किंवा समाजकल्याण खात्याच्या योजनांमधून जनावरे देऊन हे नुकसान थेटपणे भरुन काढता येईल. अशा योजनेचे निकष ठरवताना दारिद्र्यरेषा किंवा पूर्वीच्या योजनेतील लाभार्थी वगळणे अशासारखे मापदंड वापरू नयेत. आपत्तीमुळे मृत झालेली जनावरे कर्ज काढून विकत आणली असल्यास अशी कर्जे माफ करावीत.

२) जनावरांच्या आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी पशुवैद्यकीय यंत्रणा कार्यक्षम करणे आवश्यक आहे. त्यासाठी नैसर्गिक आपत्ती ही विशेष बाब मानून या तसेच पुढील वर्षासाठी पशुवैद्यकीय खात्याचा निधी वाढवण्यात यावा



**अतिवृष्टीमुळे, दरडींमुळे आणि पुरामुळेही झालेली रस्त्यांची दुर्दशा मात्र सार्वत्रिक असून शासनाने बांधलेल्या पक्क्या रस्त्यांपेक्षा पायवाटा बऱ्या अशी सर्वसामान्य जनतेची प्रतिक्रिया आहे.**

आणि या यंत्रणेद्वारे आजारांवरील उपचार व नियंत्रणासाठी विशेष मोहीम राबवली जावी.

३) चाऱ्याच्या टंचाईचा प्रश्न आटोक्यात आणण्यासाठी व सरकारची आयत्या वेळी धावपळ होऊ नये यासाठी पाण्याची उपलब्धता असेल तेथे चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देणे, बागायती जमिनींमधील तण साफ करण्यासाठी जनावरे चारण्यास प्रोत्साहन देणे, यांसारखे उपाय राबवले जावेत. यापुढे जाऊन तीव्र टंचाईच्या वेळी कोकणाबाहेरून कडबा आणून जनावरांसाठी मोफत अथवा स्वस्त दराने उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी. यासाठी जिल्हा/राज्य पातळीवर निधीची जमवाजमव करण्यास आतापासूनच सुरुवात करावी. वेळ पडल्यास गुरांची छावणी उभारण्याचीही तयारीही आतापासूनच ठेवावी.

४) जनावरांचे विमे काढण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत.

या सर्व मागण्यांबाबत निधी व मनुष्यबळाची कमतरता असल्याची अडचण निश्चितच सांगितली जाईल. मात्र या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यास राजकीय इच्छाशक्तीची जोड दिल्यास अशा अडचणींवर मात करता येईल.

## ४. पायाभूत सुविधांचे नुकसान

### नुकसानाचे प्रकार व परिणाम

पायाभूत सुविधांमध्ये लोकांच्या दैनंदिन जीवनामध्ये अत्यंत मध्यवर्ती भूमिका असणाऱ्या चार महत्त्वाच्या सुविधा म्हणजे रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्यसुविधा आणि वीजपुरवठा. यापैकी पाणीपुरवठ्याच्या सोयी आणि वीजपुरवठ्याची यंत्रणा सर्वांत मोठ्या प्रमाणावर प्रभावित झाली. ग्रामीण भागांमध्ये आरोग्यसुविधेच्या यंत्रणेवर (दवाखान्याच्या इमारती, औषधांचे साठे इ.) विशेष परिणाम झालेला नसला तरी मुळात ग्रामीण भागांमध्ये वैद्यकीय सुविधा जुन्या शासकीय इमारतींपलिकडे किती शिल्लक आहे हा एक स्वतंत्र संशोधनाचाच विषय आहे. अतिवृष्टीमुळे, दरडींमुळे आणि पुरामुळेही झालेली रस्त्यांची दुर्दशा मात्र सार्वत्रिक असून शासनाने बांधलेल्या पक्क्या रस्त्यांपेक्षा पायवाटा बऱ्या अशी सर्वसामान्य जनतेची प्रतिक्रिया आहे. यापैकी विजेचे खांब, तारा, ट्रान्सफॉर्मर्स आदींच्या दुरुस्तीची जबाबदारी व निर्णय वीज मंडळ या निमसरकारी यंत्रणेच्या अखत्यारीत असतात. शिवाय वीज हा तसा राजकीयदृष्ट्या संवेदनशील असा मुद्दा आहे. त्यामुळे त्याबाबत त्वरित कारवाई सुरू झाली आहे. रस्त्यांच्या बाबतीतली कारवाईदेखील पावसाळा संपताच (अर्थातच विशेष राजकीय प्रभाव असणाऱ्या क्षेत्रांमधे प्राधान्याने) सुरू होईल. परंतु पाणीपुरवठ्याच्या सोयींबाबतीत सरकारने अजून कोणतीही कारवाई अथवा उपायांची घोषणा केलेली नाही.

पाणीपुरवठ्याच्या सोयींमध्ये विहिरींचे नुकसान आणि नळपाणी योजनेच्या संपूर्ण यंत्रणेचे नुकसान सर्वत्र आढळून आले. यात विहिरींच्या काठांची मोडतोड होणे, नदीनाल्याकाठच्या आडांमध्ये, विहिरींमध्ये गाळ येऊन विहिरी संपूर्णपणे भरणे, वाहून जाणे अशा नुकसानाचा समावेश आहे. यामुळे सध्या पावसाळ्यामध्ये जरी पिण्याच्या किंवा शेतीच्या पाण्याची चणचण जाणवत नसली तरीही हिवाळ्याच्या शेवटी याची तीव्र समस्या लोकांसमोर उभी राहील. ज्या पाणीपुरवठा योजनांवर आज शासन पाण्यासारखा पैसा खर्च करते आहे त्यांचीही या अतिवृष्टीमध्ये पुरती वाताहत झाल्याचे दिसते. नळ पाणीपुरवठा योजनांमध्ये मोटाररूमची आणि पाण्याच्या टाकीची पडझड, मोटारींमध्ये पाणी शिरल्याने मोटर निकामी होणे, पाणीपुरवठ्याचे पाईप वाहून जाणे, तुंबणे, गंजणे इ. प्रकारच्या नुकसानामुळे जवळजवळ सर्वच पाणीपुरवठा योजनांमध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत. शासनाच्या 'हस्तांतरणा'च्या धोरणामुळे बहुतेक योजनांच्या व्यवस्थापन व देखभाल–दुरुस्तीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था अथवा

स्थानिक समित्या/मंडळे इत्यादींच्या हाती आहे व त्यांची आर्थिक अवस्था बिकट आहे. एरवी पाणीयोजनेची धड वीजबिलेही भरू न शकणाऱ्या या संस्था दुरुस्तीचा अवाढव्य खर्च कसा पेलतील हा गंभीर प्रश्न आहे. या योजनांच्या नुकसानाचे मूळ वास्तविक पहाता शासकीय धोरणामध्येच दडलेले आहे. स्थानिक परिस्थिती, लोकांच्या आर्थिक क्षमता, गावातील तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्ये, गाव/वाडीतील संस्थात्मक रचनेचा अभाव याचे योग्य भान न ठेवता पाणी योजना आखल्या गेल्या. ठेकेदारांनी पैशाच्या हव्यासाने प्रचंड खर्चाचे बांधकाम व यंत्रणा उभारल्यामुळे त्या योजनांच्या देखभाल–दुरुस्तीचा खर्च वाढला आहे हे निश्चित. खरे तर या दुरुस्तीच्या खर्चाच्या रकमेमध्ये एखादा स्वतंत्र प्रकल्पच राबवता येईल अशी अनेक उदाहरणे सापडतील.

■ **शासनाकडे मागण्या**

शासनाने खालील बाबतीत तातडीने कार्यवाही करावी अशी स्थानिक लोकांची मागणी आहे.

१) ज्या विहिरी संपूर्णपणे वाहून गेल्या असतील तेथे नवीन विहिरी बांधून द्याव्यात.

२) पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर तातडीचा उपाय म्हणून प्रत्येक वाडी–गावातील पुरेसा पाणीसाठा असणारी किमान एक विहीर दुरुस्त करावी अथवा बांधण्यात यावी. हे काम करताना लोकसंख्येनुसार पाण्याची गरज लक्षात घेतली जावी. आवश्यक तेथे पाण्याचा दर्जा तपासून घेऊन पिण्यासाठी योग्य पाणी खराब होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजावेत.

३) पाणीपुरवठा योजनांच्या नुकसानावर त्वरित उपाय म्हणून सर्व ठिकाणी सरसकट दुरुस्तीची कामे हाती घेतली जावीत. या कामामध्ये स्थानिक ठिकाणच्या अर्धप्रशिक्षित परंतु तांत्रिक कामाचा अनुभव असणाऱ्या व्यक्तींचा समावेश असावा. तसेच या निमित्ताने सर्व योजनांची पाहाणी करून आवश्यक तेथे योजना सुरळीत चालवणे, देखभालीचा खर्च कमी करणे इ. उपायांसाठी पाठबळ दिले जावे.

**समारोप करताना,**

अरिष्टकालीन पुनर्वसनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे जनजीवन सुरळीत होणे. या भागात मांडलेले नुकसानाचे स्वरूप व त्यावर आधारित मागण्या लक्षात घेता जनजीवन पुन्हा सुरळीत करण्यात सरकारी यंत्रणेची कार्यक्षमता व संवेदनशीलता हा कितीतरी मोठा घटक ठरणार आहे.म्हणूनच अपुरे मनुष्यबळ, कारभारातील गैरप्रकार या नेहेमीच पुढे केल्या जाणाऱ्या अडचणींवर जनसहभाग वाढवणे, शासनाच्या कारभारातील पारदर्शकता व जाबदायित्व वाढवणे अशांसारख्या मूलगामी उपाययोजनांचा आग्रहही धरायलाच हवा.

**पावसाळ्यामध्ये जरी पिण्याच्या किंवा शेतीच्या पाण्याची चणचण जाणवत नसली तरीही हिवाळ्याच्या शेवटी याची तीव्र समस्या लोकांसमोर उभी राहील.**





# अरिष्टाचा आदिवासी समाजावर परिणाम

**अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानाची तीव्रता आर्थिक, सामाजिकदृष्टया दुर्बल अशा दलितांसाठी अनेकपटींनी वाढल्याचे दिसते. राजकीय पाठबळाअभावी शासनाच्या मदतीतून वगळले जाणे, बिगर दलित समाजाची मदत न मिळणे हे याचे एक उदाहरण. तर वस्तीनियोजनाचा विचार न झाल्याने पाणी सर्वत्र तुंबून रहाणे, सांडपाण्याच्या निचऱ्याची सोय नसल्याने वस्तीत घाण पाण्याचे साम्राज्य पसरणे हे याचे दुसरे उदाहरण.**

**आदिवासींची विशेष परिस्थिती**

आदिवासी लोकसमूह मुळातच अतिशय अभावग्रस्त आणि वंचित आयुष्य जगतात. पिढ्यान्‌पिढ्या निसर्गाच्या जवळ राहणारे, नैसर्गिक साधनसंपत्तीवर आपली गुजराण करणारे आणि त्याचबरोबर निसर्गाचे संवर्धन करणारे आदिवासी समूह आज दारिद्र्य आणि वंचिततेच्या चक्रात अडकलेले दिसतात. याचे मुख्य कारण म्हणजे नैसर्गिक संसाधनावरील आदिवासींचे पारंपरिक हक्क आधुनिक समाजव्यवस्थेत नाकारले गेले आणि आधुनिक विकासासाठी नैसर्गिक संसाधनांचा मुक्त वापर सुरू झाला. यामुळे नैसर्गिक संसाधनांचा दर्जा खालावला आणि त्यावर अवलंबून असणाऱ्या आदिवासी समाजाची उपजीविका धोक्यात आली. या नैसर्गिक संसाधनांचा वापर करून जी औद्योगिक व्यवस्था उभारण्यात आली, तिच्यासाठी आवश्यक कौशल्ये नसल्यामुळे आदिवासी लोकांना उपजीविकेसाठी कमी उत्पादक अशा नैसर्गिक संसाधनांवर अवलंबून राहणे किंवा औद्योगिक व्यवस्थेत अकुशल मजूर म्हणून कष्टाची, धोक्याची कामे करीत राहणे भाग पडते.

अशा तऱ्हेने तगून राहण्याचाच प्रश्न गंभीर बनल्यामुळे आदिवासी समूहाचे सामाजिक व राजकीय सीमान्तीकरण झपाट्याने घडून आले. परिणामी आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या आदिवासी समूह अतिशय दुर्बल आणि सत्ताहीन बनला. त्यामुळे आज आदिवासी समाज कमालीचे दारिद्र्य, निरक्षरता, कुपोषण, बालमृत्यू, रोगराई, मूलभूत सुविधांचा अभाव अशा अवस्थेत जगताना दिसतो. कोणत्याच प्रकारची सत्ता हातात नसल्यामुळे सर्व परिस्थितीबाबत एक हताश भावना आदिवासी लोकांमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळते. आदिवासींच्या या विशिष्ट परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पुरासारख्या आपत्तीमध्ये त्यांचा स्वतंत्र विचार करण्याची गरज आहे.

**अरिष्ट आणि आदिवासी समाज**

अतिशय कमकुवत आणि बिकट उपजीविकेच्या परिस्थितीमुळे कोकणातील अतिवृष्टी आणि पुराचा फटका तेथील आदिवासींना अतिशय तीव्रतेने बसला असे दिसते. अरिष्टाचा आवाका आणि प्रमाण यांच्यामध्ये मुळातील वंचित परिस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात वाढ झाली. अतिवृष्टीमुळे झालेले शेतजमिनींचे आणि पिकांचे नुकसान, गुरांचे नुकसान आणि घरांचे नुकसान यांचे स्वरूप आदिवासी समाजात इतर समाजांसारखेच आहे. मात्र मुळातच अतिशय वंचित परिस्थिती असल्यामुळे या नुकसानाचे अतिशय तीव्र परिणाम आदिवासी समाजावर होतील असे दिसते. धान्याचे राखीव साठे, संकटकाळात वापरता येईल अशी मत्ता (assets) अथवा रोख पैसे आदिवासी समाजाकडे मुळातच अत्यल्प असल्यामुळे अशा आपत्तीला तोंड देणे आदिवासी समाजाला अत्यंत कठीण जाईल. अतिवृष्टीमुळे घराचे नुकसान होऊन घरातील धान्य वाहून जाणे, भिजणे अशा गोष्टी अनेक आदिवासी वाड्यांमध्ये घडल्या. परंतु, धान्य पुन्हा विकत घेण्याइतके पैसे बहुसंख्य लोकांकडे नाहीत. रोज (अथवा आठवडी) मिळणाऱ्या मजुरीतून धान्य विकत घेऊन शिजवायचे अशी परिस्थिती असल्यामुळे आणि पुराच्या अरिष्टाने यावर्षीच्या मजुरीच्या शक्यता संपल्याने दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत आदिवासी लोकांना पडेल, असे दिसते. आदिवासींनी कसलेल्या जमिनीवरचे पीक जेथे वाहून गेले, तेथे या हंगामातील पीक न मिळाल्यामुळे अन्नाचा तीव्र तुटवडा आदिवासी भागात जाणवेल. अशा प्रकारे अरिष्टामुळे आदिवासींचा, विशेषत: स्त्रिया व मुलांचा, अन्न–सुरक्षेचा प्रश्न गंभीर स्वरुप धारण करेल अशी चिन्हे दिसत आहेत. यामुळे उपासमार, टोकाचे कुपोषण, त्यामुळे खालावलेल्या शारीरिक व मानसिक क्षमता असे अनेक दूरगामी परिणाम आदिवासी लोकांवर होतील.

अरिष्टामुळे नैसर्गिक संसाधनांचा जो विध्वंस झाला आहे, त्याचा सर्वाधिक फटका आदिवासींना बसेल असे दिसते. अतिवृष्टीमुळे जंगलावर अवलंबून उपक्रम, मासेमारी इत्यादीवरही यावर्षी गंभीर परिणाम झाला. जेथे शेतजमिनींचे कायमस्वरूपी नुकसान झाले आहे तेथे आदिवासींसाठी भविष्यातील मजुरीच्या संधी अनिश्चित बनल्या आहेत. त्यामुळे मजुरीसाठी स्थलांतर करण्याची



**टोकाचे कुपोषण, कायमस्वरुपी स्थलांतर, शोषणात वाढ असे अरिष्टाचे अत्यंत भयावह परिणाम आदिवासी भागात होतील असे दिसते.**

प्रक्रिया यावर्षी लवकर सुरू होईल असे दिसते. कोकणच्या काही भागात खाणकाम व बांधकाम हा शेतीनंतर दुसऱ्या क्रमांकाचा मोठा व्यवसाय आहे. शेतीच्या नुकसानाप्रमाणेच बांधकाम व्यवसायाशी संबंधित अनेक छोट्यामोठया उद्योगांचे (उदा. वीटभट्टी, खाजगी बांधकामे इ.) या आपत्तीमुळे नुकसान झाल्याने आदिवासी समूहांसाठी मजुरीचे कोणतेही स्त्रोत उपलब्ध नाहीत. सर्वसामान्य परिस्थितीमध्ये ठेकेदार अथवा मुकादमांकडून हंगामी काळासाठी आगाऊ रकमा देऊन आदिवासी बांधला जातो. परंतु आदिवासी वाड्यांवर या वर्षी मुकादम फिरकलेही नाहीत. मजूर जास्त आणि कामाचा तुटवडा या परिस्थितीमुळे आदिवासी मजुरांचे कामाच्या ठिकाणी शोषण वाढण्याची भीती आहे.

आदिवासींचे उपजीविकेचे स्त्रोत जेथे मोठ्या प्रमाणावर बाधित झाले आहेत, तेथे कायमस्वरूपी स्थलांतराची वेळही आदिवासींवर येऊ शकते. असे स्थलांतर म्हणजे आदिवासी कुटुंबासाठी देशोधडीला लागण्याचीच प्रक्रिया असते. कारण नैसर्गिक संसाधनांशी घट्ट नाते असलेली त्यांची जीवनपद्धतीच यामुळे कोसळून पडते. अशा प्रकारे टोकाचे कुपोषण, कायमस्वरूपी स्थलांतर, शोषणात वाढ असे अरिष्टाचे अत्यंत भयावह परिणाम आदिवासी भागात होतील असे दिसते. या सर्व गोष्टींमुळे पुराच्या आपत्तीचे रूपांतर आदिवासींसाठी तीव्र व दीर्घकालीन आघातात आणि सावरता न येण्याजोग्या नुकसानात होईल, असे दिसते.

या संकटाला शासनाकडून काय प्रतिसाद मिळतो आहे याकडे पाहिल्यास पुढील गोष्टी दिसल्या.

**शासनाचा प्रतिसाद**

**अ)** शासकीय पातळीवर काही आदिवासी क्षेत्रांमध्ये खावटी वाटपाचे काम हाती घेण्यात आले आहे. खावटी योजनेअंतर्गत धान्य व इतर गोष्टींचे जे वाटप होईल त्यासाठी ३०% अनुदान असून ७०% रक्कम लाभार्थींनी टप्प्याटप्प्याने फेडायची आहे. ज्यांची रेशनकार्डे अद्ययावत नाहीत अशा कुटुंबांना सदर योजनेचा लाभ मिळणार नाही. तसेच ७०% रक्कम फेडण्याची जबाबदारी लोकांवर टाकल्यामुळे आधीच खचलेली आदिवासी कुटुंबे आणखी कर्जाच्या बोजाखाली अडकतील हे निश्चित.

**ब)** इंदिरा आवास योजनेमार्फत घरे बांधून देण्याचे केवळ आश्वासन आदिवासींना मिळाले असून त्यामध्ये इष्टांकाची अट ठेवून विचार केला जातो आहे. यामुळे ग्रामपंचायतीमार्फत ज्या आदिवासी कुटुंबांची पूर्वीच लाभार्थी म्हणून निवड झाली आहे, केवळ अशा कुटुंबांनाच घरकुल/घरदुरुस्ती योजनेचा लाभ मिळणार आहे. अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त कुटुंबांवर यामुळे अन्याय होईल व ते या लाभापासून वंचित राहतील.

**क)** आरोग्याच्या प्रश्नावर सरकारने कोणतेही पाऊल उचलले नसून प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये पुरेशी औषधे उपलब्ध नाहीत. प्रथमोपचार म्हणून वाटण्यात येणाऱ्या औषधांनी आजार बरे होत नसल्याने खाजगी दवाखान्यांमध्ये धाव घ्यावी लागत असून यामुळे कर्जबाजारीपण वाढते आहे.

**ड)** मजुरीच्या मूलभूत प्रश्नावर सरकारने कोणतीही भूमिका घेतलेली नाही. सरकारने जाहीर केलेली पिकाच्या व जमिनीच्या नुकसानाची मदत मालकी हक्क नसल्याने आदिवासी कुटुंबांपर्यंत पोचणार नाही. आदिवासी स्थलांतरित झाल्यास खावटी, घरकुल, आरोग्य अशा कोणत्याही बाबतीत सरकारला प्रभावी उपाययोजना राबवता येणार नाही.

अरिष्टाचे स्वरूप बघता शासनाने उचललेली ही पावले अतिशय अपुरी आहेत. आदिवासी लोकांना भेडसावणारे अन्नधान्याच्या उपलब्धतेसारखे अतिशय मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी आणि त्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी सरकारने काही गोष्टी तातडीने करण्याची आवश्यकता आहे. तरच आदिवासी समाज या आपत्तीला तोंड देऊन टिकून राहू शकेल.

### आपद्ग्रस्तांच्या वतीने करायच्या मागण्या

१) कोकणातील सर्व पूरग्रस्त क्षेत्रांमध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अंत्योदयच्या दराने धान्य, कडधान्ये, व तेल उपलब्ध करून द्यावे. यामध्ये आदिम जमाती व इतर अनुसूचित जमाती असा भेद ठेवू नये. आदिवासी लोकांची रेशनकार्डे महाराष्ट्रातील कोणत्याही रेशन दुकानांवर चालतील असा विशेष नियम बनवण्यात यावा.
२) मजुरीच्या प्रश्नाची तीव्रता कमी करण्यासाठी आदिवासी भागांमध्ये रोजगार हमी योजनेची कामे सुरू करणे आवश्यक आहे. यामध्ये पायाभूत सुविधांचे नुकसान भरून काढण्यासाठी पुनर्बांधणी व दुरुस्तीची कामे सुरु होऊ शकतात. त्याचबरोबर शेतजमिनींची दुरुस्तीची कामेदेखील मोठ्या प्रमाणावर करता येतील. ही कामे पंचक्रोशी स्तरावर सुरू केल्यास आदिवासींचे स्थलांतराचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल.
३) आदिवासी भागांमधील सर्व वाड्यावस्त्यांचे सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त घरांच्या दुरुस्तीसाठी आदिवासी कुटुंबांना अर्थसहाय्य मिळायला हवे.
४) आरोग्याच्या समस्यांवर उपाय म्हणून आदिवासी वाड्यांसाठी आरोग्य खात्याने विशेष मोहीम हाती घेऊन विविध साथीचे आजार आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करायला हवेत. स्थलांतरित मजुरांच्या वस्त्यांवरदेखील आरोग्यसेवा पोचेल, याची काळजी घ्यायला हवी.
५) ज्या कुटुंबांची महत्त्वाची सरकारी कागदपत्रे व दाखले वाहून गेली असतील अशा कुटुंबांना या कागदपत्रांच्या नक्कल प्रति वाटण्यासाठी एक खिडकी योजना राबवण्यात यावी.

या उपायांवर शासन जे आक्षेप घेऊ शकते असे काही आक्षेप आणि त्याचा प्रतिवाद पुढे मांडलेला आहे.

### शासनाकडून घेतले जाणारे संभाव्य आक्षेप

१) रोजगार हमी योजनेमार्फत मजुरीची कामे सुरू करण्यास पुरेशी मागणी नाही. मजुरीच्या कामांवर लोक येत नाहीत. आदिवासी स्थलांतरित झाल्याने कॉन्ट्रॅक्टरद्वारे कामे पूर्ण करून घ्यावी लागतात. पायाभूत सुविधा व इतर कामे त्या त्या खात्यांच्या अखत्यारीत येत असल्याने त्याकरता रोहयोची आवश्यकता नाही. रोहयोची कार्यप्रणाली किचकट असल्याने व इतर रोजगार योजनांमार्फत कामे काढता येणे शक्य असल्यास रोहयोचा आग्रह का?

२) सरकारने खावटी वाटपाचे काम आदिवासी क्षेत्रांमध्ये सुरू केले असल्याने आदिवासी समाजाकरिता रेशन दुकानांमधून सरसकट धान्य पुरवण्याची आवश्यकता नाही. स्थलांतरित ठिकाणी रेशन पुरवण्यासाठी नियम बदलून सध्याच्या यंत्रणेची पुनर्रचना करावी लागेल. यासाठी केंद्र शासन अनुदान देणार नाही.

३) घरांची–गुरांची नुकसानभरपाई देण्यासाठी पुरेसा निधी शासनाकडे नाही. सध्या असलेल्या निधीमधून घरांच्या दुरुस्तीचा प्रश्न बऱ्याच अंशी सुटेल. याकरता वेगळ्या अथवा वाढीव निधीची आवश्यकता नाही.

४) आरोग्य खात्याकडे निधी कमी असल्यामुळे औषधांचा पुरेसा साठा प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये येत नाही. लोकसंख्येच्या प्रमाणात आवश्यक इतके मनुष्यबळ वैद्यकीय यंत्रणेकडे उपलब्ध नाही.

### आक्षेपांचा प्रतिवाद

१) रेशन दुकानांमार्फत आदिवासी समाजाच्या अन्नसुरक्षिततेचा प्रश्न सोडवायचा असल्यास सार्वजनिक वितरणव्यवस्था अधिक बळकट करण्याची आवश्यकता आहे. याकरिता केंद्राकडून अनुदान न मिळाल्यास आपत्ती ही खास बाब मानून राज्य सरकारने स्वतःच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून याकरिता निधी उपलब्ध करावा. रेशनिंग व्यवस्था बळकट करण्यासाठी स्थानिक संस्था, युवक मंडळे इत्यादींचे सहकार्य घ्यावे व धान्य साठा, दुकानांची संख्या, कर्मचाऱ्यांची संख्या इत्यादी पातळीवर पुरेशी वाढ करून रेशन कार्डे अद्ययावत करण्यासाठी स्वतंत्र मोहीम हाती घ्यावी.

२) स्थलांतरित आदिवासी मार्चच्या सुमारास आदिवासी वाड्यांवर येतात. त्या सुमारास मजुरांना संघटित करून (संस्था, संघटनांच्या सहकार्याने)

## दलितांच्या पुनर्वसनासाठी गरज सामाजिक न्यायाची

**शेतमजुरीअभावी भूमिहीन दलितांच्या उपजीविकेचा प्रश्नही यापुढे अधिकच तीव्र होणार आहे. दलित बेदखल कुळांना पीक वाहून गेले तरीही खोतांचा मक्ता द्यावाच लागणार आहे. त्यासाठी खोतांकडूनच कर्ज घेण्याची, परिणामी घरगडी म्हणून राबण्याची वेळही त्यांच्यावर आली आहे. अभ्यासांतर्गत दिसलेल्या अनारी, अष्टमी (रायगड); कालुस्ते, भिले, गोवळकोट, मजरेकाशी (रत्नागिरी) या वस्त्या अरिष्टानंतर दलितांच्या वाट्याला आलेल्या दुर्दशेची प्रातिनिधिक उदाहरणे आहेत. अशा अरिष्टग्रस्त दलितांचे पुनर्वसन होण्यासाठी तात्पुरती मदतीचीच नव्हे तर सामाजिक न्यायावर आधारित दीर्घकालीन उपायांची गरज आहे.**



५) लोकांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्यसेवा पुरवणे हे शासनाचे कर्तव्य आहे. निधीच्या अडचणीवर मात करण्यासाठी इतरत्र होणारा निधीचा अपव्यय सरकार टाळू शकते. सरकारकडे पुरेसे मनुष्यबळ नसेल तरी अरिष्टाच्या काळात इतर ठिकाणचे मनुष्यबळ एकवटून यावर उपाय काढायला हवा. ग्रामीण भागांत फिरत्या दवाखान्याची सोय करुन लोकांचे आरोग्याचे प्रश्न सोडवता येईल.

**आदिवासींचे उपजीविकेचे स्त्रोत जेथे मोठ्या प्रमाणावर बाधित झाले आहेत, तेथे कायमस्वरूपी स्थलांतराची वेळही आदिवासींवर येऊ शकते.**

रोजगार हमीच्या कामावर घेता येईल. याकरता नोव्हेंबर–डिसेंबर नंतर आदिवासी वाड्यांवर माहिती पोचवणे आवश्यक आहे. स्थानिक स्तरावर काम उपलब्ध नसल्याने आदिवासींना नाईलाजाने स्थलांतर करावे लागते. जर वेळेवर काम मिळत असेल आणि मजुरीचा दर योग्य असेल तर आदिवासी स्थलांतर करणार नाहीत.

३) आपत्तीमुळे कर्जबाजारी झालेला आदिवासी खावटी वाटपामुळे पुन्हा एकदा कर्जात अडकत आहे. यातून काही कुटुंबांना तात्पुरता दिलासा मिळाला तरी ही रक्कम फेडण्याची क्षमता नसल्याने कालांतराने असे आदिवासी कुटुंब थकबाकीदार म्हणून घोषित होतील व त्यामुळे पुढील योजनांच्या लाभातून वगळले जातील. आत्ताच पूर्वीच्या थकबाकी असणाऱ्या कुटुंबांना वगळले जात आहे व जातीचे दाखले, रेशनकार्ड असे दस्तावेज नसलेली कुटुंबेही यातून वगळली जात आहेत. यापुढे खावटी सरसकट सर्व कुटुंबांना अनुदान म्हणून देण्यात यावी.

४) घरांच्या दुरुस्तीसाठी सरकारतर्फे अमलात आणल्या जाणाऱ्या इंदिरा आवास योजनेमध्ये घर बांधणी व घरदुरुस्ती अशा दोन गोष्टींसाठी अर्थसहाय्य दिले जाते. अतिवृष्टीमुळे दोन्ही प्रकारचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले असून सरकारने या योजनेचा निधी वाढण्याची गरज आहे. आदिवासी भागातील वेगवेगळ्या विकासकामांसाठी निधी राखीव ठेवताना आपत्तीच्या पार्श्वभूमीवर विशेष गरजांचा विचार करून विकासकामांचा प्राधान्यक्रम ठरवणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

मुळातच वंचित आयुष्य जगणाऱ्या कोकणातील आदिवासी लोकांना अतिवृष्टी आणि पुराचा अतिशय तीव्र फटका बसला आहे. रोजगाराच्या स्थानिक स्तरावरील संधी नष्ट झाल्यामुळे उपजीविकेसाठी कायमस्वरूपी स्थलांतर करण्याची वेळ त्यांच्यावर येण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेता, सरकारने आदिवासी या सर्वाधिक वंचित गटाची अन्नसुरक्षा आणि उपजीविका–सुरक्षिततेचे उद्दिष्ट ठेवून दीर्घकालीन उपाय आखण्याची गरज आहे.

अर्थात, हे उपाय केवळ आदिवासींपुरते मर्यादित असून चालणार नाही. इतर वंचित गटांचा विचारही पुनर्वसनाच्या कार्यक्रमात प्राधान्याने होणे नितांत गरजेचे आहे. स्त्रिया हा असाच अनेक प्रकारे वंचित असणारा समाज घटक. या वर्षीच्या अरिष्टाची झळ त्यांना कशी पोचली हे समजून घेतल्याशिवाय अरिष्टानंतरचे पुनर्वसन पूर्ण होऊ शकणार नाही. याच मुद्द्याची सविस्तर चर्चा पुढील भागात केलेली आहे.

# स्त्रियांच्या नजरेतून अरिष्ट आणि त्यावरील उपाययोजना

**स्त्रियांचा वेगळा विचार का करायचा?**

नैसर्गिक अरिष्टाचा फटका तर सर्वांनाच बसतो. पूर किंवा पाऊस लहान–मोठा, गरीब–श्रीमंत, स्त्री–पुरुष असा भेद थोडाच करतो? मग स्त्रियांचा वेगळा विचार कशाला करायचा? त्याही कुटुंबाचाच भाग तर असतात, अशी प्रतिक्रिया सहजपणे ऐकायला मिळते. पण या आधीच्या नैसर्गिक अरिष्टांमधल्या अनुभवातून दिसते की, अरिष्टाच्या सर्व टप्प्यांमध्ये स्त्रियांना अधिक धोका असतो, अरिष्टाची झळही त्यांना अधिक तीव्रपणे पोचते. खरे तर अरिष्ट नसतानाही स्त्रियांना दुर्बल किंवा वंचित घटक म्हणून ओळखले जाते, मग अरिष्टाच्या काळात ही वंचितता किंवा दुर्बलता अधिक वाढली तर त्यात नवल ते कसले? अरिष्टानंतर पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे पुनर्वसन होणे अधिक कठीण असते, किंबहुना शासकीय प्रयत्नांमधून ते होण्याची शक्यताही जवळ जवळ नसते. अर्थात याचा परिणाम एकूणच अरिष्टानंतर समाजजीवन सुरळीत होण्याच्या प्रक्रियेवर होतो.

असे का होते? याचे मूळ स्त्रियांच्या जडण–घडणीतच सापडते. कुटुंब सांभाळण्यासाठी लहानपणापासूनच मुलींना तयार केले जाते. ‘स्त्रीचे व्यक्तिमत्त्व–वागणूक कशी असावी,’ याबाबतच्या रूढ कल्पनांनुसार मुलींना वाढवले जाते. मुली/स्त्रियांवर जबाबदाऱ्या भरपूर पण अधिकार आणि संधी मात्र मर्यादित, किंबहुना त्या मिळवण्यासाठीही झगडा असेच चित्र भागात दिसते. उपजीविकेशी संबंधित बहुसंख्य कामे ही स्त्रियांकडेच असतात. गरीब कुटुंबांमध्ये तर घर सांभाळण्याबरोबरच घर चालवण्याची जबाबदारीही अनेकदा स्त्रियांवर असते. विधवा, परित्यक्ता अशांसाठी एरवीही ही दुहेरी कसरत असते. म्हणूनच अरिष्टाच्या काळात आणि नंतरही येणाऱ्या अडचणींची तीव्रता स्त्रियांसाठी आणि त्यातही एकटीनेच घर चालवणाऱ्या स्त्रियांसाठी अनेकपटीने वाढणार हेही उघडच.

कोकणातील अरिष्टाच्या संदर्भात तर स्त्रियांचा वेगळा विचार करायलाच हवा. कारण कोकणात पुरुष मोठ्या प्रमाणावर बाहेरगावी स्थलांतर करतात, गावात राहून घर जगवण्याची आणि स्वतःही तग धरून राहण्याची जबाबदारी स्त्रियांनाच पेलावी लागते. त्यामुळेच, सध्याचा म्हणजे अस्मानी संकटानंतर लगेचचाच काळ नव्हे, तर किमान पुढच्या दिवाळीपर्यंतचा काळ हा कोकणातील घर चालवणाऱ्या आणि सांभाळणाऱ्या स्त्रियांसाठी अतिशय अवघड, किंबहुना कसोटीचाच असणार आहे असे दिसते.

ही सर्व समज घेऊन आम्ही स्त्रियांशी बोलायला, त्यांच्याबाबतचे संदर्भ समजून घ्यायला सुरुवात केली.

**स्त्रियांवरील परिणामाची तीव्रता**

अतिवृष्टीच्या काळात अंगावरचे कपडे व लहान मुले असल्यास मुले सावरत सुरक्षित ठिकाणी पोचणे ही स्त्रियांसाठी कसरतच होती. अशी वेळ आल्यावर बाईमाणूस काय करणार, ही त्या वेळी अनुभवलेली अगतिकतेची, हताशपणाची भावना अद्यापही स्त्रियांच्या मनात घर करून बसलेली दिसते. विशेष

**अरिष्टानंतर पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे पुनर्वसन होणे अधिक कठीण असते.**



पूर ओसरल्यानंतरच्या या काळात एकीकडे स्त्रियांचे शारीरिक कष्ट, मानसिक ताणतणाव, आणि शोषणाच्या शक्यता वाढलेल्या आहेत. दुसरीकडे त्यांना मिळणारे पोषण मात्र कमी झाले आहे.

तातडीची मदत आणि तात्पुरते स्थलांतर या दोन्हीत स्त्रियांचे म्हणणे काय हे कोणी ऐकलेलेच नाही. त्यांच्या गरजाही कोणी समजून घेतलेल्या नाहीत.


सरकारी अधिकारी स्त्रियांपर्यंत पोचलेच नाहीत, मग स्त्रिया त्यांच्यापर्यंत पोचू शकल्या नाहीत यात नवल ते काय?



गरजा असणाऱ्या स्त्रिया, जसे की, गर्भवती किंवा नुकत्याच प्रसूत झालेल्या स्त्रियांसाठी तर सुरक्षित ठिकाणी हलणे ही अक्षरशः जिवावरची जोखीम होती. अशा स्त्रियांचा अबोलपणाही पुष्कळच बोलून जाणारा होता.

जमवलेला सगळा संसार वाहून जाणे हा स्त्री–पुरुष दोघांसाठीही मोठाच आघात. पण पाणी चढल्यावर कोंबड्या–बकऱ्या माळ्यावर चढवायची धडपड केली ती प्रामुख्याने स्त्रियांनी. यात समावेश होता तो प्रामुख्याने आदिवासी आणि भूमिहीन मजूर स्त्रियांचा. अडचणीच्या वेळी विकण्यासारखे आता काहीच उरलं नाही, हे झोळाम्बे गावातील सरू जाधव या दलित भूमिहीन स्त्रीचे हताशपणे काढलेले उद्‌गारही या संदर्भात लक्षात घेणे गरजेचे आहे.
जीवानिशी घर सोडावे लागण्याचा धक्का अजूनही ओसरलेला नाही. पुन्हा असे झाले तर काय, ही भीती स्त्रियांच्या मनात घर करून बसलेली आहे. घराच्या–मुला–बाळांच्या सुरक्षिततेबरोबरच इतरही अनेक कारणांमुळे स्त्रियांच्या मानसिक–व्यावहारिक जबाबदाऱ्या वाढलेल्या दिसतात. अगदी तान्ह्या मुलांपासून ते इतरांची आजारपणे काढणे हे कोणालाच चुकलेले नाही. स्त्रियांनाही ताप, अंगदुखी, सर्दी, पोटाचे आजार अशी दुखणी सोसावी लागली, पण स्वतःच्या दुखण्याकडे लक्ष देण्याइतकी फुरसत आणि पैसा क्वचितच स्त्रियांकडे असतो. आजारपणाचे व्यवधान थोड्याच दिवसांसाठी असले तरी दैनंदिन कामातच अनेक व्यवधाने नव्याने निर्माण झालेली आहेत. उदाहरणार्थ, घरात ओल आणि चिखल आला असताना बायांना घरातच राहून साफसफाई करणे, ओले सरपण वापरून रांधणे ही कामे करायलाच लागतात.

| **समस्या** | **स्त्रियांवरील परिणाम** |
|---|---|
| **अन्नधान्याचा तुटवडा** | स्त्रियांसाठी कुपोषणजन्य आजार |
| **शेतीचे नुकसान** | शारीरिक श्रम वाढणार,<br>शेती पुन्हा कसण्यासाठी पुरुषांवरचे अवलंबित्व वाढणार |
| **शेतमजुरी संपुष्टात** | भूमिहीन अल्पभूधारक स्त्रियांसाठी मिळकतीचा हमखास उपाय बंद होणार |
| **गुरांचे, विशेषतः कोंबड्यांचे नुकसान** | स्त्रियांजवळची हुकुमी बेगमी संपणार, परिणामी असलेच तर दागिनेही विकावे लागणार. कर्जबाजारीपणा आणि त्यातून होणारे शोषणही वाढणार |
| **जंगल, नदी यांचे नुकसान** | सरपण, वनोपज वस्तू, मासे इ. बिनपैशात मिळणारी मिळकत रोडावणार |
| **सांडपाणी निचरा, पायवाटा रस्ते अशा सार्वजनिक सुविधांचे नुकसान** | आरोग्यावर परिणाम होणार. दळणवळण तुटल्याने बाहेरच्या जगाशी संपर्क साधणे अधिकच अवघड होणार. |
| **गावातली मजुरी संपली** | स्थलांतर आणि त्यातून होणारे शोषण व असुरक्षितता वाढणार. या सर्वांचा परिणाम म्हणून स्थलांतरात वाढ, पैशाची गरज वाढणार, मिळकत मात्र जवळजवळ बंद होणार, स्त्रियांच्या शोषणात वाढ होणार |



पूर ओसरल्यानंतरच्या या काळात एकीकडे स्त्रियांचे शारीरिक कष्ट, मानसिक ताणतणाव, आणि शोषणाच्या शक्यता वाढलेल्या आहेत. दुसरीकडे त्यांना मिळणारे पोषण मात्र कमी झाले आहे. पूर आणि पाऊस जेमतेम ओसरल्यावर, सप्टेंबर महिन्यापर्यंत दिसणारे चित्र हे असे आहे. या पुढच्या काळातील म्हणजे किमान पुढच्या दिवाळीपर्यंतची परिस्थिती काय असेल याबाबतचे अंदाज या चित्राच्या आधारे कोणालाही करता यावेत.

पूर आणि अतिवृष्टीमुळे आतापर्यंत झालेल्या नुकसानाचे परिणाम केवळ तात्पुरते नसून दूरगामी आहेत असे दिसते. जसे की, शेतीचे नुकसान व रोजगारसंधीत घट, नैसर्गिक संसाधने आणि सार्वजनिक सुविधांचे नुकसान. या प्रकारचे नुकसान भरून यायला अर्थातच बराच काळ जावा लागणार, पर्यायाने त्याची झळही स्त्रियांना दीर्घकाळ सोसावी लागणार हे स्पष्ट आहे.

सध्याच्या नैसर्गिक अरिष्टाची झळ स्त्रियांना कशी आणि किती काळ लागणार याची ही एक झलक. या पार्श्वभूमीवर सरकारी मदतीबाबतचे चित्र आम्हाला असे दिसले:

**स्त्रियांचे शासकीय यंत्रणेबाबतचे अनुभव**

सरकारी मदत अरिष्टग्रस्तांपर्यंत पोचण्यात येणारे अडथळे हा विषय नवा अर्थातच नाही. तातडीची मदत पोचण्याची गरज असूनही तातडीच्या मदतीतून स्त्रिया, विशेषतः एकट्या स्त्रिया, वगळल्या गेल्या. सरकारी अधिकारी स्त्रियांपर्यंत पोचलेच नाहीत, मग स्त्रिया त्यांच्यापर्यंत पोचू शकल्या नाहीत यात नवल ते काय? तात्पुरत्या स्थलांतराबाबतही हेच घडलेले दिसते. आंघोळीसाठी कपडे बदलण्यासाठी आडोसा, देहधर्मासाठी सोयीची जागा यांसारख्या कोणत्याही स्त्रीला आवश्यक सुविधांचा विचार अशा तात्पुरत्या निवाऱ्यांमध्ये झालेला नाही, मग विशेष गरजा असणाऱ्या म्हणजेच गर्भवती किंवा नुकत्याच प्रसूत झालेल्या, अपंग, वृद्ध अशा स्त्रियांच्या गरजांचा विचार (जो एरवीही होणे कठीण असते) तरी कसा होणार?

तातडीची मदत आणि तात्पुरते स्थलांतर या दोन्हीत स्त्रियांचे म्हणणे काय हे कोणी ऐकलेलेच नाही. त्यांच्या गरजाही कोणी समजून घेतलेल्या नाहीत. शासन यंत्रणेचा संपर्क पुरुषांशीच होत असल्यामुळे स्त्रियांना निर्णय प्रक्रियेत सहभागाची संधीही नाही. मदत कुटुंबांपर्यंत पोचली तरी थेट स्त्रियांच्या हाती न आल्यामुळे ती वापरण्याचा अधिकारही मर्यादित असतो. पुरुषांच्या हाती पैसा गेला की दारू वा तत्सम चैनीला प्राधान्य मिळण्याची शक्यता जास्त असते असा जगभरातील अनुभव आहे. यासंदर्भात 'पुरुषमाणूस चैनीसाठी खर्च करणारच,' हे हळू आवाजातले ओझरते वाक्य आणि त्याला इतरजणींकडून मिळालेला मूक होकार पुरेसा बोलका होता.

तातडीच्या मदतीबाबत स्त्रियांचे अनुभव असे असतील तर पुनर्वसनाच्या काळात त्यांना अनेक अडचणी, अनुभवांना तोंड द्यावे लागणार हे अटळच. स्त्रियांच्या पुनर्वसनात सरकारी यंत्रणेच्या कारभारामुळे अनेकविध प्रश्न येतील हेदेखील स्पष्टपणे दिसते आहे.

अशा बिकट परिस्थितीतदेखील स्त्रियांनी हात–पाय गाळलेले नाहीत, काहीतरी करुन निभवावे लागणार ही भावना अनेकींनी व्यक्त केली. या संदर्भात 'स्त्रियांचा भर नेहेमी टिकून राहण्यावर आणि टिकवण्यावर असतो,' हे स्त्रीवादी चळवळीतील काही अभ्यासकांचे म्हणणे, समर्पक वाटते. पूर आणि पाऊस चालू असताना काही स्थानिक स्त्रियांनी दाखवलेली हिंमतदेखील या मुद्द्याच्या संदर्भात लक्षात घ्यायला हवी. संघटनांचे पाठबळ आणि स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांचे सहकार्य, प्रोत्साहन या दोन्हींच्या आधारे काहीजणींनी सरकारी प्रयत्नांची परिणामकारकता वाढवली. एरवी जिथे शासनयंत्रणा पोचलीच नसती, तिथे या स्त्रियांच्या पुढाकाराने तातडीची मदत पोचली. रायगड जिल्ह्यातील रिळ्याची वाडी, खांदाडची वाडी, रत्नागिरी जिल्ह्यातील सोमेश्वर बौद्धवाडी ही अशा ठिकाणांची ठळक उदाहरणे आहेत. अपार कष्ट करण्याची तयारी, प्रतिकूल परिस्थितीतही तग धरून राहण्याचं कौशल्य, सहजा सहजी हात पाय न गाळण्याची मानसिकता ही खास स्त्रियांची

ताकद, अरिष्टाच्या काळात तर अतिशय महत्त्वाची ठरते. या ताकदीची आणि शासनाच्या आपत्कालीन यंत्रणेशी सांगड कशी घालता येईल याचा विचार करणे परिणामकारक पुनर्वसनाच्या दृष्टीने अतिशय गरजेचे आहे. स्त्रियांची ताकद आणि क्षमतांची सांगड शासनाच्या आपत्कालीन यंत्रणेशी, त्यातील तरतुदींशी घालणे निश्चितच शक्य आहे. मात्र त्यासाठी गरज आहे ती यंत्रणेने संवेदनशील होण्याची, हे या उदाहरणांमधून ठळकपणे पुढे येते.
नैसर्गिक अरिष्टाबाबतचे स्त्रियांच्या संदर्भातील चित्र बघताना हे म्हणावे लागते की,

- अरिष्टाच्या सर्व टप्प्यांमध्ये स्त्रियांना अधिक झळ पोचलेली आहे.
- अरिष्टामुळे झालेले नुकसान कोणत्याही प्रकारचे असले तरी त्याचा परिणाम थेटपणे तसेच अप्रत्यक्षपणे स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्यावर झालेला आहे.
- एकट्या स्त्रियांच्या उपजीविकेची त्याचप्रमाणे सुरक्षिततेची समस्या अनेकपटीने गंभीर होण्याचा धोका आहे.
- तरीही स्त्रियांनी हातपाय गाळलेले नाहीत, काही ठिकाणी तर स्त्रियांनी इतरांपर्यंत मदत पोचवण्यासाठी आणि सरकारी मदतकार्याची परिणामकारकता वाढवण्यासाठीदेखील विशेष धडाडी दाखवलेली आहे.
- सरकारी मदतकार्यात आणि एकूणच शासकीय पातळीवरील आपत्ती व्यवस्थापनात

यापैकी कोणत्याही मुद्द्यांचा विचारच झालेला नाही.
स्त्रियांशी बोलताना, त्यांची परिस्थिती समजून घेताना आमच्या डोळ्यांसमोर उभे राहणारे चित्र हे असे आहे. या चित्राच्या आधारे आपत्ती व्यवस्थापनात स्त्रियांचा विचार कसा करता येईल आणि त्याआधारे स्त्रियांचे पुनर्वसन परिणामकारक व्हावे यासाठी कोणते ठोस उपाय करता येतील याची मांडणी यापुढे करत आहोत. या उपाययोजनांबाबत जे आक्षेप घेतले जातील, त्यांचाही विचार या मांडणीत केलेला आहे.

## ■ शासनाने हे करायलाच हवे : मागण्या, आक्षेप व प्रतिवाद

### १. ठोस उपाययोजनांसाठी समिती

येत्या वर्षभरातील अरिष्ट व्यवस्थापन व पुनर्वसन कार्यक्रम परिणामकारक होण्यासाठी त्यात स्त्रियांच्या समस्यांना प्राधान्य मिळणे अनिवार्य आहे हे लक्षात घेऊन, सध्याचे नैसर्गिक अरिष्ट व स्त्रिया या संदर्भात ठोस उपाययोजना सुचवण्यासाठी राज्यशासनाने तातडीने एका समितीची नेमणूक करावी. या समितीने राज्यभरातील पूर व अतिवृष्टिग्रस्त भागातील स्त्रियांच्या समस्यांचा आढावा घेऊन सध्याच्या आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन कार्यक्रमात कोणते बदल करणे गरजेचे आहे याबाबतच्या ठोस सूचना मांडाव्यात. या तरतुदी अरिष्टग्रस्त स्त्रियांच्या समस्यांशी थेटपणे निगडित असाव्यात यासाठी या सर्व प्रक्रियेत स्त्रियांच्या प्रश्नांवर काम व अभ्यास करणाऱ्या किमान पाच अनुभवी व्यक्तींचा समावेश असावा. दीर्घकालीन पुनर्वसनाचा प्रश्न हा अरिष्टग्रस्त स्त्रियांसाठी जगण्यामरण्याचा प्रश्न आहे. हे लक्षात घेऊन ही सर्व प्रक्रिया अतिशय शीघ्र गतीने कमाल दीड महिन्यांत पूर्ण व्हावी.

या संदर्भात कदाचित असे म्हटले जाईल की, स्त्रियांचा प्राधान्याने विचार करण्यासाठी सध्याच्या काळात वेगळा वेळ घालवणे आवश्यक/व्यवहार्य होणार नाही. कुटुंबांचा विचार व पुनर्वसन या दोन मुद्द्यांवर नजीकच्या काळात लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, त्यातून स्त्रियांचा विचार आपोआप होईल.

खरेतर, स्त्रियांचा विचार 'आपोआप' होत नाही. तो करावा लागतो, याउलट स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून ठोस उपाययोजना राबवल्यास 'कुटुंबाचा' विचार आपोआप होतो आणि पुनर्वसनाच्या कार्यक्रमांची गती आणि परिणामकारकता वाढते. असे आजवरचा विविध क्षेत्रातला अनुभव आणि अभ्यास सांगतो.

### २. गावपातळीवर स्त्रियांच्या समित्या

आपत्तिप्रवण भागात आपत्ती–पूर्वतयारीसाठी स्त्रियांच्या व शक्य तेथे महिला ग्रामसभांच्या

**स्त्रियांची ताकद आणि क्षमतांची सांगड शासनाच्या आपत्कालीन यंत्रणेशी, त्यातील तरतुदींशी घालणे निश्चितच शक्य आहे. मात्र त्यासाठी गरज आहे ती यंत्रणेने संवेदनशील होण्याची !**

सहभागातून गावसमित्या तयार करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी.

**३. नुकसान भरपाई स्त्रियांच्या नावे**
नुकसानभरपाई देताना ती घरातील स्त्रियांच्या नावे द्यावी असे आदेश शासनाने गावपातळीवरील मदतयंत्रणेसाठी काढावेत.

वरील दोन मागण्यांबाबत असा आक्षेप घेतला जाऊ शकेल की, घरातील स्त्रीच्या नावे मदत देणे हा केवळ उपचार होऊ शकतो. शिवाय स्त्रियांच्या हाती पैसे आल्यास इतरांकडून शोषण वाढण्याचीच शक्यता आहे.

**सामुदायिक संसाधनांचा उपयोग केल्यास गावाच्या परिसरात अनेक कामे निघू शकतील. त्यातून स्त्रियांना मजुरीबरोबरच, उपजीविकेची सुरक्षितता मिळेल.**

खरेतर, गैरवापर होईल किंवा केवळ उपचार होईल म्हणून संधीच निर्माण न करणे अयोग्य आहे. सुरवातीला व काही ठिकाणी त्याचा गैरवापर झाला तरी अंतिमतः स्त्रियांना त्याचा फायदा होईल. महिलांसाठी आरक्षण हे याचे बोलके उदाहरण आहे.

**४. स्त्रियांसाठी पोषक आहार योजना**
किमान येत्या सहा महिन्यांसाठी सर्व पूर–अतिवृष्टीग्रस्त स्त्रियांसाठी पोषक आहार योजना सुरू करावी. आदिवासी व भूमिहीन स्त्रियांसाठी ती पुढील दिवाळीपर्यंत चालू ठेवावी. या योजनेअंतर्गत कुटुंबातील प्रत्येक स्त्रीच्या मागे दरमहा दहा किलो तांदूळ व तीन किलो डाळ जादा देण्यात यावी.

याबाबत कदाचित असे म्हटले जाईल की, रेशनकार्डवर कुटुंबाला धान्य उपलब्ध करून देणे पुरेसे आहे, स्त्रियांना वेगळा जादाचा आहार मिळण्याची गरज नाही. असाही आक्षेप घेतला जाईल की, पोषक आहारासाठी निधी अपुरा असल्यामुळे तो देणे अवघड होईल. त्याचे व्यवस्थापन करणेही यंत्रणेसाठी अवघड असेल. अर्थात आधी म्हटल्याप्रमाणे स्त्रियांच्या या प्राथमिक गरजांसाठी शासनाने निधीची सबब सांगणे गर्हणीय ठरेल.

**५. नियमित आरोग्य तपासण्या**
पुढच्या दिवाळीपर्यंत स्त्रियांसाठी किमान तालुकापातळीवर नियमितपणे आरोग्य–तपासण्या आयोजित केल्या जाव्यात. या तपासणीसाठी, स्त्री डॉक्टर उपस्थित असल्याच पाहिजेत.

आरोग्य तपासण्यांसाठी निधी व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांसाठीची तरतूद अपुरी आहे, अशी अडचण सांगितली जाण्याची शक्यता आहे. या अडचणींच्या बाबतीत असे म्हणता येईल की, भविष्यात अन्नधान्याचा तुटवडा अटळ असल्याने स्त्रियांना कुपोषणजन्य आजार होणारच, शारीरिक कष्टही वाढणारच, त्यामुळे जादा धान्य मिळणे अतिशय गरजेचे आहे. पोषक आहारासाठी महिला व बालकल्याण, सार्वजनिक आरोग्य व आपत्ती व्यवस्थापन या तिन्हींमधून एकत्रितपणे पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकेल. त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी अंगणवाडी सेविका–सहायिका यांच्या जोडीने गावातील स्त्रियांचा सहभाग पुरेसा होईल. तो महिला ग्रामसभेच्या सल्ल्याने राबवण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे सोपवता येईल. आरोग्य तपासण्यांसाठी देखील अशाच प्रकारे स्त्रियांचा सहभाग घेता येईल.

**६. स्त्रियांच्या अडचणींचे गावपातळीवर सर्वेक्षण**
अंगणवाडी सेविका, एएनएम, सुशिक्षित मुली–स्त्रिया, यांनी ग्रामसेवक तलाठी यांच्या मदतीने गाव व वाडी–वस्तीतील स्त्रियांचे सर्वेक्षण करावे. त्यात स्त्रियांना व एकट्या स्त्रियांना येणाऱ्या अडचणी, विशेषतः कागदपत्रांचे नुकसान, स्त्रियांच्या गरजा, त्यांना पोचणारी मदत, या मुद्यांबाबत माहिती जमा करावी. त्याआधारे ग्रामपंचायतींनी गावातील कोणत्या स्त्रियांना कोणती मदत मिळणे गरजेचे आहे याची तातडीने नोंद घेऊन गट विकास अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे या नोंदी लिखित स्वरुपात पोचवाव्यात.

याबाबत असा आक्षेप घेतला जाऊ शकतो की, स्त्रियांच्या अड्चणींचे सर्वेक्षण करणे यंत्रणेवर हा अतिरिक्त भार आहे. माहितीचे विश्लेषण, अहवाल तयार करणे यासाठी लागणारे तांत्रिक मनुष्यबळ व वेळ देणे सध्याच्या परिस्थितीत अनावश्यक आहे.
या आक्षेपाचा प्रतिवाद असा करता येईल की, आरोग्य तपासणीसाठी तसेच सर्व्हेसाठी गावातील स्त्रियांचा सहभाग घेतल्यास यंत्रणेवरील भार कमी

करता येईल. सर्वेक्षणाचा आराखडा व विश्लेषण सुटसुटीत कसे करता येईल याबाबत स्वयंसेवी संघटना–अभ्यासक यांचा सहभाग घेता येईल.

**७. शासकीय कार्यालयात विशेष कक्ष**
पूर/अतिवृष्टीमुळे नुकसान झालेली कागदपत्रे स्त्रियांना तातडीने मिळावीत यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर विशेष कक्ष चालू करावेत व त्याबाबत रेडिओ, टीव्ही वरून माहिती द्यावी.

**८. शासकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती**
बीडीओ–तहसीलदार यांनी दर महिन्याला किमान चार महिला ग्रामसभांना उपस्थित राहून स्त्रियांना कोणत्या अडचणी आहेत याची नोंद घ्यावी, त्यानुसार कार्यवाहीचा पाठपुरावा करावा. यातील किमान एक सभा आदिवासी पाड्यावर झाली पाहिजे.

७ व ८ या मागण्यांबाबत अशा अडचणी सांगितल्या जातील की, महिला ग्रामसभांना उपस्थिती हा बीडीओ–तहसीलदारांवर अतिरिक्त भार असल्याने त्यात नियमितपणा राहाणार नाही. विशेष कक्ष सुरु करण्यासाठी मनुष्यबळ अपुरे आहे. परंतु, अरिष्ट काळात स्त्रियांसारख्या वंचित घटकांना सहाय्य देण्यासाठी कामाचा जादा भार घेणे यंत्रणेचे कर्तव्यच आहे.

**९. स्त्रियांसाठी रोजगार हमी योजना**
जिथे मजुरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या काम सुरु करण्यासाठी पुरेशी असेल तिथे गावात, नसेल तिथे पंचक्रोशीत रोजगार हमीची कामे तातडीने सुरू व्हावीत. कोणती कामे याची चर्चा ग्रामसभेत व निर्णय महिला ग्रामसभेत व्हावा. रोजगार हमीची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी गावपातळीवरील रोजगार हमी समितीत किमान दोन मजूर स्त्रियांना सदस्यत्व दिले जावे. रोजगार हमीच्या कामांचा हिशोब कसा करायचा याचे प्रशिक्षण मजूर स्त्रियांना दिले जावे.

याबाबतीत असा आक्षेप घेतला जाईल की, स्त्रिया करू शकतील अशी कामे गावपातळीवर निघणार नाहीत. एका गावात काम सुरू करण्यासाठी स्त्रियांची संख्या पुरेशी नसेल. बहुसंख्य स्त्रिया अशिक्षित असल्यामुळे मजुरीचा हिशेब करण्यासाठी त्यांना प्रशिक्षित करणे शक्य होणार नाही.

यावर असे म्हणता येईल की, सामुदायिक संसाधनांचा उपयोग त्या दृष्टीने केल्यास गावाच्या परिसरात अनेक कामे निघू शकतील. त्यातून स्त्रियांना मजुरीबरोबरच, उपजीविकेची सुरक्षितता मिळेल. गावातील सुशिक्षित स्त्रिया, मुलींचा सहभाग घेऊन प्रशिक्षण करता येईल, हिशेब समजावून सांगण्याची जबाबदारीही त्यांच्याकडे देता येईल. बचतगटांच्या माध्यमातून अशिक्षित स्त्रियाच पैशांची मोठी उलाढाल सांभाळतात, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

**समारोप करताना,**
वर सुचवलेल्या मागण्या, त्यावरील आक्षेप आणि त्यांचा प्रतिवाद हा काही गावांतील वाड्या–वस्त्यांमधील अनुभवावर आणि त्याच्या विश्लेषणावर आधारित आहे. जनसंघटना आणि अभ्यासकांनी यात भर घातल्यास आणि या सर्व मागण्या व त्यामागील युक्तिवाद अधिक व्यवहार्य व नेमके होऊ शकतात आणि त्यांचे रूपांतर स्त्रियांचा संवेदनशीलतेने व प्राधान्याने विचार करणाऱ्या आपत्ती–व्यवस्थापन व पुनर्वसन कार्यक्रमात होऊ शकते. शासकीय यंत्रणेची या मुद्द्यांबाबतची अनास्था बघता या सर्व कार्यक्रमांमागे चळवळींची ताकद उभी करणे अनिवार्यच आहे. त्याचप्रमाणे सुजाण नागरिकांपर्यंत या दुर्लक्षित पण अतिशय महत्त्वाच्या विषयाचे गांभीर्य पोचणे अतिशय आवश्यक आहे.

**बीडीओ, तहसीलदार यांनी महिला ग्रामसभांना उपस्थित राहून स्त्रियांना कोणत्या अडचणी आहेत याची नोंद घेणे गरजेचे आहे.**





# अरिष्टाचे मूळ : कारणे व उपाय

अहवालाच्या आधीच्या प्रकरणामध्ये कोकणातील अरिष्टामुळे जे विविध प्रकारचे नुकसान झाले त्याची व त्यावरील उपाययोजनेची विस्ताराने चर्चा आपण केली. या साऱ्या नुकसानामागे जे पूर व दरडकोसळीचे अरिष्ट आहे त्याचे मूळ कशात आहे हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. पूर व दरड कोसळणे म्हणजे भूकंप किंवा सुनामी नव्हेत की ज्यावर कोणतेच मानवी नियंत्रण आणता येत नाही, किंवा त्याचा प्रतिबंध करता येत नाही. त्यामुळे कोकणातील या नैसर्गिक अरिष्टाची मुळे शोधून त्यावर योग्य ती उपाययोजना करुन या अरिष्टांचा प्रतिबंध करणे, त्यांची भविष्यात पुनरावृत्ती होणार नाही हे पाहणे आवश्यक ठरते.

'अतिवृष्टीमुळे पूर आला व कमकुवत डोंगर भाग दरडीच्या रूपाने कोसळले' हे या अरिष्टाचे साधे स्पष्टीकरण अनेकदा पुढे केले गेले. त्याला अनुसरुन पुराचा प्रतिबंध करण्यासाठी धरणे बांधा, पूर व धूपप्रतिबंधासाठी चीन, अमेरिका, डेन्मार्क प्रमाणे लांबलचक भिंती बांधा, ड्रेजरने पात्रातील गाळ खणून काढा असे अनेक उपायही सुचवले गेले. मात्र एका बाजूने शेतकऱ्यांशी, स्थानिकांशी व दुसऱ्या बाजूने या विषयातील तज्ज्ञांशी बोलताना मात्र एक वेगळेच चित्र उलगडत गेले. एक नवा दृष्टिकोन मिळाला त्याची चर्चा अहवालाच्या ह्या प्रकरणात केली आहे.

### १. परिसंस्थात्मक दृष्टिकोनातून पाहताना

या अरिष्टाच्या मुळाशी पोचण्यासाठी थोडे जाणकारीने, तपशीलाने व नवे विज्ञान लक्षात घेऊन निसर्गाकडे पाहायला हवे, असे लक्षात आले. नद्या, डोंगर, झाडे, प्राणी हे निसर्गातील घटक स्वतंत्र किंवा वेगवेगळे नाहीत. त्यांचा परस्परांशी घट्ट संबंध आहे. त्यातील प्रत्येक घटक इतर घटकांकडून काहीतरी घेत असतो व इतर घटकांना काहीतरी देत असतो. त्यातल्या एका घटकावर काही परिणाम झाला, त्यात काही बदल झाला तर त्याचे पडसाद इतर घटकांवर उमटतात. या विविध घटकांच्या अशा परस्पर देवाणघेवाणीतून अनेक नैसर्गिक प्रक्रिया उभ्या राहतात. थोडक्यात हे सगळे घटक तुटक तुटक नसून ते परस्परांशी जिवंतपणे बांधलेले असतात. त्यांच्यात जैव म्हणावे असे परस्परसंबंध असतात. अशाप्रकारे ते एक कुटुंब किंवा संस्था म्हणून काम करत असतात. त्यांच्या या परस्परावलंबी अशा एकत्रित अस्तित्वालाच नैसर्गिक परिसंस्था म्हणून ओळखले जाते. ह्या परिसंस्था स्थानिक, खंडीय, अथवा वैश्विक अशा विविध पातळ्यांवर काम करीत असतात.

या परिसंस्थांतर्गत जे घटक असतात, ज्या नैसर्गिक प्रक्रिया चालू असतात, जी उत्पादने घडत असतात त्यांचा मानवाला देखील खूप फायदा होत असतो, नव्हे मानवी जीवन जणू त्यावर अवलंबूनच असते. मानवी जीवनाला विविध प्रकारे आधार पुरवणाऱ्या अनेक वस्तू (उदा. प्राणवायू व अन्न) तसेच अनेक सेवा (उदा. पिण्यायोग्य पाणी, घाण पचवणारी व्यवस्था) ह्या नैसर्गिक परिसंस्थांतून उपलब्ध होत असतात.

त्याचबरोबर मानवी जीवनाचा हस्तक्षेप व त्याचे परिणामही भोवतालच्या नैसर्गिक परिसंस्थांवर विविध प्रकारे होत असतात. ह्या मानवी हस्तक्षेपामुळे किंवा विविध नैसर्गिक प्रक्रियांमुळे परिसंस्थांनादेखील सतत बाह्य म्हणावे असे धक्के बसत असतात, त्यात व्यत्यय येत असतात. अनेकदा हे धक्के किंवा व्यत्यय पेलून किंवा पचवून त्या परिसंस्थांचे काम चालूच राहते. त्यातील घटक व प्रक्रियांमध्ये तीव्र बदल अथवा बिघाड होत नाहीत व त्यातून मानवी जीवनाला जीवनाधार मिळत राहतात. अशा परिस्थितीत त्या परिसंस्थेचा समतोल कायम राहिला असे म्हटले जाते.

मात्र असे बाह्य धक्के अथवा व्यत्यय पेलण्याची/पचवण्याची ताकत वेगवेगळ्या ठिकाणच्या परिसंस्थांमध्ये वेगवेगळ्या प्रमाणात असते. ज्या परिसंस्थांमध्ये ही ताकद कमी असते त्यांना नाजूक परिसंस्था असे म्हटले जाते. सततच्या बाह्य धक्क्यांमुळे अशा नाजूक परिसंस्थेत तीव्र किंवा कायमचे बिघाड होतात, त्यामध्ये असमतोल निर्माण होतो, व परिणामी स्थानिक मानवी समुदायांना त्यातून मिळणाऱ्या जीवनाधारावर गदा येते.

**कोकणातील परिसंस्थेला नाजूक बनवणारी नैसर्गिक कारणे**

- **चार महिने मुसळधार पाऊस**
- **तीव्र डोंगर उतारामुळे सतत धूप**
- **काही ठिकाणी भूकंपाचे सतत धक्के**
- **अति–विशिष्ट नैसर्गिक घटक व प्रक्रिया. त्यामुळे त्या लुप्त होण्याचा धोका.**

सारांशाने सांगायचे तर, परस्पर जैवसंबंध असणारी संस्था म्हणून काम करणाऱ्या निसर्गाला कोणत्याही (नैसर्गिक किंवा मानव निर्मित) कारणाने जर धक्के बसले तर त्या परिसंस्थेत बिघाड होण्याची शक्यता निर्माण होते. त्यात ही परिसंस्था जर नाजूक असेल तर थोड्याश्या धक्क्यानेही तीव्र व कायमचे बिघाड निर्माण होतात व त्यातून नैसर्गिक अरिष्ट उभे राहते.




**अतिवृष्टीच्या काळात जो मोठा पाऊस झाला त्यामुळे डोंगरावर पडणारा पावसाचा आणि माती-मुरुमात वेगाने मुरणाऱ्या पाण्याचा भार असा एकूण भार खूपच वाढला. मुरुम-मातीचा भाग या अतिरिक्त भाराने पूर्ण वाहून गेला.**

या नैसर्गिक अरिष्टामुळे मानवाला मिळणाऱ्या जीवनाधारांवर गदा येते. एवढेच नव्हे तर त्या अरिष्टाचा फटका मानवी वस्त्यांना बसून जनजीवन उध्वस्त होते. अशाप्रकारे नैसर्गिक अरिष्टाचे रुपांतर सामाजिक व आर्थिक अरिष्टामध्ये होते. तेव्हा, निसर्गातील घडामोडींकडे पाहताना प्रत्येक घटक स्वतंत्र मानणाऱ्या तुटक दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही. त्याऐवजी, त्या घटकांमध्ये असणारे जैव परस्परसंबंध लक्षात घेणाऱ्या व्यापक दृष्टिकोनातून निसर्गाकडे पाहणे गरजेचे आहे. ह्यालाच 'परिसंस्थात्मक दृष्टिकोन' असे म्हटले जाते.

जुलैमधील अतिवृष्टीमुळे कोकणात नेमके काय घडले हे आपण 'परिसंस्थात्मक दृष्टिकोना'तून पाहायला हवे. कोकणातील नैसर्गिक परिसंस्था मुळातच नाजूक आहे. रेल्वे, रस्ते, खाणी, फळबागा यासारखी विकास कामे करताना मानवी समाजाने ह्या नाजूक परिसंस्थेत अनेक व मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप केले. त्यातून ह्या परिसंस्थेला धक्के बसत राहिले. त्यातून परिसंस्थेत अनेक बिघाड निर्माण झाले. सुदैवाने, बहुतेक ठिकाणी ह्या बिघाडांचे स्वरुप सुप्त व प्रमाण लहान राहिले. त्यांचे परिणाम देखील मर्यादित व स्थानिक स्तरावर राहिले. मात्र आधीच नाजूक असणाऱ्या व मानवी हस्तक्षेपाने आणखी नाजूक बनलेल्या कोकणातील परिसंस्थेला जुलै २००५ च्या अभूतपूर्व अतिवृष्टीने एक जबरदस्त धक्का दिला. नाजूक स्थितीतल्या परिसंस्थेला हा धक्का पचवता आला नाही. त्यामुळे आधीच पोखरलेला इमला कोसळावा तसे घडले. अशाप्रकारे अतिवृष्टीच्या नैसर्गिक अपघाताचे रुपांतर पूर व दरडकोसळीच्या नैसर्गिक अरिष्टात झाले. ह्या पूर व दरडकोसळीचा स्थानिक मानवी

**आकृती क्र.३ : कोकणातील अरिष्टाची कारणमीमांसा**




जीवनाला मोठा धक्का बसला. तसेच त्यातून मानवाला मिळणारे जीवनाधार तात्पुरते किंवा कायमचे नष्ट झाले व त्या नैसर्गिक अरिष्टाचे रूपांतर आर्थिक सामाजिक अरिष्टात झाले. (अर्थात कोकणात व जगात इतर ठिकाणी होणारी अतिवृष्टी व वादळे ही पूर्णतः नैसर्गिक अपघात आहेत की त्यामागेही निसर्गातील मानवी हस्तक्षेपाचा वाटा आहे ह्याबाबत शास्त्रज्ञांमध्ये वाद आहेत. मात्र त्याची चर्चा येथे केलेली नाही.)

या नैसर्गिक अरिष्टाच्या मुळाशी असणाऱ्या कारणाचीच मीमांसा अहवालाच्या ह्या प्रकरणात केली आहे. (आकृती ३ पाहावी)

## २. अरिष्टाची कारणमीमांसा: डोंगरी परिसंस्थेतील बिघाड

जुलैमधील अतिवृष्टीच्या जोरदार धक्क्यामुळे कोकणातील परिसंस्थेमधे जे बिघाड झाले व त्यातून जे नैसर्गिक अरिष्ट उद्‌भवले ते समजून घेण्यासाठी थोडे आणखी खोलात जावे लागेल. स्थानिक परिसंस्थेच्या अंतर्गत अनेक घटक परिसंस्था असतात. कोकणातील स्थानिक परिसंस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या दोन मुख्य घटक परिसंस्था म्हणजे डोंगर उताारावरची परिसंस्था व ओढे–नद्या–खाड्यांची परिसंस्था. जुलैमधील अतिवृष्टीचा मोठा परिणाम ह्या दोन (घटक) परिसंस्थांवर झालेला दिसतो. अतिवृष्टीमुळे ह्या दोन परिसंस्थांमध्ये कोणते बदल झाले, त्यामागे नेमकी कोणती मानवी व नैसर्गिक कारणे होती व त्याबाबत काय उपाययोजना करता येतील ह्याची चर्चा ह्या भागात केली आहे.

कोकण हा उंच डोंगर–रांगांनी व्यापलेला प्रदेश आहे. त्यामुळे डोंगरी परिसंस्था ही कोकणातील अनेक जीवनाधार सेवांचे अतिशय महत्त्वाचे उगम स्थान आहे. ढग अडवून पाऊस पाडणे, पावसाचे पाणी डोंगरावरील जंगलात साठवून त्याचा वर्षभर पुरवठा करणे अशा अनेक जीवनाधार सेवांचा पुरवठा डोंगरी परिसंस्थेकडून होत असतो. या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे या परिसंस्थेस मोठा धक्का बसून त्यात गंभीर स्वरूपाचे बिघाड निर्माण झाले.



डोंगरावर आधारित जीवनाधार सेवांना आणि त्यावर अवलंबून सामाजिक–आर्थिक रचनेला त्याची मोठी किंमत मोजावी लागणार आहे.

### २.१ डोंगरी परिसंस्थेतील बिघाड: दृश्य रूपे


**अ) दरड कोसळणे:** अतिवृष्टीच्या काळात दरड कोसळण्याचे प्रकार कोकणामध्ये ठिकठिकाणी झाले. दरड कोसळण्यामध्ये मुख्यतः दोन प्रकार दिसतात. एक म्हणजे, रस्ते–रेल्वेमार्गासाठी डोंगर कापल्याने उघडे पडलेले दगड–धोंडे अनेक ठिकाणी खाली कोसळले (Rock Fall). दुसरा प्रकार म्हणजे जमीन घसरणे व वाहून जाणे (Land Slide). डोंगर उतारावरील माती–मुरुमाच्या ठिसूळ भागात पाणी वेगाने मुरुन तेथील भार क्षमतेपेक्षा जास्त वाढला. त्यामुळे पाण्याने भरलेले माती–मुरुम–दगड असे सगळे एखाद्या प्रवाहासारखे उतारावरून घरंगळून लांबवर कोसळल्याचे दिसतात.

**ब) जमिनीला भेगा पडणे** (Cracks & Cavities): काही ठिकाणी पूर्ण जमीन घसरण्याऐवजी फक्त भेगा पडल्या आहेत. भेगांची लांबी काही ठिकाणी २–३ कि.मी. असल्याची स्थानिकांची निरीक्षणे आहेत. भेगांची खोली १ ते ६ फुटांपर्यंत दिसते.

**क) सर्वात वरच्या थरातील मातीची धूप** (Top Soil Erosion): जवळ–जवळ सर्वच

**कोकणातील परिसंस्थेत घडणारा अविचारी मानवी हस्तक्षेप**

- **रासायनिक कारखाने**
- **रस्ते–रेल्वे बांधकाम**
- **पूररेषेत व पात्रात बांधकामे**
- **खाडीत व डोंगरावर जंगलतोड**
- **झाडेझुडपे व गवताळ प्रदेशात दरवर्षी वणवे**



**काही ठिकाणी पूर्ण जमीन घसरण्याऐवजी फक्त भेगा पडल्या आहेत. भेगांची लांबी काही ठिकाणी २-३ कि.मी. असल्याची स्थानिकांची निरीक्षणे आहेत.**

डोंगरांमधून वरच्या थरातील सुपीक माती वाहून गेल्याचे दिसते. झाडा-झुडपांचे आच्छादन कमी होऊन जमीन उघडी पडलेल्या भागातून हे प्रमाण जास्त आहे.

वर नमूद केलेल्या प्रकारांमध्ये काही ठिकाणी डोंगर उतार कोसळून नंतर ते स्थिरावलेले दिसतात तर काही ठिकाणी ते पूर्ण कोसळले नसल्यामुळे अजूनही अस्थिर अवस्थेत आहेत असे दिसते. अस्थिर अवस्थेतील डोंगर उतारांना भविष्यात कोसळण्याचा मोठा धोका असू शकतो. कोसळण्याची शक्यता वाढलेल्या अशा उतारांकडे (Active Slides) विशेष लक्ष देण्याची गरज आहे. आजही अस्थिर असलेल्या उतारांच्या जवळील लोक सतत असुरक्षिततेच्या छायेखाली वावरत आहेत. एकंदरीने, या बिघाडांचे अनेक दूरगामी परिणाम होतील असे दिसते. हे परिणाम बघितले तर लक्षात येते की कोकणात सामाजिक-आर्थिक अरिष्ट निर्माण होण्यात या बिघाडांचा मोठाच वाटा आहे.

### २.२ डोंगरी परिसंस्थेतील बिघाडांचे परिणाम

१) डोंगर-उतारांची झालेली धूप कायमस्वरूपी आहे, त्यामुळे डोंगरावरील धुपून गेलेल्या भागात तेथील मूळची वनस्पती संपदा पुन्हा उभी राहणे अतिशय कठीण आहे. त्याचबरोबर, धुपून गेलेल्या जागची जमीन उघडी पडल्याने पुढील काळातही या जमिनीची अधिक तीव्रतेने धूप होण्याची शक्यता संभवते.

२) या वर्षी धुपून गेलेली माती-मुरुम तसेच भविष्यात धुपून जाणारी माती कालांतराने जवळच्या ओढ्या-नद्यांमध्ये साठून राहण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

३) डोंगर उतार कोसळल्यामुळे तेथील पाण्याचे झरे आणि ओढ्यांचे प्रवाह नेहमीपेक्षा लवकर आटण्याची शक्यता आहे.

४) जेथे मोठ्या दरडी कोसळल्या आहेत तेथे मोठे जुने वृक्ष व झुडुपांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसते. यामुळे मोठ्या जुन्या झाडा-झुडुपांद्वारे होणाऱ्या वनस्पतींच्या प्रसाराला खीळ बसण्याची शक्यता आहे.

५) डोंगर उतारांच्या कोसळण्यामुळे मोठ्या प्रमाणावर मानवी आणि पाळीव प्राण्यांची जीवितहानी झाली आहे. त्याचबरोबर घरांची व इतर मालमत्तेची हानी तसेच पायाभूत सुविधांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसते.

या सामाजिक व आर्थिक परिणामांच्या मुळाशी असणाऱ्या नैसर्गिक अरिष्टाला कोणते नैसर्गिक तसेच मानवनिर्मित घटक जबाबदार आहेत याची चिकित्सा केल्याशिवाय त्यावरील उपाययोजनांची दिशाही स्पष्ट होणार नाही.

### २.३ बिघाडांमागील नैसर्गिक घटक

कोकणासारख्या जास्त पावसाच्या प्रदेशात दगडाची झीज (विशेषत: रासायनिक विदारण) वेगाने होते. ही झीज होऊन तयार होणारा मुरुम-मातीचा भाग कोकणात खोलवर असल्याचे आढळते. हा खोल मुरुम-मातीचा भाग थोड्याश्या आघाताने सुद्धा सहज निसटून वाहून जाणारा असतो. कोकणातील तीव्र डोंगर उतार व मुसळधार

पावसामुळे हा भाग निसटून वाहून जाण्याचे प्रमाण जास्त असते. अतिवृष्टीच्या काळात तीन ते पाच दिवसात जो मोठा पाऊस झाला त्यामुळे डोंगरावर पडणारा पावसाचा भार आणि माती–मुरुमात वेगाने मुरणाऱ्या पाण्याचा भार असा एकूण भार खूपच जास्त वाढला. मुरुम–मातीचा भाग या अतिरिक्त भाराने पूर्ण वाहून गेला. याचबरोबर, कोकणातील काही भागांमध्ये सौम्य भूकंपाचे धक्के सतत बसतात. त्यामुळे डोंगर उतार अस्थिर होण्याची शक्यता आणखीनच वाढते.

कोकणातील या नाजूक भौगोलिक परिस्थितीमुळे अतिवृष्टीच्या अपघाताची तीव्रता अनेक पटींनी वाढली असे दिसते. मात्र, या मुळातील नैसर्गिक कारणांबरोबरच मानवी हस्तक्षेपाची अनेक उदाहरणे या अभ्यासादरम्यान समोर आली.

### २.४ बिघाडांमागील मानवनिर्मित घटक

डोंगरउतारांच्या परिसंस्थेतील बिघाडांसाठी मानवी हस्तक्षेप पूर्णपणे कारणीभूत नसले तरी या नैसर्गिक अपघाताची तीव्रता वाढविण्यात त्यांचा मोठाच वाटा होता. असे मानवी हस्तक्षेप आणि त्यामुळे झालेले परिणाम मुख्यतः तीन प्रकारात विभागता येतात:

### २.४.१ व्यापक प्रमाणावरील जंगल तोडीमुळे झालेले परिणाम


कोकणात काही ठिकाणी सदाहरित तर काही ठिकाणी दमट पानगळीचे जंगल मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होते. परंतु, कोळसाभट्टीसाठी, इमारती लाकडासाठी अशा अनेक फायद्यांसाठी हे मूळ जंगल तोडले गेले आणि आजही तोडले जात आहे. नाचणी, वरईसारख्या शेतीसाठी, भातशेतीतील राबासाठी, सरपणासाठी तसेच फळबागांसाठीसुद्धा जंगलाची तोड चालूच असते. याचबरोबर कोकणात दरवर्षी लागणारे आगीचे वणवे व आता घाटावरुन देखील येणाऱ्या बकऱ्यांच्या चराई मुळे, मूळ जंगल पुन्हा उभे रहात नाही. या जंगलतोडीचे अनेकविध परिणाम झालेले दिसतात. उदाहरणार्थ,

**अ)** नैसर्गिकपणे वाढणारी जंगले मुळांचे घट्ट जाळे मुरुम व मूळ खडकात पसरून ठिसूळ जमिनीला धरून ठेवण्याचे जे काम करतात, ते जंगलतोडीमुळे होईनासे झाले. यामुळे डोंगर उतार अधिक ठिसूळ बनण्याची शक्यता वाढते.

**ब)** जंगलतोडीमुळे जमिनीवरील वृक्षांचे आच्छादन नाहीसे होऊन जमीन उघडी पडली. झाडाझुडुपांचा मध्ये अडथळा नसल्यामुळे पाऊस पडल्यावर काही तासातच पाणी वेगाने जमिनीत खोलवर जाऊन त्याचा जास्त दाब डोंगरउतारावर पडला. या दाबामुळे डोंगर उतारावरील ठिसूळ भाग कोसळण्याची प्रक्रिया सुरू होते.

**क)** झुडुपे आणि गवतांचासुद्धा ऱ्हास झाल्यामुळे वरच्या थरातील सुपीक माती सहज वाहून जाणे शक्य होते.


कोकणातील २००५ च्या अतिवृष्टीमध्ये झाड–झाडोरा असलेल्या जमिनीसुद्धा दरडीच्या स्वरूपात कोसळल्याचे काही ठिकाणी दिसते. यामुळे झाडांचा दरडी कोसळण्यावर नियंत्रण आणण्यासाठी काही उपयोग आहे का, असा संभ्रम अनेक लोकांमध्ये निर्माण झाल्याचे दिसते. याबाबत कुठलेही सरसकट विधान करणे चुकीचे ठरेल. प्रत्येक ठिकाणच्या झाड–झाडोऱ्याचे प्रमाण, रचना व दरड कोसळण्याची इतर कारणे यांचा सखोल विचार करुनच काही निष्कर्ष काढता येतील. 'मातीला धरून ठेवण्याचे काम झाडे झुडुपे कित्येक वर्षापासून करत आली आहेत, हे विसरून चालणार नाही', हे स्थानिक लोकांचे म्हणणे या संदर्भात रास्त वाटते.



### २.४.२ रस्ते–रेल्वेमार्ग बांधणीचे परिणाम

कोकणात डोंगराळ भागात रस्ते व रेल्वेचे जाळे पसरलेले दिसते. या विकासकामांमुळे डोंगर–उताराच्या नुकसानाला विविध प्रकारे हातभार लागल्याची उदाहरणे स्थानिक लोकांच्या आणि तज्ज्ञांच्या बोलण्यातून पुढे आली.

अ) कोकणात रस्ते व रेल्वेमार्गासाठी मोठ्या प्रमाणात डोंगर कापले गेले. त्यामुळे डोंगर उतार अस्थिर होऊन ते कोसळण्याचा धोका वाढल्याचे दिसते. याचबरोबर, कापून काढलेल्या डोंगराची



## कोकणातील खाजगी जंगलतोड

**रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात नाते या गावात कोसळलेल्या मोठ्या दरडीला जंगलतोड कारणीभूत आहे असे ग्रामस्थांचे ठाम मत आहे. जंगलतोडीचे रुपांतर दरड–कोसळण्यात झाले की नाही हा वादाचा मुद्दा असला तरी आजही चालू असलेल्या जंगलतोडीचे कोकणातील नाजूक डोंगर परिसंस्थेवर व पर्यायाने जमिनीच्या उत्पादन क्षमतेवर नक्कीच विपरीत परिणाम होत आहेत. अभ्यासादरम्यान खाजगी जंगलतोडीविषयी पुढील त्रुटी आढळल्या: मालक व जंगलतोडीचा ठेकेदार यामध्ये जंगलतोडीच्या व्यवहाराविषयी अपुऱ्या माहितीची देवाण–घेवाण होणे, मालकाबरोबर ठरविल्यापेक्षा जास्त जंगलतोड होणे, परवानगी न घेता किंवा वनखात्याकडून मिळालेल्या परवानगीपेक्षा जास्त जंगलतोड व लाकूड वाहतूक करणे, झाडांच्या वयोमानानुसारच झाडे तोडण्याची अट न पाळणे, आणि तोडलेल्या झाडांच्या संख्येइतक्याच झाडांची लागवड करण्याची अट न पाळणे.**

माती–मुरूम–दगड अनेक वेळा उताराने ढकलून दिल्याने उतारावरचा दाब वाढतो. अशा ठिकाणी जमीन धरून ठेवणाऱ्या झाडा झुडुपांचाही नाश होतो. काही ठिकाणी नको असलेले दगड–डबर–खडी जवळच ढीग करून ठेवले गेले. अतिवृष्टीमुळे हे ढीग ढासळून आजूबाजूच्या शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसते.

ब) डोंगर उतारावर बांधकाम करताना जमीन सपाट केली गेली. त्यामुळे पूर्वी उतारावरून वाहून जाणारे पाणी सपाटीला संथ होऊन जमिनीत जास्त प्रमाणात मुरते. यामुळे उतार अस्थिर होण्याची शक्यता निर्माण होते.

क) धावत्या रेल्वेमुळे तयार होणाऱ्या कंपनांमुळे सुद्धा डोंगराला व तेथील जमिनीला धक्के बसतात.

### २.४.३ अनिर्बंध खाणकामाचे परिणाम

कोकणात डोंगराळ भाग असल्यामुळे ठिकठिकाणी दगड–खडी, वीटभट्टीसाठी माती, बॉक्साईट, व इतर खनिजांसाठी खाणकाम चालते. कोकणामध्ये रस्ते आणि रेल्वेच्या जाळ्यासाठी आवश्यक कच्च्या मालासाठी ठिकठिकाणी खाणकाम केले गेले. खाणींमध्ये सुरुंग, ड्रीलच्या वापरामुळे कंपने तयार होऊन डोंगरांना भेगा पडतात. त्यामुळे डोंगराला धक्के बसतात. परिणामी आधीच नाजूक असणारी डोंगराची व्यवस्था आणखी कमकुवत बनते. खाणीच्या ठिकाणापर्यंत वाहतुकीसाठी रस्ते करताना डोंगर कापणे व झाडा–झुडुपांचा नाश यामुळे डोंगर उतार अस्थिर होतात. यामुळे ते कोसळण्याचा धोका वाढतो. या खेरीज धरणे, बंधारे, कारखाने डोंगरांवर घरे–बंगले–हॉटेल, अशा विविध प्रकारची बांधकामे डोंगरावर होत


आहेत. या सर्वांचा कुठे ना कुठे डोंगर उताराला धक्के बसण्यात हातभार लागल्याची उदाहरणे स्थानिकांच्या बोलण्यात आली. थोडक्यात, कोकणातील नाजूक परिसंस्थेतील मानवी हस्तक्षेपामुळे डोंगरी परिसंस्थेचे झालेले तीव्र नुकसान भरुन येण्यास दीर्घकाळ लागेल असे दिसते. त्यामुळे सामाजिक–आर्थिक अरिष्टावरील मूलगामी उपाययोजनांचा विचार करताना कोकणातील नाजूक परिसंस्थेला जपण्यासाठी अनिर्बंध व विध्वंसक अशा मानवी हस्तक्षेपाला आळा कसा घालायचा याचा विचार करणे अनिवार्य आहे.

### ३. अरिष्टाची कारणमीमांसा: ओढे–नद्या–खाड्यांच्या परिसंस्थेतील बिघाड

ओढे–नद्या–खाड्या हे कोकणातील नाजूक परिसंस्थेतील महत्त्वाचे घटक. काठाच्या जमिनीत पाणी मुरवून जमिनीवरील व जमिनीखालील पाण्याची पातळी टिकविणे, जलचर प्राणी व वनस्पतींमार्फत पाणी शुद्ध करणे, जंगलात कुजणाऱ्या पालापाचोळ्याचा सकस गाळ जलचर प्राणी (जसे मासे), वनस्पती व काही ठिकाणी शेतांना पुरवणे अशा अनेक जीवनाधार सेवांचा पुरवठा या परिसंस्थेमार्फत होत असतो. अरुंद पात्र असणाऱ्या कोकणातील नद्या आणि ओढे उन्हाळ्यात अतिशय छोटे व सौम्य वाटतात तर पावसाळ्यात त्यांचे रौद्र रूप समोर येते. तीन ते चार महिन्यातील हंगामी पण मोठ्या प्रमाणात पडणाऱ्या पावसात मोठमोठे दगड–धोंडे सुद्धा वाहून नेण्याची क्षमता डोंगरातील या छोट्या वाटणाऱ्या ओढ्यांमध्ये येते, तर सपाटीच्या अरुंद नदी पात्रांचे पाणी फुगून दरवर्षीच छोट्या–मोठ्या प्रमाणात पूरपरिस्थिती निर्माण होते. अशा नाजूक परिस्थितीत कुठलाही बदल घडल्यास त्याचा तीव्र परिणाम कसा होतो हे यंदाच्या अतिवृष्टीतून दिसते. यंदाच्या अतिवृष्टीमुळे ओढे–नद्या–खाड्यांमधून मिळणाऱ्या जीवनाधार सेवांच्या सातत्याला आणि त्यावर अवलंबून असलेल्या असंख्य लोकांच्या उपजीविकेला मोठाच धक्का बसलेला आहे. या नुकसानाचे स्वरूप, परिणाम व कारणे समजून घेतल्याशिवाय त्यावरील उपाययोजनांचा विचार करता येणार नाही.

### ३.१ नद्या–ओढे व खाड्यांच्या परिसंस्थेतील बिघाड: दृश्य रुपे व परिणाम

कोकणातील नद्या ओढे व खाड्यांच्या परिसंस्थेत विविध प्रकारे बिघाड झालेले दिसतात. जसे की,
अ) अनेक ओढ्या–नद्या–खाड्यांना प्रचंड पूर आला. या पुराचे पाणी नेहेमीच्या पूररेषेच्याही वर गेल्याचा अनेक ठिकाणी स्थानिकांना अनुभव आला.



**ओढ्या–नद्यांचे काठच अस्थिर झाल्यामुळे यापुढेही धूप वाढतच जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.**

ब) डोंगर–उतारांवरून वेगाने वाहणाऱ्या पाण्यामुळे काठालगतच्या जमिनीची तसेच जमिनीलगतच्या सुपीक मातीच्या थराची प्रचंड धूप झाली. काही ठिकाणी तर काठच संपूर्ण वाहून गेले तर काही ठिकाणी 'धूप–प्रतिबंधक भिंती' कोसळल्या.

नद्या–ओढे–खाड्यांच्या या बिघाडांचे देखील अनेक दूरगामी परिणाम होतील असे दिसते. हे परिणाम बघितले तर लक्षात येते की कोकणात सामाजिक–आर्थिक अरिष्ट निर्माण होण्यात या बिघाडांचा मोठाच वाटा आहे.



## कोकणात कृत्रिम टेकड्या

परचुरी या गावाजवळ (ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी) कोकण रेल्वे कॉर्पोरेशनने बोगदा खणून रेल्वेमार्ग बांधला. काम पूर्ण झाल्यावर उरलेला दगड, खडी, डबर असा अनावश्यक माल तेथेच ढीग करून सोडून दिला. उंच कृत्रिम टेकडीप्रमाणे दिसणाऱ्या या ढिगाऱ्यातून दगड, खडी, व डबर खाली घसरून शेतात येऊ नये म्हणून ढिगाऱ्याच्या बाजूने तसेच शेजारच्या ओढ्याच्या बाजूने सिमेंटविटांची (२.५ फूट उंच) भिंत बांधून दिली. बोगदा खणून रेल्वेमार्ग करण्याच्या अभियांत्रिकी कर्तबगारीतून तयार झालेल्या समस्येवर पुन्हा अभियांत्रिकी उपायांचाच विचार केला गेला. मात्र हा उपाय अयशस्वी ठरला. दरवर्षी थोडी थोडी खडी डबर खाली शेतामध्ये घसरू लागले. याबाबत केलेल्या तक्रारीला दाद न मिळाल्याने काही शेतकऱ्यांनी आपली भातशेती टिकावी म्हणून चक्क कर्ज काढून आपल्या शेताच्या बाजूने सिमेंटची भिंत बांधली. यंदाच्या अतिवृष्टीमध्ये पावसाच्या माऱ्याने ढिगाऱ्याचा बराच मोठा भाग (दरडीप्रमाणे) ढासळला. ढिगाऱ्यातील खडी शेतात तर घुसलीच पण शेजारचा ओढादेखील डबरखडीने संपूर्ण बुजून गेला. या नवीन समस्येमुळे सिमेंटची बांधलेली भिंत फोडून पाण्याच्या लोंढ्यासकट सगळे दगडगोटे व खडीडबर शेतात वाहून आले. यामुळे यंदा शेताचे नुकसान तर झालेच पण आता ओढा पूर्ण बुजल्यामुळे दरवर्षी ओढ्याला पूर येऊन आणखी दगडमाती शेतात घुसणार, ही नवीनच समस्या शेतकऱ्यांना सतावणार आहे. ग्रामस्थांनी व स्थानिक पुढाऱ्यांनी जिल्हाधिकारी, रेल्वे प्रशासन व तहसिलदार, संगमेश्वर यांच्याकडे नुकसानभरपाईसाठी निवेदन दिलेले आहे. मात्र तज्ज्ञांच्या मते कायमस्वरूपी उपाय म्हणून एकतर रेल्वेप्रशासनाने कोकणात ठिकठिकाणी निर्माण केलेल्या अशा छोट्यामोठ्या कृत्रिम टेकडया त्वरित हटवाव्यात किंवा यावर अभियांत्रिकी उपाय न करता वनस्पतींचा वापर करून नैसर्गिक/जैविक उपाय राबवावेत.

### ३.२ नद्या–ओढे व खाड्यांच्या परिसंस्थेतील बिघाडांचे परिणाम

१) प्रचंड धूप झाल्यामुळे नद्यांच्या पात्रातही प्रचंड गाळ साठला. काही ठिकाणी तर पात्र गाळाने पूर्णपणे तुंबल्यामुळे ओढे नाहीसे झाले. ओढे पूर्ण बुजल्याने काही ठिकाणी पाण्याचे नवीन प्रवाह तयार झाले.

गाळ साठल्यामुळे पाणी वाहून नेण्याची नद्यांची क्षमता यापुढे आणखीनच कमी होण्याचा म्हणजेच असाच पाऊस पुन्हा झाल्यास, अपरिहार्यपणे पूर येण्याचा धोका निर्माण झाला आहे.

२) ओढे–नदीकाठच्या जमिनींवर पुराचे पाणी पसरल्याने प्रचंड गाळ या काठाच्या जवळ असलेल्या जमिनीत पसरला आहे. हा गाळ काही ठिकाणी चांगला कसदार तर काही ठिकाणी निकस भरड असा आहे. गाळाबरोबर गावोगावी प्लास्टीक, कापडाच्या चिंध्या असा कचरासुद्धा काठाला दिसतो.

३) नद्यांचे काठ वाहून गेल्यामुळे नद्यांची पात्रे रुंदावली. ओढ्या–नद्यांचे काठच अस्थिर झाल्यामुळे यापुढेही धूप वाढतच जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

४) नद्यांची पात्रे आणि ओढ्यांचे मार्ग बदलल्यामुळे त्यांच्या परिसरातील जैववैविध्य जोपासणाऱ्या संवेदनशील भूभागालाही मोठाच धक्का पोचलेला आहे. त्यामुळे आधीच कमी होत चाललेली वनस्पती व प्राण्यांची जैवविविधता आणखीनच कमी होण्याचा धोका आहे. यामध्ये पाणवठ्यातील माशांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे आढळले. विशेषतः माशांची पिल्ले व अंडी वाहून गेल्यामुळे किंवा पूर आल्यावर काठावरच राहिल्यामुळे नुकसान झाले. याचा भविष्यात माशांच्या प्रजननावर व संख्येवर मोठा परिणाम होऊ शकतो. साप–सरडे यासारख्या सरपटणाऱ्या प्राण्यांची जीवित हानी झाल्याचे ठिकठिकाणी स्थानिकांकडून सांगण्यात आले. ओढे–नदी काठच्या विशिष्ट प्रकारच्या बहुउपयोगी वनस्पतींचे नुकसान झाले.

५) नैसर्गिक व्यवस्थांप्रमाणेच मानवनिर्मित सुविधांचेही नुकसान झालेले दिसते. खाडीच्या पट्ट्यात खारबंधाऱ्यावरुन पाणी गेल्यामुळे तर काही ठिकाणी उघाड्या तुटून वाहून गेल्यामुळे खाऱ्या पाण्याचे अतिक्रमण वाढण्याची शक्यता आहे. बंधाऱ्यांची झीज, खांड्या (भोके) पडण्याचे प्रकारही ठिकठिकाणी दिसतात. पाटबंधारे खात्याच्या तसेच पारंपरिक पद्धतीने लोकांनी केलेल्या छोट्या कालव्यांचेही नुकसान झालेले आढळते. रेल्वे व रस्त्यासारख्या पायाभूत सुविधांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

अतिवृष्टीचे ओढे–नद्या, खाड्यांवर झालेले हे परिणाम बघितल्यावर हे स्पष्ट दिसते की ओढे–नद्या–खाड्यांची नैसर्गिक व्यवस्था कोलमडली, परिणामी अतिवृष्टीच्या नैसर्गिक अपघाताचे रूपांतर अरिष्टात झाले. असे का झाले याचा शोध घेताना अनेक कारणे तज्ज्ञ आणि स्थानिक जनतेकडून पुढे आली. त्यात मानवनिर्मित तसेच नैसर्गिक अशा दोन्ही प्रकारच्या कारणांचा समावेश होता.

### ३.३ बिघाडांमागील नैसर्गिक कारणे

१) कोकणात खाड्यांनी व्यापलेला प्रदेश बराच मोठा आहे. त्यामुळे नेमके भरतीच्या वेळी जास्त पावसाचे पाणी नदीत आले तर त्याचा विसर्ग न होता ते पुराच्या रूपात पसरते. त्याचबरोबर, वर्षानुवर्षे होणारी मातीची धूप यामुळे कोकणातील नद्या, खाड्या गाळाने भरून त्यांची पाणी व गाळ वाहून नेण्याची क्षमता मुळातच कमी झाली आहे.

२) डोंगराळ भागामुळे कोकणातील ओढे–नद्यांची पात्रे निमुळती व तीव्र उताराची आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी वेगात खाली उतरते व काठांची प्रचंड झीज होते. सपाटीचे क्षेत्र मुळातच कमी, त्यामुळे पाणी मिळेल त्या सपाटीच्या भागात पुराच्या रूपात पसरते.

३) तज्ज्ञांच्या मते कोकणात काही किनाऱ्यांवर समुद्राची पातळी वाढल्याच्या सूचक खुणा सापडत आहेत. समुद्राची पातळी वाढली तर भरतीची पातळी वाढत जाईल व पूर परिस्थितीत वाढ होईल अशी शक्यता आहे.

अतिवृष्टीच्या अपघातामुळे कोकणातील ओढ्या–नद्या–खाड्यांच्या परिसंस्थेत झालेले बदल तीव्र स्वरूपाचे तर आहेत पण काही बदल अपरिवर्तनीय देखील आहेत. उदा. नद्या–ओढ्यांची बदललेली पात्रे, नष्ट झालेले काठ, या पाणवठ्यांकाठचे वैविध्यपूर्ण वनस्पती व प्राणीजीवन, हे पुन्हा पूर्ववत होणे जवळजवळ अशक्य आहे. गाळाने भरलेल्या नद्या–खाड्या पुन्हा वाहात्या करणे अतिशय खर्चिक आणि म्हणून अवघड आहे. म्हणजेच अतिवृष्टीच्या अपघाताचे रूपांतर अरिष्टात होण्यामागे तसेच अरिष्टाची तीव्रता वाढवण्यामागे कोकणातील परिसंस्थेच्या नाजूक जडण घडणीचा वाटा मोठाच आहे.

### ३.४ बिघाडांमागील मानवनिर्मित कारणे

परिसंस्थेची नाजूक जडण–घडण हा नैसर्गिक अरिष्टासाठी जबाबदार असा एकमेव घटक नाही. या नाजूक नैसर्गिक व्यवस्थांवर मानवाचे अनिर्बंध आक्रमण हा तितकाच, किंबहुना त्याहूनही जास्त जबाबदार असा घटक आहे, असे स्थानिकांनी आणि तज्ज्ञांनी दिलेल्या उदाहरणांवरून स्पष्ट होते

**१) संरक्षण करणाऱ्या नैसर्गिक उपायांचा विनाश**

डोंगर उतारांवरील दाट, सदाहरित, पानगळीच्या जंगलांची तोड होऊन डोंगर उतार उघडे बोडके झाले, तीच गत खाडी काठच्या खारफुटीच्या

जंगलांची झाली. सरतेशेवटी नदी–ओढ्यांकाठच्या ओलाव्यात झपाट्याने वाढणारा झाडोराही माणसाच्या कुऱ्हाडीला बळी पडला. कोकणात एकेकाळी असलेल्या अनेक पाणवठे–तळ्यांची सुद्धा नीट निगराणी न राखल्यामुळे दुरावस्था झाली. परिणामी पाणी साठवून ठेवण्यासाठी तसेच धूप आणि पूर रोखण्यासाठी निसर्गानेच निर्माण केलेल्या संरक्षक उपायांवर घाला आला.

**२) आधुनिक विकास कामांमुळे पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे**

नदी पात्रातील पाण्याचे नैसर्गिक प्रवाह, विसर्गाचे व निचऱ्याचे नैसर्गिक मार्ग या नैसर्गिक संरक्षकांबाबतही हेच घडते आहे. कोकणात जागोजाग दिसणारी ठळक उदाहरणे अशी आहेत,

- पूररेषेच्या आत एवढेच नव्हे तर ओढे–नद्यांची पात्रे बुजवून घरे, दुकाने, पेट्रोलपंप यासारखी बांधकामे केली गेली. त्यामुळे विसर्गात अडथळा येतो. प्रत्येक नदीचे पात्र यामुळे खरवडले गेले आहे.

- रस्ते व रेल्वेच्या भरावांमुळे ठिकठिकाणी तयार झालेले कृत्रिम बंधारे, ओढे–नद्यांच्या पात्रातील रस्ते व रेल्वेचे पूल यामुळे पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहांमधे अडथळे निर्माण झाले आहेत. विसर्गाचे मार्गच बुजल्यामुळे साठून राहिलेल्या पाण्याने पुराचे उग्र रुप धारण केले.
- नदीच्या पात्रातील वाळूचा बांधकामांसाठी अनिर्बंध उपसा केला गेला. वाळूने पाणी मुरण्याचे प्रमाण वाढते व पाण्याचा वेगही कमी होतो. त्यामुळे पाणी वाहून नेण्याचा नदीचा भार काहीसा कमी होतो.

**३) विकास धोरणांमुळे कोकणातील नद्यांवर येणारा अतिरिक्त ताण**

स्थानिक लोकांच्या मते अतिवृष्टीच्या काळातही पूर्ववाहिनी नद्यांमधील पाणी वीजनिर्मितीसाठी कोकणातील पश्चिमवाहिनी नद्यांमध्ये सोडले गेले. पाटबंधारे खात्याचे अधिकारी हा आरोप साफ नाकारत असले तरी वीजनिर्मितीसाठी वर्षानुवर्षे या अतिरिक्त पाण्याचा ताण कोकणातील नद्या–खाड्या–ओढ्यांना पेलावा लागत आहे याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

अशा तऱ्हेने अतिवृष्टीचे रूपांतर नद्या–खाड्या–ओढ्यांवरील नैसर्गिक अरिष्टात होण्यासाठी नैसर्गिक कारणांपेक्षा ही मानवनिर्मित कारणेच अधिक जबाबदार असल्याचे दिसते.

या सर्व मुद्द्यांचा एकत्रित विचार करताना असे दिसते की, कोकणातील नैसर्गिक अरिष्टाच्या मुळाचा शोध दोन कळीच्या मुद्द्यांपाशी थांबतो – १) मुळातच नाजूक जडण–घडण असलेली नैसर्गिक परिसंस्था आणि २) या नाजूक जडण–घडणीवर आक्रमण करणारे मानवनिर्मित घटक. यातील नैसर्गिक घटक नाहीसे करता येणार नाहीत. पण कोकणातील निसर्गाच्या अंगभूत वैशिष्ट्यांचा विचार करून अरिष्टाच्या प्रतिबंधासाठी पूर्वतयारी निश्चित करता येईल आणि भविष्यातील नैसर्गिक अपघाताची तीव्रता कमी करता येईल. स्थानिक पातळीवरील मानवनिर्मित कारणे अर्थातच अपरिहार्य नाहीत.

त्यामुळे परिसंस्थेच्या संरक्षण व संवर्धनाला प्राधान्य देऊन मानवी हस्तक्षेपावर योग्य ते निर्बंध घालणे आणि त्यासाठीचे प्रतिबंधात्मक उपाय तातडीने अमलात आणणे निश्चितच शक्य आहे. हीच कोकणातील नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक अरिष्टावरील कायमस्वरूपी उपाययोजनांची दिशा आहे, असे दिसते.

उपाययोजनेकडे वळण्यापूर्वी आणखी एक मुद्दा नमूद करायला हवा. या प्रकरणाच्या सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे कोकणातील नैसर्गिक अरिष्टाकडे तुटक दृष्टिकोनातून पाहून त्याचे बाळबोध म्हणावे असे विश्लेषण अनेकदा केले जाते व त्यातूनच वरवर परिणामकारक वाटणाऱ्या सरळसाध्या उपाययोजना सुचवल्या जातात. कोकणातील पूर येण्यामागील व दरड कोसळण्यामागील कारणांची सखोल व सविस्तर समीक्षा केल्यानंतर पूरप्रतिबंधासाठी धरणे बांधण्यासारख्या खर्चिक अभियांत्रिकी उपायांची निरुपयोगिता स्पष्ट होते. याआधीच्या भागात चर्चा केलेल्या बिघाडांना तोंड

देण्यासाठी नुसती धरणे व पूर वा धूपप्रतिबंधक भिंती बांधून उपयोग होणार नाही हे स्पष्ट होते. त्या बिघाडांमागच्या विविध नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांवर मूलगामी उपाययोजना करणे हाच आरिष्ट प्रतिबंधाचा खात्रीचा उपाय आहे. अरिष्ट प्रतिबंधासाठी धरणे व पूर–धूप प्रतिबंधक भिंती बांधणे म्हणजे 'आग रामेश्वरी व बंब सोमेश्वरी' अशी अवस्था आहे.

**४. कोकणातील अरिष्टाचे मूळ: सारांशाने या सर्व विवेचनातून असे दिसते की,**

● कोकणातील परिसंस्थांची जडणघडण मुळातच नाजूक असल्यामुळे अतिवृष्टीच्या अपघाताची तीव्रता वाढली आणि त्याची परिणती स्थानिक परिसंस्था कोलमडण्यात झाली. मुळातच या परिसंस्थांची पुन्हा पूर्ववत होण्याची क्षमता मर्यादित असल्यामुळे अतिवृष्टीमुळे झालेली त्यांची हानी भरुन येणे बहुतेक ठिकाणी अतिशय अवघड तर काही ठिकाणी अशक्य आहे.

● 'मानवाचे निसर्गावर बेबंद आक्रमण' हा कोकणातील नैसर्गिक अरिष्टाला तितकाच, किंबहुना अधिक जबाबदार घटक आहे. मुळातच नाजूक असलेली कोकणची परिसंस्था या मानवी आक्रमणामुळे आधीच खिळखिळी झाली होती. त्यामुळेच नैसर्गिक अपघाताचा फटका बसताच ती पार कोलमडली व त्यातून मोठे नैसर्गिक अरिष्ट उभे राहिले.

● नैसर्गिक अरिष्टापाशी ही साखळी अर्थातच संपत नाही. नैसर्गिक अरिष्टामुळे कोकणातील बहुसंख्य जनतेच्या जगण्याचे नैसर्गिक, आर्थिक आणि सामाजिक आधार उखडले गेले आहेत. त्यामुळे नैसर्गिक अरिष्टाचे सामाजिक–आर्थिक अरिष्टात रूपांतर झाले आहे.

● या सामाजिक–आर्थिक अरिष्टाची सर्वाधिक झळ आदिवासी, विधवा/परित्यक्ता स्त्रिया, भूमिहीन दलित या कोकणातील वंचित गटांना बसली आहे. त्यांची जगण्याची साधनेच नैसर्गिक अरिष्टामुळे उद्ध्वस्त झाली आहेत. तातडीने उपाययोजना न झाल्यास हे गट कायमचे देशोधडीला लागतील अशी चिन्हे आहेत. स्थानिक



व जागतिक पातळीवरील नैसर्गिक असमतोलामुळे जगभरातील वंचितांच्या वाट्याला हीच दुर्दशा आलेली आहे, हे दाहक वास्तवही या संदर्भात लक्षात घेणे गरजेचे आहे.

4.नैसर्गिक–सामाजिक–आर्थिक अरिष्टाच्या मुळाशी असलेल्या मानवनिर्मित आणि नैसर्गिक कारणांवर उपाययोजना करणे नितांत गरजेचे आहे . वैश्विक पातळीवरील कारणांवर उपाययोजना करणे एका राज्यातील प्रशासनाच्या आवाक्यात नसले तरी स्थानिक पातळीवरील कारणांचा विचार करुन शाश्वत उपाययोजना आखणे आणि राबवणे निश्चितच शक्य आहे.

● या पार्श्वभूमीवर आपत्ती–निवारण आणि आपत्ती–प्रतिबंधासाठी शाश्वत अशा उपाययोजना आखण्याची आणि राबवण्याची गरज अधिकच तीव्र होते.

**५. नैसर्गिक अरिष्टाचा प्रतिबंध: मागण्या व शिफारशी**

**(अ) कोकणातील अरिष्ट–व्यवस्थापनाचा मूलगामी व एकात्मिक विचार होणे गरजेचे**

१) अतिवृष्टीचे रूपांतर एका अरिष्टात होण्यामागे असणाऱ्या मानवनिर्मित व नैसर्गिक कारणांचा साकल्याने अभ्यास करून त्यावर आधारित कृती

**मानवाचे निसर्गावर बेबंद आक्रमण हा कोकणातील नैसर्गिक अरिष्टाला तितकाच, किंबहुना अधिक जबाबदार घटक आहे.**

कार्यक्रम राबवण्याची गरज आहे. यासाठी शासनाने मुंबईसाठी नेमलेल्या चितळे समितीच्या धर्तीवर कोकणासाठी व्यापक कार्यकक्ष असणारी, बहुशाखीय व लोकसहभागी पद्धतीने अभ्यास करणारी स्वतंत्र समिती नेमावी.



२) कोकणातील विकास कामांसाठी नाजूक स्थितीत असणाऱ्या स्थानिक नैसर्गिक परिसंस्थेला धोका पोहोचणार नाही असे ठोस व नेमके निकष तातडीने तयार करण्याची तसेच ते अमलात आणण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभी करण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी.

३) कोकणातील नाजूक व धोक्याच्या स्थितीत असलेल्या नैसर्गिक ठिकाणांची यादी तयार व्हावी आणि तेथील नाजूक–धोक्याच्या पातळीनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना आखल्या जाव्यात.

४) अरिष्ट निवारण व प्रतिबंधासाठी विविध अरिष्टांचे अनुमान व धोक्याचा इशारा देण्याची यंत्रणा उभारली जावी. त्यासाठी गावपातळीवर विविध निरीक्षणे करण्याची, त्यानुसार नोंदी ठेवण्याची व अनुमानाची यंत्रणा उभारली जावी.

**या मागण्यांवरील संभाव्य आक्षेप**

१) सर्वसमावेशक व सूक्ष्म स्तरावरच्या अभ्यास व नियोजनासाठी जास्त मनुष्यबळ, वेळ व खर्च होतो. नाजूक किंवा धोक्याची नैसर्गिक ठिकाणे विखुरलेली असल्याने सूक्ष्म पद्धतीने निरीक्षणे करून यादी करणे कठीण होईल. प्रत्येक ठिकाणच्या डोंगर, ओढे–नद्यांपर्यंत पोचून अशा प्रकारचे निरीक्षण व नोंदी करणे सध्याच्या सरकारी यंत्रणेत अशक्य आहे.
२) अरिष्टांच्या अभ्यासावर जास्त वेळ खर्च करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर भर देणे गरजचे आहे.
३) विविध नैसर्गिक प्रक्रियांवर पूर्णपणे नियंत्रण आणणे अशक्य आहे.

**आक्षेपांचा प्रतिवाद**

१) खर्च कमी करण्यासाठी स्थानिक संस्था–संघटना व लोकांचा सहभाग घेणे गरजेचे आहे. स्थानिक सूक्ष्म स्तरावरच्या निरीक्षण व नोंदींसाठी ग्रामस्थ, शाळा, महाविद्यालये, व संस्था–संघटनांचा सहभाग घ्यावा. यासाठी मोठ्या प्रमाणात स्थानिक लोक संघटनांचे जाळे उभारून त्यांची जाणीवजागृती व प्रशिक्षणाचा कार्यक्रम घ्यावा.
२) अरिष्टाचा व्यापक व सारासार विचार करून कृती न आखल्यास अरिष्टाची सतत पुनरावृत्ती होऊ शकते. त्यामुळे कायमस्वरूपी योजना आखायची असल्यास व्यापक अभ्यास व नियोजनासाठी खर्च करणे गरजेचे आहे. अशा अभ्यासातून मिळणारे लाभ अरिष्टामुळे होणाऱ्या नुकसानापेक्षा जास्त असतील. परिसंस्थेच्या व्यापक दृष्टिकोनातून अरिष्टाच्या अभ्यासाचा व त्याआधारे केल्या जाणाऱ्या उपाययोजनांचा मुळातच अभाव आहे. त्यामुळे असा अभ्यास करणे गरजेचे आहे.
३) जागतिक पातळीवर तापमान वाढीविषयी उपाययोजना आखल्या जात आहेत. त्यामुळे नैसर्गिक प्रक्रियांवर नियंत्रण आणता येणार नाही हे चुकीचे आहे. जागतिक पातळीवर आखलेले हे

उपाय स्थानिक लोकांवर लादले जाण्याऐवजी स्थानिक लोकांमधूनच उपाययोजना पुढे आल्या तर त्या स्थानिक परिस्थितीला अनुकूल व शाश्वत असतील.

**(ब) कोकणातील घातक विकास कामांवर निर्बंध**

१) विविध विकास कामांमुळे नुकसान वाढल्याचे स्पष्ट पुरावे जेथे उपलब्ध आहेत तेथे अशा विकास कामांवर त्वरित कारवाई करावी. अशा विकास कामांच्या प्रवक्त्यांना किंवा मालकांना नुकसानास जबाबदार धरून बाधित लोकांना नुकसानभरपाई देणे बंधनकारक करावे. पुढील काळात तेथे अरिष्ट येऊ नये म्हणून त्या–त्या बांधकामात योग्य ते बदल तातडीने करावेत.

२) खाणकामासारख्या अतिशय धोकादायक कामांना नाजूक डोंगर भागांमध्ये निर्बंध घालावेत. वाळू उपश्यावर कडक देखरेख व नियंत्रण ठेवण्याची व्यवस्था तातडीने अंमलात आणावी. जंगलतोडीच्या नियमांचे काटेकोर पालन होण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारावी.

३) नदीपात्रातील व पूररेषेतील बांधकामावर नियंत्रण आणण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन व्हावे आणि शहर विकास आराखड्यात त्यांचा समावेश व्हावा.

**या मागण्यांवरील संभाव्य आक्षेप**

१) विकास कामांवर वेगळे निकष घातल्यास कोकणाच्या विकास कामांवर गदा येईल. त्याचप्रमाणे सध्या अस्तित्वात असलेले निकष किंवा नवीन निकष पाळले जातील याची खात्री नाही.

**आक्षेपांचा प्रतिवाद**

१) विकास कामांवर वेगळे निकष घातल्यास विकासाची प्रक्रिया खुंटण्याऐवजी ही प्रक्रिया जास्त शाश्वत बनेल. विकास कामांवर निकष घालून नाजूक नैसर्गिक परिसंस्थेचे संरक्षण केले नाही तर उलट विकासाच्या प्रक्रियेला मोठा धक्का बसण्याची शक्यता वाढेल.

२) निकष पाळण्याची स्वतंत्र यंत्रणा व उत्तरदायित्व ठरवून दिले जावे. त्याला स्थानिक लोकांच्या देखरेखीची जोड दिली की निकष पालनात यश येईल. यासाठी स्थानिक लोकांची दक्षता समिती नेमणे गरजेचे आहे.

**(क) दीर्घकालीन पुनर्वसन व आपत्ती–प्रतिबंधासाठी जैविक उपाय**

१) अतिवृष्टीचे अतिरिक्त पाणी दुसऱ्या खोऱ्यात वळवून पुरावर नियंत्रण आणणे, पूर नियंत्रणासाठी वेगळे धरण बांधणे, धूप प्रतिबंधासाठी पक्क्या भिंती बांधणे, नदी–खाडीतील गाळ काढण्यासाठी ड्रेजिंग मशीन लावणे, यासारख्या निव्वळ अभियांत्रिकी उपायांचा विचार करणे योग्य नाही. त्याऐवजी परिसंस्थेच्या एकात्मिक दृष्टिकोनातून पुढे येणाऱ्या नैसर्गिक किंवा जैविक उपायांना आवश्यक तेथेच अभियांत्रिकी उपायांची जोड देणे गरजेचे आहे. त्यासाठी नैसर्गिक किंवा जैविक उपाय या शाखेचा विकास होण्याची गरज आहे. हे लक्षात घेऊन, अरिष्टाबाबत जैविक उपायांच्या विकासासाठी वेगळी यंत्रणा उभी करावी. आपत्ती प्रतिबंधासाठी काम करणाऱ्या वेगवेगळ्या खात्यांमध्ये जैविक उपायांच्या विकासासाठी जैव–अभियांत्रिकी विभाग सुरू करावा. अरिष्ट नियंत्रणासाठी विविध विकास कामांमध्ये जैविक उपायांचा समावेश करण्यासाठी अटी घालाव्यात.

नैसर्गिक व्यवस्थेतील प्रत्येक सजीव व अजीव घटकांचे ठराविक कार्य ओळखून त्याचा वापर, संवर्धन व विकास केला तर अरिष्ट प्रतिबंधासाठी, डोंगर उतार, ओढे–नदी–खाडी काठच्या संरक्षणासाठी आवश्यक अशा अनेक नैसर्गिक उपायांचा विकास होऊ शकेल.

२) धोक्यात असलेल्या अस्थिर डोंगर उतारांची (उदा. जिथे भेगा पडल्या आहेत, डोंगर सरकला आहे अशा ठिकाणांची) यादी करावी. अशा डोंगर उतारांवर स्थानिक माती–मुरुमाचा जो प्रकार

**कोकणातील पावसाच्या जोरदार तडाख्याने कापलेले, फोडलेले डोंगर कोकण रेल्वे मार्गावर दरवर्षी कोसळतात. गेली १५ वर्ष रेल्वे प्रशासनाने रेल्वे मार्गावरील सुरक्षेसाठी लोखंडी जाळ्या बसविणे, धोक्याचा इशारा देणारा भोंगा बसविणे, नायलॉन जाळ्या बसविणे अशा प्रकारच्या अनेक अभियांत्रिकी युक्त्या लढविल्या. तरीही यंदाच्या अतिवृष्टीमध्ये रेल्वे मार्गाचे मोठे नुकसान झाले. वनस्पतींच्या मुळांमध्ये जमीन धरून ठेवण्याची निसर्गतःच क्षमता असते हे लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने आता रेल्वे मार्गावर खस व स्टायलो या गवताची लागवड करणार असे नुकतेच जाहीर केले आहे.**

असेल त्यानेच भेगा बुजवाव्यात. स्थानिक प्रकारच्या माती–मुरुमाने भेगा बुजवणे, स्थानिक दगडांनी व वृक्षांनी उताराच्या पायथ्याचे मजबुतीकरण करणे, असे उपाय भूगर्भ व वन्स्पतिशास्त्रज्ञांच्या साहाय्याने राबवावेत.

३) नैसर्गिक अपघातामुळे स्थानिक परिसंस्थेला कमीत–कमी हानी पोचावी म्हणून जैविक उपाय राबवण्याचा कृती कार्यक्रम त्वरित हाती घ्यावा. यामध्ये पुढील उपायांचा विचार करता येईल:

- रस्ते, रेल्वे व इतर भरावांची झीज नियंत्रणात आणण्यासाठी योग्य झुडुपे व गवतांची लागवड करावी.

- जमिनीची धूप नियंत्रणात आणण्यासाठी ओढ्याकाठी ठिकठिकाणी गाळ साठवून ठेवू शकणारे छोटे छोटे बांध उभारावेत.

- ओढे–नद्या–खाड्यांच्या काठाने हरित पट्टा तयार करण्याचा कार्यक्रम घ्यावा. त्यासाठी स्थानिक वनस्पतींची निवड करावी. तसेच स्थानिक भौगोलिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करून नियोजनपूर्वकच हरित–पट्टयांची रचना केली जावी.
- नद्यांचे उगमस्थान असलेला सह्याद्रीचा पश्चिम घाटाचा पट्टा तसेच कोकणातील छोट्या उपनद्यांच्या उगमस्थानाचे पट्टे पाणी, माती, व जैवविविधतेच्या दृष्टीने संरक्षित करावेत. तेथे बांधकाम व जंगलतोडीवर निर्बंध आणावेत.

- फळबाग योजनेसारख्या लोकोपयोगी योजनांमध्ये माती व पाणी संवर्धनाचा घटक जोडावा. त्यामध्ये जैवविविधता आणावी.

- कोकणातील तळयांचे पुनरुज्जीवन करुन पाणी साठे निर्माण करावे. डोंगरावर सुद्धा छोटे–छोटे पाणी साठे तयार करावेत.

**या मागण्यांवरील संभाव्य आक्षेप**

अभियांत्रिकी उपाय हे जास्त खात्रीचे असतात. नैसर्गिक किंवा जैविक उपायांची विश्वासार्हता कमी असते.

**आक्षेपांचा प्रतिवाद**

१) अभियांत्रिकी उपायांसाठी येणारा खर्च हा सर्वच ठिकाणी परवडणारा नाही. अशा ठिकाणी जैविक उपायांचा विकास करणे अपरिहार्य ठरते. उदा. पूरनियंत्रणासाठी धरणे बांधणे हे कोकणातील भौगोलिक परिस्थिती बघता शक्य नाही. भिंत बांधणे किंवा गाळ ड्रेजिंग मशीनने काढणे हे खर्चिक तसेच अल्पायुषी उपाय ठरतात.

२) अभियांत्रिकी उपाय हे जास्त केंद्रित पद्धतीने नियोजन व अंमलबजावणी करण्याचे उपाय आहेत त्यामुळे त्यात लोकसहभाग कमी असतो, किंबहुना नसतोच. या उलट नैसर्गिक उपायांचा योग्य विकास केल्यास, त्याला आवश्यक तेथे अभियांत्रिकी उपायांची जोड दिल्यास ती जास्त व्यवहार्य, शाश्वत व लोकसहभागी पद्धतीने करावयाची योजना होऊ शकते.

**निष्कर्ष**

कोकणातील जनजीवन उद्ध्वस्त करणाऱ्या नैसर्गिक अरिष्टाच्या मुळाशी असणारी दोन महत्त्वाची कारणे जाणून घेतल्यावर त्यावरच्या उपाययोजनेची चर्चा या प्रकरणात आपण केली. ह्या उपाययोजनेमध्ये नेत्रदीपक अशी अभियांत्रिकी आव्हाने नसली तरी ती सोपी अजिबात नाही. त्यातील तांत्रिक गुंतागुंत व त्यात अडकलेले आर्थिक व राजकीय हितसंबंध पाहिल्यावर ती आणखीनच कठीण वाटू लागते. मात्र नेहमी सुचवल्या जाणाऱ्या सरळसोट अभियांत्रिकी उपायांची निरुपयोगिता लक्षात घेतली तर या प्रकरणात सुचविलेल्या व्यापक उपाययोजनेची अपरिहार्यता लक्षात येईल. तेव्हा अशी उपाययोजना करण्यातली चालढकल वा अपयश म्हणजे जुलैमधल्या अरिष्टाला पुन: पुन्हा आमंत्रण देणे ठरेल.



## फळबागयोजना आणि मातीची धूप

''गावाजवळच्या डोंगरावर फळबागेसाठी सपाटीकरण केले, त्यामुळे पावसाळ्यातील छोट्या ओहोळांचा मार्ग बदलला, फळबागेतील जमीन उघडी पडली. यंदाच्या मोठ्या पावसात डोंगरावरून माती जास्त धुपली. आमच्या शेतात सुद्धा थोडी पसरली. फळबागेमुळे माती धुपण्याचे प्रमाण जास्त झालंय.'' असे कासे गावातील (तालुका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी) काही ग्रामस्थ सांगत होते. अभ्यासादरम्यान ठिकठिकाणी फळबागांमुळे होत असलेली जमिनीची धूप हा विषय चर्चेला येत होता. तज्ज्ञांनी देखील याचा उल्लेख केला.

कोकणात रोजगार हमी योजनेअंतर्गत १००% अनुदानावर मोठ्या प्रमाणात आंबा व काजूच्या फळबागा उभ्या राहिल्या. डोंगरांमधून आर्थिक उत्पन्नाचे एक चांगले साधन उभे राहिले. कोकणासाठी वरदान मानल्या जाणाऱ्या या फळबागांमध्ये आता माती संवर्धनाचे व जैवविविधतेचे अंग समाविष्ट करावे अशी मागणी पुढे आली. फळबागेत मातीची धूप होण्यामध्ये पुढील कारणे समोर आली:

- १०% ते ३०% या अपेक्षित उतारापेक्षा जास्त उतारावर फळबागा केल्या तर मातीची धूप वाढते.
- डोंगर उतारावरील मूळचे जंगल व झाड–झाडोरा पूर्ण तोडून साफ करून मगच त्यावर फळबाग केल्याने जमीन उघडी पडून पहिल्याच पावसात मोठ्या प्रमाणात धूप होते. फळबागेसाठी निवडलेली जागा साफ करून काही ठिकाणी उरलेले गवत व पालापाचोळा सुद्धा जाळून टाकण्याची पद्धत आहे.
- फळझाडे मोठी होईपर्यंत जमीन उघडी राहते. त्यावर येणारे गवतसुद्धा वणव्याच्या भीतीने आधीच जाळले जाते. यामुळे पहिली काही वर्षे मातीची धूप मोठ्या प्रमाणात होते.
- झाडे मोठी होऊन पर्णसंभार वाढला तरी फळबागेतील जमिनीला घट्ट धरून ठेवणारी छोटी तणे जाळून बाग स्वच्छ ठेवण्याकडे कल असतो. त्यामुळेही जमिनीची धूप काही अंशी चालू राहते.

फळबागेच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्याचा विचार करून माती व पाणी संवर्धनाच्या उपायांचा समावेश सरकारी अनुदानावर उभ्या राहणाऱ्या तसेच विनाअनुदानित फळबागांमध्ये होणे गरजेचे आहे. थोडक्यात, व्यापक व दूर पल्ल्याचा विचार केल्यास, फळबागा ह्या मिश्र पद्धतीच्या व जैवविविधता वाढविणाऱ्या तसेच मातीचे संवर्धन करणाऱ्या असणे अनिवार्य आहे. अरिष्टाच्या निमित्ताने पुढे आलेल्या फळबाग योजनेतील या सुधारणांचा तातडीने व गांभीर्याने विचार व्हायला हवा.

# व्यापक उपाययोजनांच्या दिशेने

अरिष्टाच्या मुळाचा शोध घेतानाच अरिष्टाचे निवारण तसेच त्याचा प्रतिबंध कसा करायचा याच्या दिशा स्पष्ट होतात. या पार्श्वभूमीवर शासनाच्या आपत्ती–व्यवस्थापन कार्यक्रमाचा आढावा घेताना लक्षात येते की अरिष्टानंतर अपेक्षित असलेली कार्यवाही आणि वास्तव परिस्थिती यात मोठीच फारकत आहे. ही फारकत भरून काढायची असेल तर शासनाच्या केवळ कार्यपध्दतीतच नव्हे, तर दृष्टिकोनातही बदल होणे गरजेचे आहे. या प्रकरणातील भाग दोनमधे याच मुद्द्यांची चर्चा केली आहे, तर भाग एकमध्ये अभ्यासातून पुढे येणारे प्रमुख निष्कर्ष एकत्रितपणे मांडले आहेत. या चर्चेतून अरिष्ट निवारण व प्रतिबंधाबाबतच्या सखोल विचारविनिमयाला गती मिळावी अशी अपेक्षा आहे.

### ■ अभ्यासातून पुढे येणारे मुख्य निष्कर्ष

कोकणातील सत्तेचाळीस वाड्यांमध्ये नैसर्गिक अरिष्टाचा जो अभ्यास केला गेला, त्यामधून या अरिष्टाचे विविध पैलू समोर आले. स्थानिकांच्या दृष्टिकोनातून अरिष्ट समजून घेण्याचा प्रयत्न करताना लोकांचे अरिष्टाबाबतचे अनुभव, अरिष्टाची त्यांनी केलेली कारणमीमांसा, आणि त्यांच्या सरकारकडून अपेक्षा यांचे जे चित्र पुढे आले, ते इतर ठिकाणच्या नैसर्गिक अरिष्टांना प्रतिसाद देण्याचे दृष्टीने महत्त्वाचे ठरेल, असे वाटते.

### अरिष्टाला तोंड देण्याची शासनाची पूर्वतयारी

या प्रकारच्या अरिष्टांना तोंड देण्याची सरकारी यंत्रणेची अजिबात तयारी नव्हती, हे या अभ्यासादरम्यान प्रकर्षाने जाणवले. 'आपत्ती–व्यवस्थापना'साठीच्या कार्यक्षम यंत्रणेविषयी किल्लारीच्या भूकंपानंतर चर्चा सुरू झाली. नैसर्गिक अरिष्टाला तोंड देण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडेही तयार झाले. परंतु, प्रत्यक्षात मात्र नैसर्गिक अरिष्ट आल्यावर काय करायचे याबाबत पुरेशी माहिती, प्रशिक्षण, क्षमता आणि योग्य दृष्टिकोन यांचा पूर्ण अभाव सरकारी यंत्रणेत जाणवला. शासनाच्या वरिष्ठ पातळीवरच्या अधिकाऱ्यांमध्ये देखील पूरग्रस्तांप्रती शासनाची काय जबाबदारी आहे याबाबत स्पष्टता नव्हती. अरिष्टानंतरच्या कार्यवाहीमध्ये शासनाच्या विविध खात्यांमध्ये समन्वयाचा अभाव होता. इतक्या मोठ्या अरिष्टानंतरदेखील सरकारी यंत्रणेच्या नेहमीच्या कार्यपद्धतीत काही बदल दिसत नाही असेच स्थानिकांचे म्हणणे होते. शासनाने पोचवलेल्या तातडीच्या मदतीबाबत पूरग्रस्तांचा अनुभव पाहिला तरी हीच गोष्ट प्रामुख्याने पुढे येते.

### सरकारने पुरवलेल्या तातडीच्या मदतीबाबत (Relief) निष्कर्ष

तातडीच्या मदतीबाबत शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष झाले. विशेषतः दुर्गम भागापर्यन्त ही मदत पोचली नाही. अरिष्टाची व्याप्ती लक्षात घेता जाहीर केलेली तातडीची मदत मुळातच अत्यंत तुटपुंजी होती. या मदतीचे निकषही पुरसे स्पष्ट नव्हते. त्यामुळे कोणाला किती मदत द्यायची याचे निर्णय अनेकदा स्थानिक अधिकाऱ्यांच्या हातात गेले. परिणामी, मदत वाटपाच्या प्रक्रियेतदेखील भ्रष्टाचार शिरून अनेक ठिकाणी पूरग्रस्तांपर्यन्त मदत न पोचणे, अपुरी मदत मिळणे असे प्रकार घडले. पुरामुळे झालेले नुकसान असा निकष ठेवल्याने जेथे पूर आला नाही पण अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले अशा, विशेषतः दुर्गम

भागातील वाडे–पाड्यांमध्ये, मदत पोचली नाही. मदत वाटपाच्या काळात राजकीय नेतृत्वाचे अपयशही ढळढळीतपणे पुढे आले. अरिष्टानंतर लगेचच्या काळात लोकांना आधार देणे, मदत वाटपाच्या प्रक्रियेवर लक्ष ठेवणे अशी भूमिका राजकीय नेत्यांनी, काही अपवाद वगळता, बजावली नाही. याउलट मदत वाटपातही राजकारण शिरुन मदतीचा उपयोग राजकीय लाभाकरता करण्याचे प्रकार घडले.

थोडक्यात, नैसर्गिक अरिष्टाच्या तीव्र धक्क्यानंतर तातडीची मदत बाधित लोकांसाठी किती महत्त्वाची असते याचे भान आणि संवेदनशीलता सरकारी यंत्रणेने दाखवली नाही. आदिवासी, स्त्रिया, भूमिहीन दलित, अशा सर्वाधिक वंचित गटांपर्यन्त पोचण्याचे कोणतेही विशेष प्रयत्न झाले नाहीत. या अनुभवातून सरकारी यंत्रणेची अरिष्टाबाबतची अनास्था स्पष्ट होते.

**अरिष्टामुळे कोकणात झालेले नुकसान आणि त्यावरील उपाययोजना**

नैसर्गिक अरिष्टाने कोकणात विविध प्रकारचे नुकसान घडवलेले दिसते. यामध्ये शेतीचे व पिकांचे नुकसान, घरे–गुरे–अन्नसाठे यांचे नुकसान, नैसर्गिक संसाधनांचे नुकसान, रेल्वे, रस्ते व इतर पायाभूत सुविधांचे नुकसान आणि औद्योगिक व व्यापारी आस्थापना व कच्च्या, पक्क्या मालाचे नुकसान यांचा प्रामुख्याने समावेश होतो. कोकणात सार्वत्रिक पातळीवर प्रचंड नुकसान झाल्याचे दिसत नाही. मात्र वेगवेगळ्या भौगोलिक पट्ट्यात, विखुरलेल्या स्वरूपात आणि वेगवेगळ्या तीव्रतेचे नुकसान झाल्याचे दिसते. अनेक ठिकाणी नुकसान भरून काढणे लोकांच्या आवाक्याबाहेर असल्यामुळे अरिष्टाचे परिणाम दीर्घकाळपर्यंत जाणवतील असे दिसते.

शेतीव्यवस्थेच्या नुकसानाचा फटका शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकरी आणि शेतमजूर यांना मोठ्या प्रमाणावर बसला आहे. कोकणातील वैविध्यपूर्ण भौगोलिक रचनेमुळे शेतजमिनीच्या नुकसानाच्या प्रकारात आणि तीव्रतेतही खूप वैविध्य आहे. हे वैविध्य लक्षात घेऊन नुकसानाचे नीट मोजमाप होणे आवश्यक आहे. तसेच, नुकसानाचे स्वरूप आणि व्याप्ती लक्षात घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. रोजगार हमी योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या वैयक्तिक जमिनी सुधारण्याचे काम व्यापक प्रमाणावर हाती घेण्याची नितांत आवश्यकता लोकांशी बोलताना पुढे आली.

अरिष्टामुळे कोकणातील बहुसंख्य लोकांच्या उपजीविकेचा आधार असणाऱ्या नैसर्गिक संसाधनांचा मोठ्या प्रमाणावर विध्वंस झाला आहे. नैसर्गिक संसाधनांचे लोकांच्या जगण्यातील कळीचे स्थान लक्षात घेऊन त्यांना पूर्वस्थितीत आणण्याचे काम ताबडतोब सुरू होण्याची गरज आहे. जेथे संसाधनांचे कायमस्वरूपी नुकसान झाले आहे, तेथे त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांना उपजीविकेचे नवीन पर्याय शोधण्यासाठी शासनाने मदत करण्याची गरज आहे.

दरड कोसळून, डोंगरांना भेगा पडल्यामुळे तसेच नदीनाल्यांचे काठ खचून अनेक घरे नष्ट झाल्यामुळे लोकांच्या सुरक्षित निवाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. घरे असुरक्षित बनलेल्या अशा सर्व लोकांचे पर्यायी जागी तातडीने पुनर्वसन करणे आवश्यक आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या सर्व प्रकारच्या नुकसानाची दखल शासनाने घेण्याची गरज लोकांकडून पुढे आली. विविध प्रकारच्या नुकसानाचा लोकांच्या जगण्यावरील परिणाम लक्षात घेऊन हे नुकसान भरून काढण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे.

कोकणातील आदिवासी, भूमिहीन दलित, स्त्रिया यासारख्या मुळातच कमकुवत उपजीविका असणाऱ्या वंचित गटातील लोकांवर अरिष्टाचे विविधांगी आणि तीव्र परिणाम झाल्याचे दिसते. नैसर्गिक संसाधनांच्या अपरिमित हानीमुळे बहुसंख्य लोकांचे जगण्याचे नैसर्गिक, आर्थिक, आणि सामाजिक आधार उखडले गेल्याचे दिसते. त्यामुळे त्यांच्यासाठी नैसर्गिक अरिष्टाचे रूपांतर सामाजिक–आर्थिक अरिष्टात झाले आहे. अशा समाजघटकांना अरिष्टातून सावरता यावे म्हणून विशेष उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. थोडक्यात, शासनाने लोकांना केवळ तात्पुरती मदत पुरवून न थांबता लोकांच्या पुनर्वसनाची जबाबदारी उचलण्याची गरज या अभ्यासातून तीव्रतेने पुढे आली.

**अरिष्टाची कारणमीमांसा**

अरिष्टामागील कारणे शोधताना कोकणची नाजूक नैसर्गिक जडण–घडण आणि त्यामधील अविचारी मानवी हस्तक्षेप या दोन कळीच्या गोष्टी पुढे आल्या. नाजूक परिसंस्थेमुळे (Ecology) बाह्य बदल पचविण्याची तेथील निसर्गाची क्षमता मुळातच मर्यादित आहे. त्यातच नैसर्गिक व्यवस्थेच्या मर्यादा धुडकावून केलेल्या विविध मानवी हस्तक्षेपांमुळे (उदा. अविचारी विकासकामे) ही नैसर्गिक व्यवस्था आधीच कमकुवत बनलेली होती. त्यामुळे अतिवृष्टीच्या फटक्याने ही व्यवस्था कोलमडून मोठे नैसर्गिक अरिष्ट उभे राहिले.

कोकणातील लोकांच्या उपजीविकांमध्ये स्थानिक नैसर्गिक व्यवस्थेचे कळीचे स्थान आहे. हे लक्षात घेऊन तेथील विकास कामे नैसर्गिक व्यवस्थेला धोका पोचवणार नाहीत ना, हे पाहणारे ठोस निकष तयार करण्याची तातडीची गरज यामधून पुढे येते. तसेच ज्या विकासकामांमुळे नैसर्गिक व्यवस्थेत बिघाड होऊन नुकसानात वाढ झाली अशा ठिकाणी त्या बिघाडांची दुरुस्ती ताबडतोब करण्याची लोकांची मागणी आहे.

याचबरोबर, कोकणातील नाजूक व धोक्याच्या स्थितीत असणाऱ्या नैसर्गिक ठिकाणांची गावानुसार यादी तयार करून तेथे धोक्याच्या पातळीनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना आखण्याची गरज आहे. ह्या उपाययोजनांमध्ये अभियांत्रिकी उपायांपेक्षा जैविक उपायांवर भर असायला हवा. थोडक्यात, पूर व दरडकोसळीच्या संकटांवर 'धरणे बांधणे', 'धूपप्रतिबंधक भिंती बांधणे' यासारखे 'लक्षणात्मक' उपाय चालणार नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे. त्याऐवजी अरिष्टाच्या मुळातील नैसर्गिक बिघाडांवर मूलगामी उपाययोजना व्यापक स्तरावर करण्याची आज गरज आहे. अशा अरिष्टांची पुनरावृत्ती टाळायची असेल तर अशा प्रकारची प्रतिबंधक उपाय योजना करणे अत्यावश्यक ठरते.

कोकणातील पाऊस आणि पुराप्रमाणेच त्यावरील उपायांची चर्चाही आता ओसरली आहे. परंतु वर मांडलेल्या निष्कर्षांवरून हे दिसून येते की अरिष्ट निवारणासाठी आता तातडीचे तसेच दीर्घकालीन प्रयत्न कसोशीने करावे लागणार आहेत. त्याचप्रमाणे या अरिष्टाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी अरिष्ट–प्रतिबंधाचा विचारही आतापासूनच गांभीर्याने करावा लागणार आहे. मात्र त्यासाठी अरिष्ट निवारण व प्रतिबंधाकडे बघण्याचा प्रचलित दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे.

### ■ आव्हान अरिष्ट–निवारणाचे: दृष्टिकोनात्मक बदलांची गरज

नैसर्गिक–सामाजिक आणि आर्थिक अशा तिहेरी अरिष्टाचे हे परिणाम, त्यांची व्याप्ती, आणि तीव्रता बघता 'अरिष्ट निवारण' हे शासनासाठी मोठेच आव्हान आहे असे दिसते. मात्र हे आव्हान पेलण्यासाठी अरिष्टाचे मूळ, अरिष्टाचे परिणाम, त्यावरची उपाययोजना ह्या सर्वांबाबत दृष्टिकोनात्मक बदलाची (paradigm shift) ची गरज प्रकर्षाने जाणवते. अरिष्टाच्या परिणामांचा विचार करताना 'शेतीचे नुकसान', 'घरांचे नुकसान', पायाभूत सुविधांचे नुकसान' अशा स्वतंत्र आणि केवळ दृश्य स्वरूपाच्या तुकड्यांमधे विचार केला तर हे आव्हान पेलता येणार नाही. कारण हे सर्व स्वतंत्र तुकडे नसून अरिष्टामुळे मानवी जीवनावर झालेल्या परिणामांची विविध अंगे आहेत. म्हणूनच अरिष्टाचे परिणामकारकरीत्या निवारण करायचे असेल तर या सर्व तुकड्यांचा एकसंध विचार करायला हवा.

### अन्न–सुरक्षिततेचा प्रश्न

एकसंध दृष्टीने बघताना दिसते की अरिष्टामुळे 'अन्नसुरक्षे'चा प्रश्न केवळ वंचित कुटुंबांसाठीच नव्हे तर कोकणातील बहुसंख्य पूरग्रस्तांसाठी गंभीर होणार आहे. कारण अन्नधान्याचा स्त्रोत असणाऱ्या अतिशय महत्त्वाच्या साधनांचे, म्हणजेच शेतजमीन आणि नदी, जंगल, डोंगर–उतार अशा नैसर्गिक संसाधनांचे गंभीर नुकसान झाले आहे. यातील बहुतेक नुकसान लगेच भरून येणे अवघड असल्याने त्यांच्याशी निगडित असणारी मच्छिमारी, फाटी विकणे अशासारखी उपजीविकेची कामे आणि विविध प्रकारची शेतमजुरीही दीर्घकाळासाठी धोक्यात आली आहे. त्यामुळे अन्नधान्याचा तुटवडा तात्पुरता नव्हे, तर अनिश्चित काळासाठी स्थानिक जनतेला भेडसावणार आहे. त्यातही ज्यांच्यासाठी 'दोनवेळचा प्रश्न' एरवीही बिकट असतो, त्यांच्यासाठी तर हा प्रश्न अधिकच तीव्र होणार आहे.

### उपजीविकेची सुरक्षितता धोक्यात

अन्नधान्याचा तुटवडा, रोजगारसंधींमधे घट, व जीवनाधार पुरवणाऱ्या नैसर्गिक संसाधनांचे गंभीर नुकसान यांचा एकत्रित परिणाम कोकणातील पूरग्रस्त जनतेच्या उपजीविकांवर होणार आहे. अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे तीव्र कुपोषण, आरोग्याचे प्रश्न, उपजीविकेच्या साधनांच्या विनाशामुळे कर्जबाजारीपणा व जगण्यासाठी स्थलांतर, या दोन्हींतून शोषणात आणि असुरक्षिततेत वाढ, मुलांच्या भविष्यावर परिणाम अशा दुष्टचक्राला पूरग्रस्तांना सामोरे जावे लागणार आहे. त्यातही स्त्रिया, आदिवासी, भूमिहीन दलित या वंचित गटांच्या असुरक्षिततेत आणि अगतिकततेत अजूनच वाढ होणार आहे. त्यांच्यापैकी अनेकांनी एव्हाना स्थलांतराचा मार्गही पत्करला आहे. थोडक्यात सांगायचे तर, जगण्यासाठी अत्यावश्यक अशी उपजीविकेची सुरक्षितताच कोकणातील बहुसंख्य जनतेसाठी अनिश्चित काळ धोक्यात आलेली आहे. उपजीविकेची सुरक्षितता केवळ पोटापाण्याचाच नव्हे तर माणसाच्या शारीरिक, बौद्धिक–भावनिक आणि सामाजिक स्वास्थ्याचाच आधार असते, हे लक्षात घेतले तर दिसते की उपजीविकेची सुरक्षितता अनिश्चित काळासाठी धोक्यात येणे हाच या अरिष्टाचा सर्वात गंभीर, चिंताजनक, आणि एकत्रित असा परिणाम आहे. मुळातच कोकणात उपजीविकेचे पर्याय मर्यादित असल्याने या परिणामाची तीव्रता आणखीनच वाढते.

### उपजीविका सुरक्षिततेतून मूलगामी अरिष्टनिवारणाकडे

म्हणूनच अरिष्ट निवारणाचे प्रयत्न 'नुकसानभरपाई'पुरते मर्यादित असून चालणार नाहीत. कोकणातील विविध समाजघटकांच्या उपजीविका पुन्हा सुरक्षित कशा करता येतील यावर अरिष्ट निवारण कार्यक्रमाचा

भर असणे नितांत गरजेचे आहे. हे लक्षात घेता, शेतजमिनींचे आणि नैसर्गिक संसाधनांचे नुकसान भरून काढण्याच्या कार्यक्रमाला अरिष्ट निवारणात अग्रक्रम हवा. त्यातूनच असुरक्षित झालेल्या उपजीविका हळूहळू सुरक्षित होतील.

शेतजमिनी व नैसर्गिक संसाधनांची पुनर्बांधणी करण्यासाठी कोणत्याही नव्या योजना निर्माण करण्याची गरज नाही. महाराष्ट्र शासनाची रोजगार हमी योजना ही जनतेच्या हक्काची योजनाच त्यासाठी अतिशय परिणामकारकपणे वापरता येईल. किंबहुना शेती आणि नैसर्गिक संसाधनांच्या दुरुस्तीसाठी रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेणे हा अरिष्ट निवारणाचा अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम होऊ शकेल. या संदर्भात (विशेषतः इतर खात्यांच्या तुलनेत) रोजगार हमी योजनेबाबत शासनाने दाखवलेली तत्परता निश्चितच स्वागतार्ह म्हणावी लागेल.

**शेतजमीन दुरुस्तीसाठी रोजगार हमी योजना**

**कोकणातील शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणातील नुकसान लक्षात घेऊन दि. १९ सप्टेंबर रोजी कृषी आयुक्तालयाने एक परिपत्रक काढले. या परिपत्रकात रोजगार हमीतून शेतजमिनींची दुरुस्ती करण्याचा कार्यक्रम घेता येईल असा उल्लेख होता. त्याचप्रमाणे शेतजमिनीच्या नुकसानाचे मोजमाप होण्यासाठी अनेक मार्गदर्शक सूचनाही नमूद केलेल्या होत्या. या परिपत्रकाचा धोरणात्मक पातळीवर पाठपुरावा होऊन 'रोहयोतून शेत–जमीन दुरुस्ती' बाबतचा शासन निर्णय २५ ऑक्टोबर रोजी जाहीर झाला.**

**दि. २५ ऑक्टोबरच्या शासन निर्णयानुसार (शासन निर्णय क्र. रोहयो – १००५/प्र.क्र.१८९/रोहयो–६) ज्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे त्यांच्या जमिनी दुरुस्त करण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी त्या त्या जमिनीच्या नुकसानाच्या पंचनाम्याआधारे प्रस्ताव तयार करायचे आहेत. रोहयोतील फळबाग योजनेच्या धर्तीवर हे प्रस्ताव मंजूर होतील आणि प्रत्येक शेतकऱ्याच्या जमिनीवर दुरुस्तीचे काम सुरू होईल. हे काम सुरू होण्याआधी आणि ते झाल्यानंतर शेतजमिनीचा फोटो काढणे अपेक्षित आहे. हे सर्व काम (दुरुस्तीसकट) ३१ डिसेंबर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. काम मंजूर तसेच पूर्ण झाल्यानंतर ग्रामसभेला त्याची सूचना दिली जाणेही या निर्णयांतर्गत अपेक्षित आहे.**

**शासकीय यंत्रणेचा आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेता, ३१ डिसेंबरची कालमर्यादा कामे पूर्ण होण्यासाठी पुरेशी नाही, हे उघड आहे. त्याचप्रमाणे फोटो काढण्याचे बंधन, जमिनीचा पंचनामा झालेला असणे, सातबाराचा उतारा असणे, जमिनीवर इतर कोणतेही काम झालेले नसणे अशा पूर्वअटींमुळे अनेक गरजू कुटुंबे या कामातून वगळली जाण्याचा धोका आहे. स्थानिकांना या कामांच्या नियोजनात निर्णायक सहभाग न दिल्यास ही अरिष्टकालीन योजनाही अनास्था, भ्रष्टाचार, व राजकारणाला बळी पडण्याचा धोका आहे. हे लक्षात घेऊन या कार्यक्रमाच्या आखणी आणि अंमलबजावणीमध्ये स्थानिकांच्या सहभागाने लवचिकता आणि पारदर्शकता आणणे नितांत गरजेचे आहे. अन्यथा शासनाच्या विधायक निर्णयामुळे अरिष्टग्रस्तांना उपलब्ध झालेली संधी आणि पर्यायाने अरिष्टनिवारणाचा मूलगामी कार्यक्रमही केवळ कागदोपत्रीच शिल्लक राहील.**

महसूल व वनखात्याने पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत नुकत्याच जारी केलेल्या या शासन निर्णयामुळे अरिष्टनिवारणाच्या कार्यक्रमाला निश्चितच गती मिळू शकेल असे दिसते. या कार्यक्रमाची व्याप्ती शेतजमिनीच्या दुरुस्तीपुरतीच मर्यादित असली तरीही नैसर्गिक संसाधनांच्या पुनर्बांधणीसाठी ती वाढवणेदेखील वंचित गटांसाठी अतिशय महत्त्वाचे ठरेल.

थोडक्यात, अरिष्टाकडे एकात्मिक दृष्टिकोनातून पाहताना उपजीविका सुरक्षिततेचा तसेच जैविक उपायातून निसर्गव्यवस्थेच्या (परिसंस्थेच्या) मजबुतीचा असे दोन मुद्दे केंद्रस्थानी ठेवल्याशिवाय अरिष्टामुळे कोलमडलेले कोकणातील जनजीवन व निसर्गव्यवस्था पुन्हा सुरळीत होणार नाही.

**शासनाचे 'आपत्ती व्यवस्थापन'**

ह्या पार्श्वभूमीवर कोकणातील अनुभवाच्या आधारे शासनाच्या 'आपत्ती व्यवस्थापना'तील प्रयत्नांबाबत काही ठळक निरीक्षणे मांडणे गरजेचे आहे.

१) 'आपत्ती व्यवस्थापन आराखडा' अद्ययावत ठेवणे, पूर येण्याची शक्यता आधीच गृहीत धरून दर उन्हाळ्यात त्याला तोंड देण्याची तयारी करणे अशा किमान अपेक्षित गोष्टीही यंत्रणेने केल्या नव्हत्या. कोल्हापूरसारख्या पूरग्रस्त जिल्ह्यामधे 'विज्ञान प्रबोधिनी' या सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांनी आपत्तीव्यवस्थापन आराखड्याची मागणी केली तेव्हा त्याना 'इंग्रजी भाषेतला ७०० पानी अहवाल' पाहायला मिळाला!

२) युएनडीपी आणि भारत सरकारने संयुक्तपणे सुरू केलेल्या अरिष्ट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत 'अरिष्टाला तोंड देण्याची पूर्वतयारी आणि त्यासाठी शासकीय यंत्रणेचे प्रशिक्षण' या दोन्ही तरतुदी कोकणासकट महाराष्ट्रातील इतर चौदा जिल्ह्यांसाठी लागू आहेत. २००४ पासून २००७ पर्यंत भारतातील ९७ आपत्ती प्रवण जिल्ह्यांमधे हा कार्यक्रम सुरू आहे. गावपातळीवरील 'आपत्ती व्यवस्थापन समित्यांची' स्थापना आणि त्यांच्या सक्रिय सहभागातून अरिष्टाला तोंड देण्याची तसेच अरिष्टाच्या काळात तातडीने प्रतिसाद देण्याची तयारी ही देखील या कार्यक्रमातली एक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण तरतूद आहे. अभ्यासादरम्यान पहाणी केलेल्या ४७ गाव/वाडयांमधे (रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात) मात्र यातील कोणत्याच तरतुदींचा मागमूस आढळला नाही.

(३) थोडक्यात, युएनडीपीच्या पुढाकाराने सुरू झालेली अरिष्ट–पूर्वतयारी आणि प्रतिबंध कार्यक्रम असो, वा महाराष्ट्र शासनाचा 'आपत्ती व्यवस्थापन' कार्यक्रम असो, त्यातील प्रागतिक तरतुदी कागदावरच राहिल्या. अरिष्टामुळे झालेल्या जीवित व मालमत्तेच्या हानीचे प्रमाण पाहता शासनाच्या ह्या अपयशाकडे अत्यंत गांभीर्याने पाहायला हवे.

४) शासकीय यंत्रणेने अरिष्टाच्या 'पूर्वतयारीचा' विचार केलेला असला तरी 'अरिष्टाला–प्रतिबंध' करण्याचा विचार मात्र फारसा केलेला दिसत नाही. अगदी युएनडीपीच्या पुढाकाराने सुरू झालेल्या कार्यक्रमातही 'पूर्वतयारी'च्या पलिकडे जाऊन प्रतिबंधासाठी ठोस योजना सुचवलेल्या दिसत नाहीत.

५) अरिष्टग्रस्त भागात अरिष्ट व्यवस्थापनाची ही परिस्थिती असताना धोरणात्मक पातळीवर मात्र काही महत्त्वाचे बदल प्रस्तावित आहेत. या अहवालाच्या प्रस्तावनेत उल्लेख केलेले 'राष्ट्रीय अरिष्ट व्यवस्थापन विधेयक', राज्यपातळीवरील 'आपत्ती व्यवस्थापन' कायदे, 'आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणे', या बदलांचा विचार सध्या धोरणात्मक पातळीवर सुरु आहे. पण इतक्या महत्त्वाच्या प्रक्रियांमधे 'आपत्ती–प्रवण' भागातील नागरिक तर सोडाच विभागीय पातळीवरील अभ्यासक आणि तज्ज्ञांनाही सामावून घेतलेले नाही. त्यामुळेच हे प्रस्तावित बदल प्रत्यक्षात आले तरीही, त्यांचीही गत आधीच्या प्रागतिक तरतुदींप्रमाणेच होण्याचा मोठाच धोका आहे. अशाप्रकारे 'वरून–खाली' झिरपलेल्या इतर प्रागतिक कार्यक्रमांचेही हेच होते असा आजवरचा अनुभव आहे.

शासनाची अरिष्ट व्यवस्थापनाबाबतची ही अनास्था आणि संवेदनहीनता लक्षात घेऊन केवळ कागदावर नव्हे तर खऱ्या अर्थाने लोकाभिमुख आणि शाश्वत अशा अरिष्ट व्यवस्थापनासाठी काही गोष्टी तातडीने होण्याची गरज दिसते. त्या याप्रमाणे:

- प्रत्येक जिल्ह्याचे आपत्ती व्यवस्थापन आराखडे स्थानिक वर्तमानपत्रांमधून जाहीर व्हावेत.
- या वर्षी कोसळलेल्या अरिष्टाला तोंड देण्याची तयारी यंत्रणेने कशी केली होती, याचे अहवाल शासनाने प्रत्येक अरिष्टग्रस्त जिल्ह्यात जाहीर करावेत.
- अरिष्ट व्यवस्थापनविषयक धोरणात्मक बदलांबाबत सखोल विचारविनिमयाची प्रक्रिया शासनाने तातडीने सुरु करावी, या प्रक्रियेत गावपातळीपासून विभागीय पातळीपर्यंतच्या नागरिकांचा, अभ्यासक, तज्ज्ञ आणि स्वयंसेवी संस्था संघटनांचा सहभाग असावा.

थोडक्यात, शासनाच्या अरिष्टनिवारण आणि अरिष्ट प्रतिबंधविषयक दृष्टिकोनात बदल झाल्याशिवाय मूलगामी आणि व्यापक उपाययोजनांच्या दिशेने वाटचाल सुरु होऊ शकणार नाही आणि ती झाली नाही तर या वर्षीच्या अरिष्टाची पुनरावृत्ती होण्याचा धोकाही अटळ आहे.

# समारोपादाखल

सारांशाने सांगायचे तर ह्या अभ्यासातून काही बाबी प्रकर्षाने पुढे येतात. पहिले म्हणजे, अरिष्ट आल्यावर नुसते त्याचे व्यवस्थापन करणे यावर समाधान न मानता, अरिष्ट येण्याआधी सक्रियपणे त्याचा प्रतिबंध करण्याची तीव्र गरज ह्या अभ्यासातून पुढे येते. तेव्हा, अरिष्टाचे निवारण करण्यासाठी देखील अरिष्ट व्यवस्थापन व अरिष्ट प्रतिबंध असा एकत्रित दृष्टिकोन घ्यायला हवा. दुसरे म्हणजे, अरिष्टाचा प्रतिबंध करण्यासाठी केवळ 'लक्षणात्मक' असे अभियांत्रिकी उपाय न करता परिसंस्थात्मक दृष्टिकोनातून मूळ कारणे शोधून, जैविक उपायांवर भर द्यायला हवा. तिसरे म्हणजे, अरिष्टांच्या परिणामांची व्याप्ती व तीव्रता तसेच त्यामागच्या कारणांतली गुंतागुंत व वैविध्य पाहता अरिष्ट निवारण तसेच प्रतिबंधासाठी सरकारी यंत्रणा पुरेशी ठरणार नाही हे स्पष्ट होते. परिणामी, अरिष्टाचे निवारण व प्रतिबंध करण्यासाठी स्थानिक लोकांचा व संस्थाचा व्यापक स्तरावर व सक्रिय सहभाग असणे अनिवार्य ठरते. जलद रीतीने केलेल्या या अभ्यासावर अनेक मर्यादा आहेत. मात्र, ह्या छोट्या प्रयत्नामधूनदेखील एका बाजूने परिस्थितीचे गांभीर्य जाणवते, तर दुसऱ्या

बाजूने आपल्या सर्वांच्या प्रयत्नातलेच नव्हे तर समजेमधले अपुरेपण आणि दृष्टिकोनातील त्रुटी देखील ढळढळीतपणे पुढे येतात.

या पार्श्वभूमीवर सध्या म्हणजे अरिष्टानंतरच्या तीन चार महिन्यानंतर दिसणारे चित्र खूपच निराशाजनक आहे. अरिष्टानंतर सरकारने केलेल्या घोषणा, त्यांची माध्यमातून घेतली जाणारी दखल, स्वयंसेवी संस्था व जनता यांनी अरिष्टग्रस्तांना केलेली मदत आता भूतकाळाचा भाग झाली आहे. 'एवढे आपण केले हे खूप किंवा छानच झाले' अशा आत्मतुष्टीची भावना सर्वत्र दिसून येते. जे काही प्रयत्न झाले त्यांचे महत्त्व व मोल न नाकारता असे म्हणावे लागेल की हे प्रयत्न अत्यंत अपुरे ठरले आहेत. अरिष्टग्रस्तांच्या हालअपेष्टांमधे अजून तरी काही सुधारणा झालेली नाही. त्यांच्या पुनर्वसनासाठी नेमके काय केले जाणार याबाबत स्पष्टता नाही. त्यांच्या गरजा, अपेक्षा मागण्या काय आहेत याची दखल आज कुणी घेत नाही, त्यांचे ऐकायला कुणी तयार नाही हेच त्यांचे मोठे दुःख आहे. स्थानिक लोकांची अशी स्पष्ट अपेक्षा आहे की, लोकप्रतिनिधी, राजकीय कार्यकर्ते, सरकारी अधिकारी, माध्यमे, विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा या सर्वांचा अरिष्टनिवारणाच्या प्रयत्नांमधे मोठ्या प्रमाणावर सहभाग असायला हवा आणि हा सहभाग हिरीरीचा हवा.

एका बाजूने अरिष्टाच्या विविध आयामांबाबत लोकांमध्ये जागृती व शिक्षण, तर दुसऱ्या बाजूने अरिष्ट निवारणामध्ये कार्यतत्परता आणण्यासाठी सरकारी यंत्रणेला धारेवर धरणे असे दुहेरी कार्य माध्यमांनी करायला हवे. लोकप्रतिनिधी व राजकीय कार्यकर्त्यांनीही एका बाजूने रोजगार हमीसारख्या योजनांतील नव्या तरतुदीचे फायदे लोकांपर्यंत पोचवण्यासाठी सरकारी यंत्रणेच्या सहकार्याने प्रयत्न करावेत. तर दुसऱ्या बाजूने अरिष्टग्रस्तांच्या समस्यानिवारणासाठी नव्या योजना सुरू करण्यासाठी व जुन्या योजनात योग्य बदल घडवून आणण्यासाठी सरकारवर दबाव टाकायला हवा.

विद्यापीठांनी, विशेषतः शेती विद्यापीठांनी शेतीच्या नुकसानातून उभ्या राहिलेल्या तांत्रिक समस्यांच्या निवारणासाठी तातडीने तपशीलवार अभ्यास करण्याची गरज आहे. शेतीसुधारणेसाठीच्या नव्या योजना आखण्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात सरकारी यंत्रणेला कृषिविद्यापीठाने आपले तांत्रिक पूर्वग्रह बाजूला ठेवून, स्थानिक लोक, व कार्यकर्ते यांच्या सूचना आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन सहाय्य करायला हवे. शाळा, महाविद्यालये, स्थानिक मंडळे यांना देखील याबाबतीत भरीव काम करता येईल. सर्वसामान्य शेतकऱ्यांनी, स्त्रियांनी, वंचितांनी स्वतःचे जीवन सुरळीत करण्यासाठी चालवलेल्या प्रयत्नांमध्ये या संस्थानी त्यांना मदत करायला हवी. सरकारी योजनांची वा इतर तांत्रिक माहिती अरिष्टग्रस्तांकडे पोचवणे, त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांना साहाय्य करणे, अरिष्टग्रस्तांच्या अडचणी व प्रश्न सरकारी अधिकाऱ्यांसमोर परिणामकारक रीतीने मांडणे, त्यांची सोडवणूक करणे, अरिष्ट प्रतिबंधासाठीच्या कामात गावकऱ्यांना पाठबळ पुरवणे अशी अनेक कामे शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व स्थानिक मंडळाच्या कार्यकर्त्यांना करता येतील.

थोडक्यात सांगायचे तर, माहिती, ज्ञान, व आर्थिक किंवा राजकीय बळ असणाऱ्या सर्वच समाजघटकांनी आज अरिष्टग्रस्त व सरकारी यंत्रणा यांना जोडणाऱ्या पुलाचे काम करायला हवे. अशा प्रकारे सर्वांनी मिळून हा गोवर्धन पर्वत उचलला तरच कोकणातील अरिष्टग्रस्तांना दिलासा मिळेल आणि कोकणच्या डोक्यावरची अरिष्टाची टांगती तलवार दूर होईल.

# परिशिष्ट १

## कोकणातील जिल्हा निहाय पर्जन्यमान (१ जुलै ते ३० सप्टेंबर २००५ पर्यंत)

| | २००५ पर्जन्यमान | सर्वसाधारण वर्ष | सर्वसाधारण वर्षाच्या तुलनेत २००५ |
|---|---|---|---|
| | (मि.मि.) | (मि.मि.) | (%) |
| **रायगड** | ३९२७ | ३१६४ | १२४ |
| **रत्नागिरी** | ३५५२ | ३०९३ | ११५ |
| **ठाणे** | ३५२१ | २४११ | १४६ |
| **सिंधुदुर्ग** | २८३६ | २६६१ | १०७ |

स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, भारतीय हवामान शास्त्र विभाग, मुंबई. (www.imdmumbai.gov.in/srf_mah.htm)

## घरांचे नुकसान

| | पूर्ण नुकसान | | अंशतः नुकसान | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | मूल्य (लाख रु.) | संख्या | मूल्य (लाख रु.) |
| **रायगड** | ८२९ | ३३२ | ४,३११ | ४३५ |
| **रत्नागिरी** | २४३ | ३५८ | ३,६९४ | ७८३ |
| **ठाणे** | १,४९६ | ५९८ | ६५,७२७ | २,१२९ |
| **सिंधुदुर्ग** | ३४ | ६ | ८५६ | ३७ |

स्त्रोत: महाराष्ट्र सरकारच्या आपत्कालीन मदत व पुनर्वसन विभागाच्या वेबसाईटवरील अहवालावरून
(http:/mdmu.maharashtra.gov.in/pages/pdf/flood/statusreport.pdf)

## अरिष्टातील जीवितहानी (ऑगस्ट १२, २००५)

| | मृत | दुखापत | हरवले |
|---|---|---|---|
| | संख्या | संख्या | संख्या |
| **रायगड** | १६६ | ४ | ३ |
| **रत्नागिरी** | २० | – | – |
| **ठाणे** | २२४ | १९ | १५ |
| **सिंधुदुर्ग** | ८ | ५ | – |

स्त्रोत: महाराष्ट्र सरकारच्या आपत्कालीन मदत व पुनर्वसन विभागाच्या वेबसाईटवरील अहवालावरून
(http:/mdmu.maharashtra.gov.in/pages/pdf/flood/statusreport.pdf)

**पंचनाम्यानुसार अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतीची माहिती दि. ०३/०९/२००५**

| बाधित | तालुके | गावे | शेतकरी | बाधित शेती क्षेत्र (हेक्टर) | | एकूण शेतीक्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | संख्या | संख्या | ५०% च्या वर | ५०% च्या आत | (हेक्टर) |
| **रायगड** | १५ | १,६०६ | ७९,९१२ | ३२,९४६ | १,८१० | ३४,७५६ |
| **रत्नागिरी** | ९ | ९२४ | १८,४०० | ३,३२० | ८३२ | ४,१५२ |
| **ठाणे** | १२ | १,७०० | ८५,१७५ | २६,३२७ | ३,९५७ | ३०,२८४ |
| **सिंधुदुर्ग** | ८ | ११५ | ३,१११ | ७०७ | ० | ७०७ |
| **एकूण महाराष्ट्र** | २२० | १५,९१५ | १६,५१,१४८ | ८,०२,१८३ | ३,८१,५७४ | ११,८३,७५७ |


स्त्रोत: कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या माहिती संकलनावरून.
टीप: सदर माहिती कृषी आयुक्तालयाच्या अंतरिम अहवालावरुन संकलित केली आहे.

**आपत्तिग्रस्तांना सरकारने केलेली मदत (२५ जुलै ते १२ ऑगस्ट २००५)**

| | **रायगड** | **रत्नागिरी** | **ठाणे** | **सिंधुदुर्ग** | **एकूण महाराष्ट्र** |
|---|---|---|---|---|---|
| बाधित गाव (संख्या) | ५५९ | ४४६ | ४१९ | २९९ | ६,०९१ |
| जीवितहानी साठी मदत (लाख रु.) | २८ | १०.५ | ११९ | १ | ४४० |
| मदत दिलेली निराधार कुटुंबे | ७०,५३२ | ९,७८८ | १,७३,७२८ | ७९ | ४,८६,२२९ |
| मदत पोचलेल्या निराधार व्यक्ती | ३,४९,४९३ | ४७,९४७ | ८,७५,९०० | ४५१ | २७,७२,६१८ |
| तात्काळ मदत (लाख रु.) | २,५२० | ७५० | ७,०९० | ९ | २१,०९० |
| भात वाटप (क्विंटल) | ४,६८२ | १,०२७ | ८०,४५२* | ६२ | ९५,४७३ |
| गहू वाटप (क्विंटल) | ४,६८१ | ७१८ | ४७,०३२* | ६० | ६१,७३८ |
| एकूण अन्नधान्य वाटप (क्विंटल) | ९,३६३ | १,७४५ | १,२७,४८४* | १२२ | १,५७,२११ |
| केरोसीन वाटप (किलो लिटर) | ४०६ | ७० | ५,६१० | ६ | ६,७५२ |

* ठाण्यासाठी दिलेल्या अन्नधान्य वाटपाच्या आकडेवारीमध्ये मुंबईच्या आकडेवारीचासुद्धा समावेश केला गेला आहे.
स्त्रोत: महाराष्ट्र सरकारच्या आपत्कालीन मदत व पुनर्वसन विभागाच्या वेबसाईटवरील अहवालावरून
(http:/mdmu.maharashtra.gov.in/pages/pdf/flood/statusreport.pdf)

# परिशिष्ट २ : अभ्यासांतर्गत पाहाणी केलेली तालुकानिहाय गावे/आदिवासी वाड्या




**जिल्हा रायगड**

**महाड**
दासगाव–बामणीकोंड, आंबेत–आमशेत,
घुरुपकोंड, मांडले, टोळ खुर्द व बुद्रुक, महाब्रे,
**माणगाव**
चापडी, देवळी–कोंड, मानटाची वाडी,
निळगुण, रिळ्याची वाडी, माकटीची वाडी,
**रोहा**
अष्टमी–बौद्धवाडी, वावे–खार, कोपर–झोळांबे,
निवी, कोकबन, दीव, खांदाड, महादेव वाडी,
पहुर–वाळंजवाडी
**पेण**
आमटेम, चांदेपट्टी–रुपराई, शिर्की चाळ,
मसद, गडब/काराव, हेदोशी, बेणेघाट,
नारळी आंबा, राधाकृष्णवाडी

धावती भेट : वीर, पाले, दाभोळ, म्हाप्रळ, कुंभळे, नांदवी, कस्तुली,
उणेगाव, गोरेगाव, वडगाव, कुरवडे, वडघर

**जिल्हा रत्नागिरी**

**संगमेश्वर**
साखरपा–बौद्धवाडी, पात्केकरवाडी, मोरेवाडी,
बाईतवाडी, दत्तवाडी, देवडे–चिंचवळकर वाडी,
परचुरी, मठधामापूर, डिंगणी, कोंड्ये,
कासे–आड्याची वाडी, पिंपळवाडी, धामापूर–भडवळेवाडी,
माखजन–बौद्धवाडी, मांडकी–खांबे वाडी, कोळंबे मोहल्ला,
कोळंबे मळा, किरडुवे–बारीवाडी, सोमेश्वर–बौद्धवाडी
**चिपळूण**
कालुस्ते–बौद्ध वाडी, अनारी–बौद्ध वाडी, हनुमानवाडी
**खेड**
सापिर्ली
**गुहागर**
खोडदे–खालची गणेश वाडी, पाली
**लांजा**
निवसरबागवाडी

धावती भेट : कोतवली, सोनगाव

**प्रयास**

प्रयास हा वैद्यकीय व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील काही व्यावसायिकांनी एकत्र येऊन स्थापलेला व कायद्यानुसार नोंदलेला सार्वजनिक विश्वस्त निधी आहे. प्रयासच्या वतीने 'आरोग्य', 'ऊर्जा', 'शिक्षण व पालकत्व' तसेच 'संसाधने व उपजीविका' ह्या क्षेत्रांत अनेक उपक्रम चालवले जातात. आपले व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये वापरुन समाजातील वंचित वर्गांच्या स्वउन्नतीसाठीच्या प्रयत्नांना व संघर्षांना साहाय्यभूत ठरावे ह्या उद्देशाने प्रयासचे सदस्य काम करीत असतात. संशोधन, विश्लेषण, प्रशिक्षण, माहितीचा प्रसार, लोकजागृती, व जनवकिली इ. विविध मार्गांनी वरील उद्देशांच्या पूर्तीसाठी प्रयत्न केले जातात.

**संसाधने व उपजीविका गट**

२००० सालापासून प्रयास ऊर्जा गटांतर्गत 'संसाधने व उपजीविका' गट कार्यरत आहे. या गटामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक संसाधने व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या उपजीविका या विषयावर काम सुरू आहे. वंचित घटकांच्या उपजीविकेचा प्रश्न विकासावरील चर्चेच्या व कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी यावा यासाठी 'संसाधने व उपजीविका' गट काम करीत आहे. या गटातर्फे खालील विषयांवर काम चालू आहे:

- शाश्वत उपजीविकेवर आधारित विकासविषयक दृष्टिकोनाची मांडणी व प्रसार
- वंचित घटकांना विकास योजना/कार्यक्रमांची आखणी, अंमलबजावणी, नियमन यावर प्रभाव टाकता यावा यासाठी उपयुक्त साधनांचा विकास
- रोजगार हमी योजनेतील बदलांच्या प्रश्नावर विविध संस्था-संघटनांच्या संयुक्त प्रयत्नांना अभ्यास, विश्लेषण याद्वारे पाठबळ
- कमी-बाह्य-साधनांच्या शाश्वत शेतीच्या पद्धतींचे विकसन, प्रत्यक्षदर्शन, प्रशिक्षण व प्रसार

**संसाधने व उपजीविका गट, प्रयास**

'मंगेशपुष्प', सर्व्हे नं. १३३, स्वामी विवेकानंद सोसायटी, बायफजवळ, वारजे, पुणे ४११०५२.

फोन : ०२० २५२३ २८३६, ५६७० ४४५३,९४२२३ १७५३० फॅक्स : २५४२ ०३३७

E mail: reli@prayaspune.org web site: www.prayaspune.org

**नोंदणीकृत कार्यालय**

प्रयास, अमृता क्लिनिक, आठवले कॉर्नर, कर्वे रोड, पुणे ४११००४.

फोन : २५४४ १२३०, २५४२ ०३३७.

**छायाचित्रे** : © संदेश भंडारे

: संसाधने व उपजीविका गट, प्रयास

**अंक मांडणी** : मिडीया इमेजेस

**मुद्रण** : युनिक ऑफसेट

खाजगी वितरणासाठी



## पाण्याचे थैमान,
## शासनाने दाखवले अस्मान

१९८९ साली कोकणात आलेल्या महापुरात शंभर कुटुंबांचे दादर (पेण) गाव संपूर्ण उध्वस्त झाले. लोकांची घरे, शेतजमिनी नष्ट झाल्या. हक्काची जमीन गमावलेले शेतकरी शेतमजुरीसाठी मिळेल तेथे राहू लागले. १० वर्षे अशी वणवण केल्यानंतर २५ कुटुंबांनी कायमस्वरुपी निवाऱ्यासाठी पेणजवळ नव्याने 'राधाकृष्णवाडी' वसवली.

२६ जुलैच्या पहाटे नदीच्या पाण्याच्या पातळीत अचानक वाढ होऊन वाडीत पाण्याचा प्रचंड लोंढा शिरला आणि ९०% घरे वाहून गेली. पाणी पहाटे घुसल्याने वाडीतील लोक कसाबसा आपला जीव वाचवू शकले. भोगेश्वरी नदीवरील हेटवणे धरणातून अतिरिक्त पाणी सोडल्यामुळे ही आपत्ती कोसळली असे लोकांना वाटते.

इतक्या वर्षात स्वबळावर जमवलेला संसार डोळ्यासमोर क्षणात वाहून गेला आणि १५ वर्षानंतर पुन्हा एकदा लोक पूर्वस्थितीस येऊन पोहोचले. पूर्वीच्या अनुभवामुळे सरकारवर विसंबून न राहता 'राधाकृष्णवाडी' तुटलेल्या घरांमध्ये आश्रयास आली. काळ बदलला पण प्रश्न तेच राहिले. पुन्हा शुन्यापासून सुरुवात करताना डोक्यावर छत नाही, पोट भरण्यासाठी साधन नाही आणि शासनाचाही आधार नाही असे तिहेरी संकट उभे राहिले. ' निदान यावेळेस तरी शासनाने किमान रहाण्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन द्यावी' असे वाडीतील लोकांचे म्हणणे आहे.

दुदैवाने, दीर्घकालीन पुनर्वसनाबाबत शासनाची बेफिकीरी लोकांना आयुष्यातून उठविणारी कशी ठरते याची अनेक उदाहरणे कोकणात दिसतात.

**संसाधने व उपजीविका गट, प्रयास**
'मंगेशपुष्प', सर्व्हे नं. १३३, स्वामी विवेकानंद सोसायटी, बायफजवळ, वारजे, पुणे ४११०५२.
फोन : ०२० २५२३ २८३६. E mail : reli@prayaspune.org web site: www.prayaspune.org